



# हाकारा

वर्ष : चौदावे ■ अंक तिसरा व चौथा

# महाराष्ट्र मानव विज्ञान परिषद

**स्फूर्तिस्थान / प्रेरणा :** *कै. प्रा. गं. बा. सरदार*

## —: कार्यकारी मंडळ :—

| | |
|---|---|
| **अध्यक्ष** | : डॉ. पी. व्ही. सुखात्मे (पद्मभूषण) |
| **उपाध्यक्ष** | : प्रा. व्ही. जी. पेंढारकर |
| **मुख्य सचिव** | : प्रा. रा. के. मुटाटकर |
| **सहसचिव** | : डॉ. पराग माणकीकर |
| **खजिनदार** | : डॉ. व्ही. एस. कुलकर्णी |
| **सभासद** | : डॉ. एन. एस. देवधर |
| | : श्रीमती मीरा तडवी |
| | : डॉ. बी. व्ही. भानू |
| | : डॉ. मिलिंद बोकील |
| | : डॉ. एस. जी. देवगांवकर |
| | : ॲड. पद्माकर वळवी |

कष्टकरी जनता, भूषण भारता, वंदन करितो पददलिता !

महाराष्ट्र मानव विज्ञान परिषदेचे त्रैमासिक

# हाकारा

## धरण : विस्थापन आणि पुनर्वसन ( विशेषांक )

-- अनुक्रमणिका --


संपादकीय – पुनर्वसनाचे सांस्कृतिक प्रश्न........................२

१) प्रचंड धरण = प्रचंड विकास! कोणाचा? : विजय परांजपे ..............८

२) धरण आहे नावाचं मोठं : मेधा पाटकर..............................१७

३) नर्मदा खोरे विकास प्रकल्प : अजित पेंडसे..........................२३

४) सरदार सरोवर प्रकल्पामुळे लाखोंची झाडाझडती : मिलींद कोठावद ..............२८

५) नर्मदा प्रकल्प – पायाभूत प्रश्न अनुत्तरीतच! : वर्षा ढेरे - गजेंद्रगडकर ............३९

६) संपूर्ण नर्मदा प्रकल्प – गुजरातचे व देशाचे हित! : शाम सुरनीस ..................४३

७) सरदार सरोवर – आर्थिक पाहणी : विश्वनाथ विखे ..........................४६

८) सरदार सरोवर – विकास की विनाश? : दीप्ती एकबोटे.........................४९

९) सरदार सरोवर – पुनर्विचार करावा : डॉ. व्ही. जी. कुलकर्णी........................५२

१०) मणिबेली संघर्ष झालाच पाहिजे : शिवाजी कांबळे................................५४

११) मणिबेलीची हाक-सरदार सरोवर : दीपक गायधनी ..............................५६

१२) नर्मदा प्रकल्पाचा विस्थापित होणाऱ्यांना फायदा काय? : राजेश साबळे ............५७

कविता – मेधा पाटकर, दिलीप चौधरी, र.पां. कणेकर, शिवराम देवलकर
निशिकांत व चामूलाल राठवा.



वर्ष चौदावे : अंक तिसरा-चौथा
जुलै-डिसेंबर १९९३

**पत्रव्यवहाराचा पत्ता :**
महाराष्ट्र मानव विज्ञान परिषद
६४, आनंद पार्क, औंध,
पुणे - ४११ ००७.
फोन : ३३७०२०

**संपादक**
रामचंद्र मुटाटकर
**कार्यकारी संपादक**
ग. शां. पंडित
**मुखपृष्ठ**
डॉ. बी.व्ही. भानू

मूल्य रु. २०/-

**प्रकाशक**
रा. के. मुटाटकर
सचिव, महाराष्ट्र मानव विज्ञान परिषद
यांच्यासाठी,
**मे. इंप्रेशन्स**
३३६०/४, लिंगराज कॉलेज समोर,
गोंधळी गल्ली, क्रॉस रोड,
बेळगाव – ५९० ००२.
फोन : २१३०९
येथे छापून प्रसिद्ध केले.



अंकात व्यक्त झालेल्या लेखकांच्या विचारांशी किंवा मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही.

# संपादकीय ...

## पुनर्वसनाचे सांस्कृतिक प्रश्न

*गुजरात, महाराष्ट्र, मध्य प्रदेश, या तीन राज्यांना ग्रासणारा 'सरदार' सरोवर प्रकल्प जागतिक पातळीवर पर्यावरणाचा प्रश्न म्हणून गाजतो आहे. त्याच्या परिणामस्वरूप भारत सरकारने जागतिक बँकेचे सहाय्य नाकारले आहे. इतर अनेक धरणांप्रमाणे नर्मदा नदीवरील हे धरणही आदिवासींना विस्थापित करणारे आहे. एकंदरच धरणांच्या बाबतीतला अनुभव असा की विस्थापितांचे यथायोग्य पुनर्वसन शासकीय यंत्रणेमार्फत समाधानपूर्वक होत नाही. हा अनुभव मुळशी, कोयना, पानशेत इ. अनेक धरणांच्या बाबत महाराष्ट्रात आलेला आहे. विशेषत: आदिवासी संस्कृती ही पर्यावरणाबरोबर तादात्म्य पावलेली संस्कृती आहे. आदिवासी जेव्हा विस्थापित होतात तेव्हा हे विस्थापन त्यांच्या संस्कृतीच्या मुळापर्यंत जाऊन भिडते.*

*शासनातर्फे ज्या पुनर्वसनाच्या योजना मांडण्यात येतात आणि विस्थापितांना जी आश्वासने देण्यात येतात त्यांचे पालन होत नाही. असा सर्वसाधारण अनुभव आहे. बुडणाऱ्या जमिनीच्या मोबदल्यात पैसा दिला किंवा कोठेतरी पर्यायी जमीन दिली म्हणजे पुनर्वसनाचा प्रश्न सोडविला असे शासनाचे धोरण असते. पुनर्वसनाचा प्रश्न हा मानवी प्रश्न आहे आणि त्याचा विचार कौटुंबिक पातळीवर करावा लागतो. शासकीय यंत्रणेचे स्वरूप आणि रचना अशी असते की त्यात मानवी समस्यांचे समाधानकारक निराकरण होणे शक्य नसते. स्वयंसेवी संस्थांना मानवी समस्यांची उकल करणे जास्त सुलभ असते. कारण स्वयंसेवी संस्थांची रचना व कार्यपद्धती ही जास्त लवचिक असू शकते, आणि त्यांच्या कार्याची भौगोलिक व्याप्ती मर्यादित असते.*

*धरणांची उंची किती असावी, मोठी धरणे आणि छोटी धरणे किंवा बंधारे यांची सापेक्ष उपयुक्तता, धरणात गाळ साचण्याची प्रक्रिया या बाबी तांत्रिक स्वरूपाच्या आहेत. अर्थात त्याचा वीज निर्मिती, भूमी सिंचन आणि पुनर्वसनाचे प्रश्न यांच्याशी घनिष्ठ संबंध आहे. या तांत्रिक*

बाबींबद्दल अधिकारवाणीने बोलण्याचे धाडस आम्ही करीत नाही. परंतु पुनर्वसनाचे प्रश्न बिकट असतात म्हणून धरणे बांधूच नयेत या विचारांशी आम्ही सहमत नाही. दुर्दैवाने धरणांमुळे प्रगत समाजाचा आणखीन विकास होतो. धरणाच्या पाण्यावर नगदी पीके घेतली जातात. व त्या पैशाच्या जोरावर सत्तेचे राजकारण खेळण्यात येते. उद्योगधंद्यांची भरभराट होते. श्रीमंत गरीबातील दरी ही जास्त वाढत जाते. ज्या आदिवासींच्या किंवा शेतकऱ्यांच्या जमिनी धरणाच्या पाणलोट क्षेत्रात येतात ते भूधारक पूर्णपणे नागवले जातात असा अनुभव आहे.

पुनर्वसन ही जशी मानवी समस्या आहे, त्याचप्रमाणे ते सामाजिक, आर्थिक परिवर्तनाचे एक साधनही बनू शकते. पुनर्वसनाच्या बाबतीत सर्वात मोठी अडचण अशी की ज्यांचे पुनर्वसन व्हावयाचे आहे त्या लोकांशी शासन संवाद साधत नाही. बहुतांशी घेतलेले निर्णय लोकांवर लादण्यात येतात. निर्णय घेण्याच्या प्रक्रियेत जर सुरुवातीपासून लोकांना सहभागी करून घेतले तर पुनर्वसनाचे कार्य जास्त सुकर होईल.

या संदर्भात पुणे विद्यापीठ मानवशास्त्र विभागातील दोन प्राध्यापक, श्री. रा. के. मुटाटकर आणि श्री. विजय भानू यांनी डिसेंबर १९९० मध्ये बस्तर (म. प्रदेश) मधील नियोजित बोधघाट धरणाखाली बुडणाऱ्या ३३ आदिवासी खेड्यांचा सखोल अभ्यास केला. या ३३ गावांपैकी १० खेड्यांना त्यांनी प्रत्यक्ष भेटी दिल्या व मानवशास्त्रातील गुणात्मक अभ्यास पद्धती प्रमाणे माहिती गोळा केली. विशेष म्हणजे या खेड्यांना त्यांनी सायकलद्वारे व बरेच वेळा पायपीट करून भेटी दिल्या. जीप अथवा स्वयंचलित वाहनाचा कोठेही वापर केला नाही.

म. प्रदेश सरकारने बोधघाट जलविद्युत प्रकल्प १९८० साली भारत सरकारला सादर केला. धरणाची जबाबदारी म. प्रदेश वीज मंडळाने घेतलेली होती. बस्तर, भारतातील सर्वात मोठा जिल्हा, केरळ राज्यापेक्षाही मोठा घनदाट जंगलाने व्यापलेला आहे. तेथे अतिशय दुर्मिळ अशा वनस्पती आहेत. आदिवासींची संख्या सत्तर टक्के लोकसंख्येपेक्षा जास्त आहे. या कारणास्तव धरणामुळे केवळ आदिवासींचे विस्थापन व्हावयाचे नव्हते तर दुर्मिळ अशा वनस्पती, पशुपक्षी व वन्य जीवांनाही धरणामुळे तडाखा बसणार होता. या बाबतीत अभ्यास करण्याकरिता एका मागोमाग एक अशा गालिल समित्यांच्या नेमणूका झाल्या.

१. डेहराडून स्थित वनसंशोधन संस्थेची समिती

२. डेहराडून स्थित वन्यजीवन संस्थेची समिती.

३. जबलपूर येथील डेसी ड्यूएस वन संशोधन संस्थेची समिती.

४. म. प्रदेश शासनाची समिती.

५. त्या काळातील पर्यावरण विभागाचे सचिव श्री. टी. एन. शेषन यांच्या अध्यक्षतेखाली पंतप्रधानांनी नेमलेली समिती.

या समित्यांचे अहवाल हाती आल्यानंतर म. प्रदेश वीजमंडळाने म. प्रदेश शासनाच्या परवानगीने महाराष्ट्रातील काही निवृत्त वन अधिकारी व मानवशास्त्राचे दोन प्राध्यापक यांच्या अभ्यास गटाची नेमणूक केली.

**अभ्यास पद्धती**

अगोदरच्या समित्यांनी बराच जीपचा धुरळा उडविला असणार तसेच प्रश्नावली द्वारा माहिती गोळा केली असणार, या भावनेतून मानवशास्त्र संशोधकांनी कागद पेन्सिलचा वापर न करता लोकांबरोबर प्रत्यक्ष राहून माहिती गोळा केली. धरणाबद्दल बोचरे प्रश्न विचारण्याऐवजी त्यांनी त्यांच्या संस्कृतीची आस्थेने विचारपूस केली. त्यामुळे धरणाचा त्यांच्या सांस्कृतिक जीवनावर काय परिणाम होणार आहे हे लोकांनी स्वतःहून सांगितले. अशाच प्रकारच्या मोकळेपणाने चर्चा जगदलपूर येथील विचारवंतांशी वन व आदिवासी कल्याण विभागातील अधिकाऱ्यांशी आणि बस्तर प्रकृती बचाव समितीच्या लोकांशी करण्यात आल्या. त्यात मुख्यत्वे-करून धरणास विरोध दर्शविण्यात आला नाही. परंतु खालील मुद्दे पुढे आले.

१. बोधघाट प्रकल्पामुळे बस्तर जिल्ह्याला किंवा आदिवासींना काहीही फायदा होणार नाही. बस्तरची वीज बस्तरच्या बाहेर जाणार. (हा प्रकल्प केवळ वीजनिर्मितीसाठी आहे सिंचनासाठी नाही.)

२. शासनाची आश्वासने व प्रत्यक्ष कृती यात मोठी दरी असते.

३. जंगलाचा ऱ्हास भरून निघणारा नाही. दुसऱ्या जागेवर जंगल उभारू यावर लोकांचा विश्वास नाही.

४. आदिवासी कल्याण विभागाला पुनर्वसनाच्या कामात काहीही भूमिका दिलेली नाही.

संशोधकांनी धरण प्रकल्पाच्या मुख्य अभियंता, इतर अभियंते आणि पुनर्वसनाचे कार्य करणारे नायब तहसीलदार यांच्याबरोबरही चर्चा केल्या. त्याचप्रमाणे पुनर्वसनाचा नंमुना म्हणून उभारलेल्या आदर्श गावाचीही पाहणी केली. विस्थापितांसाठी बत्तीस हजार (३२,०००) रुपये खर्चून एक लहान झोपडी बांधण्यात आलेली होती. आदिवासींच्या ऐसपैस झोपड्यांच्या तुलनेत ही 'आदर्श' झोपडी सर्वच बाबतीत गचाळ वाटत होती. ज्या गावात विस्थापितांना जमिनी देणार होते त्या जमिनी निकृष्ट स्वरूपाच्या आणि इतरांनी बळकावलेल्या होत्या. नायब तहसीलदारांच्या मते नुकसान भरपाईची किंमत ठरविणे अतिशय गुंतागुंतीचे असते. कारण आदिवासी भागात कागदावरील मालमत्तेची मालकी व प्रत्यक्ष ताबा यात बरीच तफावत असते.

बोधघाट धरण होणार म्हणून या भागात गेली कित्येक वर्षे विकासाची कामे घेण्यात आलेली नाहीत. त्यामुळे लोकात असंतोष आहे. विस्थापितांना मोबदला किती मिळणार यांची नक्की कल्पना लोकांना नाही. लोकांची उपजीविका आणि त्यांची देवदैवते जंगलात असल्याने जंगलाच्या जवळच पुनर्वसन व्हावे अशी त्यांची भावना आहे. साठ ते शंभर कि.मी. दूर वेगवेगळया खेड्यात पुनर्वसन झाल्यास त्यांचे आप्तेष्ट व नातेसंबंध विखुरले जाणार अशी त्यांना भीती वाटते. म. प्रदेश विद्युत मंडळाने जगदलपूरची औद्योगिक प्रशिक्षण संस्था ताब्यात घेतली आहे. प्रत्येक कुटुंबातील एका तरुणाला औद्योगिक प्रशिक्षण देऊन त्यांना नोकरी देण्याची हमी वीज मंडळाने घेतली आहे. परंतु आदिवासी खेड्यातील शाळांची परिस्थिती दयनीय आहे. अगंणवाडीच्या वयाची मुले इ. चौथीच्या वर्गात बदली विद्यार्थी म्हणून बसलेले आढळले. कारण त्यांचे इ. चौथीमधील भाऊ बहीण पालकांना मदत करण्याकरिता शेतावर किंवा जंगलात गेलेले होते. या भागात एकही आश्रमशाळा आढळली नाही. असे असताना ही मुले दहावी पास करून औद्योगिक प्रशिक्षण कसे घेणार? तसेच आदिवासी स्वतःची घरे शतकानुशतके स्वतः उभारीत असतांना आणि जमिनीची मशागत स्वकष्टाने करीत असतांना त्यांना कंत्राटदार द्वारा बांधलेली महाग व गचाळ घरे आणि यंत्रद्वारा जमिनीची मशागत करून दिल्यास कोणाचे हित साधणार आहे? त्यापेक्षा घरबांधणी व जमीन कसण्यासाठी आदिवासींना श्रम मोबदला देणे जास्त संयुक्तिक ठरेल.

आदिवासींच्या म्हणण्यानुसार आसपासच्या जंगलात झाडे नसलेली बरीच पडीक जमीन आहे, ती जमीन शासनाने त्यांना उपलब्ध करून द्यावी असे त्यांचे म्हणणे आहे. तसे न झाल्यास आदिवासी ती जमीन बळकावतील हे उघड आहे. या धरणग्रस्त खेड्यांमधील बिगर आदिवासी शेतमजुरांना रोखीचे काम मिळेल म्हणून धरण हवे आहे. अभियंत्यांच्या म्हणण्यानुसार आदिवासी लोकही धरणावर काम करावयास येतील. तसे झाल्यास धरणाच्या आसपास गलिच्छ वस्त्या निर्माण होणार हे उघड आहे. याची जाणीव अभियंत्यांना आहे. परंतु त्याची त्यांना पर्वा नाही. त्यांना धरण हवे पण धरणाच्या आड येणारे आदिवासी नको आहेत. कारण तो औद्योगिक प्रगतीच्या मार्गातील अडसर आहे. डुबान क्षेत्रातील खेड्यांतील सावकारांना वेगळ्या कारणास्तव हे धरण नको आहे. अनेक वर्षे दहा हजार लोकांच्या जीवावर सावकारी करणारे, पुनर्वसनामुळे हे लोक विखुरले गेले, तर सावकारी बुडेल अशी भीती बाळगून आहेत. धरणाच्या विरुद्ध आमदार, खासदारांना उभे करणे व त्यासाठी पैसा पुरविणे या गोष्टीही सावकार करीत असतात.

**पुनर्वसनासंबंधी सूचना**

१. स्थलांतर व पुनर्वसन करताना स्थानिक लोकांना विश्वासात घेऊन संवाद साधावयास हवा. तसेच ज्या गावात पुनर्वसन होणार आहे तेथील लोकांनाही विश्वासात घेणे आवश्यक आहे.

२. शिक्षणाच्या प्रगतीसाठी डुबान क्षेत्रातील मुलांना आश्रमशाळेत प्रवेश देण्यात यावा. म्हणजे ते औद्योगिक प्रशिक्षणास पात्र होतील.

३. सध्या आदिवासी वर्षातून एकच पीक घेतात. दुसरे पीक घेण्याबाबत आणि शेती उत्पादन वाढविण्याबाबत, शास्त्रीय माहिती व मदत त्यांना देण्यात यावी.

४. दैनंदिन संसाराची भांडी कपडे इ. त्यांना भेट रूपाने द्याव्यात त्यामुळे त्यांचा विश्वास संपादन होईल.

५. आदिवासींचे कोंबड्यांच्या झूंजीबाबतचे आकर्षण बघून त्याबाबतच्या स्पर्धा आयोजित करण्यात याव्यात. तसेच कुक्कुटपालन व दुग्ध व्यवसायास लोकांना प्रोत्साहित करावे.

03487 2B

६. पुनर्वसनासाठी दूर जाणाऱ्या लोकांना इतरांपेक्षा जास्त नुकसान भरपाईचा मोबदला देण्यात यावा.

७. खादी ग्रामोद्योग मंडळातर्फे मधुमक्षिका पालन, रेशीम किडे पालन यांसारखे उपक्रम राबविण्यात यावेत.

८. ज्या गावांमध्ये पुनर्वसन होणार आहे त्या गावांचे विद्युतीकरण, आरोग्य केंद्र आणि आश्रमशाळा अशा सोयी उपलब्ध करण्यात याव्यात.

या व अशा गोष्टींचा विचार करण्यासाठी खालील प्रमाणे समित्या करण्यात याव्यात -

१. स्थानिक आमदार/खासदार

२. डुबान क्षेत्रातील व पुनर्वसित क्षेत्रातील सरपंच आणि पाटील.

३. वन व आदिवासी कल्याण अधिकारी.

४. मानवशास्त्रज्ञ

५. नामवंत स्वयंसेवी संस्थाचे प्रतिनिधी.

पुनर्वसनाचे कार्य शक्यतो नामवंत स्वयंसेवी संस्थांना देण्यात यावे. शासकीय पातळीवर पुनर्वसनाचे संचालन स्वत: आदिवासी असलेल्या भारतातील कोणत्याही भारतीय प्रशासकीय सेवेतील अधिकाऱ्यास सोपविण्यात यावे.

सरदार सरोवराच्या संदर्भात अशाच प्रकारचे अध्ययन करून त्यास अनुसरून शिफारशी करणे शक्य आहे. याबाबत कार्यकर्त्यांनी व वाचकांनी आपल्या सूचना आमच्याकडे पाठविल्यास हाकारात त्याचे स्वागत होईल.

**रा. के. मुटाटकर**

# प्रचंड धरण = प्रचंड विकास ! कोणाचा?

**विजय परांजपे**

विजयनगराच्या साम्राज्यापासून आणि नंतर मुसलमान राजवटीतही नद्यांतील जादा पाण्याचा संपूर्ण उपयोग करण्याच्या सर्व पद्धतीत आम्ही पारंगत होतो. आमच्या जवळजवळ सर्व जुन्या शहरांच्या नजीक असलेले 'तलाव' आणि 'झील' ह्या गोष्टीचीच साक्ष देतात. पुराच्या पाण्याची आपत्ती टाळण्यासाठी 'बंधारे' बांधले गेले आणि पवनचक्की, जिचा उपयोग हिमालयातील रहिवासी आजही धान्य दळण्यासाठी करतात, ते तर जलशक्तीचा उपयोग करणारे सर्वात सुलभ आणि स्वस्त साधन आहे. जलशक्तीचा उपयोग करणाऱ्या या गोष्टीत मुख्यत: पावसाचे पाणी मोठमोठ्या टाक्यांतून कोंडणे आणि नंतर कालव्यांच्या सहाय्याने दुष्काळी, कोरड्या भागापर्यंत पोहोचविणे ह्या गोष्टीचाच समावेश होता. ही कामे लहान लहान नद्यांवर केल्यामुळे मोठ्या नद्यांच्या प्रवाहाला कोणत्याही प्रकारचा अडथळा येत नव्हता किंवा नैसर्गिक 'जल-चक्राला' धक्का लागत नव्हता. (१७८९ मध्ये बांधले गेलेले यमुना कालवे व आर्थर कॉटनने १८३६ मध्ये बांधलेले Anicut हेच फक्त अपवाद ठरावेत.)

परंतु बदलत्या काळात मोठमोठी धरणे बांधण्यावर भर दिला गेला व ब्रिटिश आमदानीत शंभरावर मोठी धरणे बांधली गेली. पूरग्रस्त लोकांना तात्पुरता रोजगार मिळवून देणे व त्यांच्यासाठी पाटबंधाऱ्यांची कायमची व्यवस्था करणे हाच; ही मोठी धरणे बांधण्यामागील उघड हेतू होता. १८७८ व १८९८ मध्ये स्थापन झालेल्या दुष्काळ समितीने' व १९०१ मध्ये निर्माण झालेल्या 'पाटबंधारे समितीने' ही धरणे बांधण्याचा निर्णय घेतला होता. चालू शतकाच्या तिसऱ्या दशकात परदेशातून सिमेंट आयात करून 'मिठूर' येथे पहिला सिमेंट-कॉँक्रीटचा बंधारा बांधला गेला; परंतु दुष्काळ निवारणाचे सर्व प्रयत्न चालू असूनसुद्धा १९४३-४४ मध्ये देशाला तीव्र दुष्काळाला तोंड द्यावे लागले.

चालू शतकाच्या पूर्वार्धात बांधकाम करणे फारसे खर्चाचे नव्हते. कारण घडामोडींना जोमाने सुरुवात झाली नव्हती. शिवाय पाटबंधाऱ्यांवर खर्च केली जाणारी रक्कम एकूण खर्चाच्या मानाने फारच थोडी होती.

भूपृष्ठाखालील पाण्याच्या उपयोगासंबंधी फारच थोडे तांत्रिक ज्ञान अवगत होते. पाण्याने वाहून आणल्या जाणाऱ्या गाळाच्या बदलत्या प्रमाणाविषयीही फारच थोडी माहिती उपलब्ध होती. त्याचप्रमाणे फार मोठा जलस्तंभ (पाण्याचा साठा) कोंडला गेल्यामुळे होणाऱ्या भूवैज्ञानिक परिणामाचे महत्त्व सिद्ध झाले नव्हते. म्हणूनच दुष्काळ आणि महापूर ह्या दोन्ही संकटांवर मोठाली धरणे बांधणे हा एकच तोडगा होता.

स्वातंत्र्योत्तर काळात मोठ्या धरणांचे महत्त्व वाढतच राहिले आणि हिराकूड, दामोदर यांसारख्या भव्य धरणांची निर्मिती झाली. भाक्रा- नानगल प्रकल्पाच्या पूर्ततेनंतर 'प्रगतिपथावरील मंदिरे व स्मारके' असाच धरणांचा निर्देश करण्यात येऊ लागला.

जलविद्युत केंद्रातून निघालेल्या तारांच्या पलटणी आणि कालव्यांच्या दुतर्फा सळसळणारी हिरवीगार शेते यामुळे जनमानसात धरणांची इतकी आकर्षक प्रतिमा तयार झाली होती की, धरणांवरील खर्च व त्यांचे फायदे यांचे योग्य मूल्यमापन करणे अनावश्यक वाटत होते. धरणांमुळे फार मोठ्या भूभागाला पाणी पुरवठा झाला व मोठे दुष्काळ ही असंभवनीय गोष्ट झाली, याबद्दल कुणाचेच दुमत होण्याचे कारण नाही. १९५०-५१ मध्ये पाणी पुरवठा झालेल्या एकूण २०९ लाख हेक्टरपैकी ६८.४% पाणी पुरवठा कालवे व विहिरी यापासून झाला होता, तर १९७३-७४ मध्ये पाणीपुरवठा झालेल्या ३२६ लाख हेक्टरपैकी ८०% पुरवठा विहिरी व कालवे यापासून झाला होता. पाणी पुरवठा झालेल्या जमिनीचे प्रमाण १९५१ मध्ये १७.६% होते ते १९७४ पर्यंत २३% इतके वाढले; परंतु धरण प्रकल्पांचे मूल्यमापन करण्यास प्रतिबंध करण्याइतकी ही प्रगती पुरेशी नाही. आजपर्यंत राज्य पाटबंधारे खात्यातर्फे धरणप्रकल्पांच्या परिणामाचे विश्लेषण करण्याचे कोणतेच प्रयत्न झालेले नाहीत, ही धक्कादायक गोष्ट आहे.

नियोजन समितीने १९५८ नंतर केलेल्या सारडा कालवा, गंग-कालवा, त्रिवेण-कालवा, दामोदर-कालवा, कावेरी, मिठूर व निजामसागर या प्रकल्पांच्या पाहणीचा उल्लेख येथे करणे आवश्यक आहे. संकल्पित प्रकल्पांची संभवनीयता पडताळून पाहण्यासाठी अधिक सोयीस्कर कसोटी ठरविण्याच्या दृष्टीनेच ही पहाणी करण्यात आली होती. या पाहणीनंतर नियोजन समितीने (Planning commission) काही गुणवत्ता कसोट्या तयार केल्या. कोणत्याही प्रकल्पाने ह्या कसोट्या पूर्ण केल्याशिवाय त्यास आर्थिक अनुदान मिळत नसे. १९६४ पर्यंत आर्थिक उत्पादनक्षमतेविषयी असलेल्या कसोट्या अपुऱ्या किंवा संदिग्ध होत्या. ह्या कसोट्यांचा अपुरेपणा जाणवल्यावर फायदा-व्यय-कसोटीचा (Benifit-cost criterion) उपयोग करण्यास सुरुवात झाली. प्रत्येक प्रकल्पापासून फायदे हे त्या प्रकल्पावर केल्या जाणाऱ्या खर्चाइतके किंवा जास्त असले पाहिजेत हे तत्त्व लागू करण्यात आले व फायदाखर्चाचे १ : ५ हे प्रमाण ठरविण्यात आले; परंतु सरकारी अधिकाऱ्यांनी व यंत्रज्ञांनी ह्या कसोट्यांचा मूळ उद्देश बाजूस सारला व प्रकल्पाची संभवनीयता ठरविताना प्रकल्प सर्व कसोट्या उत्तम तऱ्हेने पूर्ण करतो आहे. असे भासविण्याची खबरदारी घेतली. नियोजन समितीकडून आर्थिक मदत मिळवणे हाच यामागील एकमेव उद्देश होता. हे अंदाज वस्तुस्थितीला धरून नव्हतेच. तज्ज्ञांच्या समितीने केलेल्या पाहणीत असे आढळून आले की, प्रकल्पाच्या प्रारंभी केले गेलेले खर्चाविषयीचे अंदाज साफ चुकले होते व खर्च १०८% इतक्या प्रचंड प्रमाणात वाढले होते. व्यय-फायदा गुणोत्तरावर ह्या घटनेचा धक्कादायक परिणाम होतो, हे स्वाभाविकरित्या कळू शकेल आणि एवढे असूनही आरंभी केलेले खर्चविषयक अंदाज योग्य आहेत किंवा नाहीत हे तपासून बघण्यासाठी कोणतीही पद्धती अस्तित्वात नाही. परिणामत: नवीन प्रकल्पांची संभवनीयता ठरविताना पूर्ण झालेल्या प्रकल्पांविषयीचे अनुभव लक्षात घेतले जातातच असे नाही.

प्रकल्पांचे साकल्याने (सुयोग्य) मूल्यमापन करण्याच्या आड काही निर्विवादपणे गृहीत धरलेल्या गोष्टी येतात. सर्वांत प्रामुख्याने गृहीत धरलेली धोकादायक गोष्ट म्हणजे प्रकल्पापासून मिळणारे प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष फायदे इतके प्रचंड आहेत की, खर्चातील वाढ किंवा प्रकल्प पूर्ण होण्यास

झालेला उशीर यांचा फारसा परिणाम त्यांच्यावर होत नाही. याखेरीज प्रकल्पाचे फायदे मुख्यत: ग्रामीण भागातील गरीब जनतेला मिळतात व मानवी जीवनावर धरणांचा कोणताही दुष्परिणाम होत नाही असेच मानले जाते. जलशक्तीपासून होणारी विद्युतनिर्मिती ही इतर कोणत्याही शक्ती ऊर्जेपासून होणाऱ्या विद्युतनिर्मितीपेक्षा अधिक किफायतशीर असते असेच समजले जाते. थोडक्यात दुष्काळ, महापूर आणि ऊर्जाटंचाई या तीन गंभीर प्रश्नांवर धरणे बांधणे हा एकच तोडगा आहे असे गृहीत धरले जाते.

**धरणांकडे आणखी एक दृष्टिक्षेप**

१९७९ पर्यंत केन्द्र शासनाने ७५८९१ कोट रुपये खर्च केले. त्यापैकी १०५५६ कोट रुपये म्हणजेच १३.९% खर्च निरनिराळ्या लहान-मोठ्या धरणांवर व कालव्यांवर झाला. आजमितीला १५०० हून अधिक मोठी धरणे भारतात अस्तित्वात आहेत. साहजिकच एवढ्या मोठ्या प्रमाणावर घडणाऱ्या घडामोडी केवळ गृहीत धरलेल्या गोष्टींवर व समजुतींवर तशाच पुढे चालू ठेवणे योग्य नव्हे. प्रत्येक मोठ्या व मध्यम प्रकल्पाच्या खर्चाच्या अंदाजाची सतत तपासणी करीत राहणे जरूरी आहे.

(Culturable Command Area (CCA) १०००० हेक्टर किंवा त्याहून जास्त असल्यास त्या प्रकल्पास मोठा व ५००० ते १०००० हेक्टर असल्यास त्या प्रकल्पास मध्यम मानले जाते.)

गेल्या तीन वर्षात उत्तर भारतात (उत्तर प्रदेश, बिहार, आसाम) आलेले महापूर पूर्वी कधीही आलेले नव्हते. तसेच महाराष्ट्रात कोयना धरणाच्या बांधकामानंतर झालेल्या भूकंपाने व नुकत्याच गुजराथेत मोर्वी व मच्छू येथे घडलेल्या दुर्घटनेमुळे अशा प्रकल्पातील प्रचंड धोकेही आपल्या नजरेसमोर आले आहेत. मोठ्या धरणांच्या उपयुक्ततेविषयीचा आरंभीचा उत्साह मावळून योग्यायोग्यतेचा नीट विचार करण्याची वेळ येऊन ठेपली आहे. जोखमीच्या कामात खाचखळगेही (अडचणी) मोठेच असतात, हे अनुभवानेच सिद्ध झाले आहे आणि मग प्रश्न असा उभा राहतो की, आपण चुकत तर नाही ना?

धरणांविषयीच्या गृहीत गोष्टी आजच्या काळातही कितपत टिकाऊ ठरतात हे तपासून बघितले पाहिजे. भारतातील मोठ्या व मध्यम धरणांच्या बाबतीत बऱ्याच गृहीत गोष्टी चूक ठरतात हे सप्रमाण सिद्ध करता येईल. प्रस्तुत लेखाची मध्यवर्ती कल्पना हीच आहे.

वाढत्या किंमती आणि काम पूर्ण होण्यास लागणारा विलंब यांचा फारसा परिणाम न होण्याइतके मोठ्या धरणांपासून मिळणारे फायदे प्रचंड आहेत का? धरणांपासून मिळणारा पहिला मोठा फायदा म्हणजे पाणीपुरवठा व त्यामुळे शेतीउत्पादनात होणारी वाढ! निव्वळ नफ्याचा विचार करताना असे गृहीत धरले जाते की, पाणीपुरवठ्याचा १००% उपयोग केला जात आहे; परंतु प्रत्यक्षात मात्र काही ना काही कारणांनी पाणीपुरवठा होणे शक्य असलेल्या ८.८ दशलक्ष हेक्टर जमिनीपैकी फक्त ७.२ दशलक्ष हेक्टर जमीनीलाच पाणीपुरवठा होत आहे! म्हणजेच पाणीपुरवठा होणे शक्य असूनही १.६ दशलक्ष हेक्टर जमीन पाणी वापरीत नाही. खाजगी पाहणीनंतर असे दिसून आले आहे की, अनेक प्रकल्पात पाणीपुरवठ्याची सुविधा १५ वर्षांपेक्षा अधिक काळ उपलब्ध करूनसुद्धा २०% पेक्षा जास्त पाण्याचा उपयोग केला जात नाही. म्हणजेच ८०% क्षमतेचा उपयोग केला जात नाही. पवना धरणाच्या पाणलोट क्षेत्रात नुकत्याच केल्या गेलेल्या पाहणीत असे आढळून आले आहे की, पश्चिम

महाराष्ट्रातील हे धरण बांधून आठ वर्षे झाली तरी पाणीपुरवठ्यायोग्य जमिनीपैकी फक्त १३% जमिनीलाच पाणीपुरवठा होतो आहे. ह्या वस्तुस्थितीचा उघड परिणाम असा होतो की, व्यय-फायदा-गुणोत्तर त्या प्रमाणात कमी होतो. (१९६३ महाराष्ट्र सरकारच्या अहवालाप्रमाणे भीमाप्रकल्पाचे व्यय-फायदा-गुणोत्तर ६.२९ असे होते तर १९७४ मध्ये प्रकल्प पूर्ण झाल्यावर हे गुणोत्तर १:७४ इतके कमी झाले होते. १९८० मध्ये सर्व खर्चाची तोंडमिळवणी झाली तेव्हा हे गुणोत्तर प्रमाण ०९ इतके कमी झाले होते. नैसर्गिक साधनसंपत्तीचे झालेले नुकसान व रहिवाशांच्या पुनर्वसनाचा खर्च वजा जाता हे प्रमाण .४६ इतके कमी झाले.)

**जाणीव असूनही दुर्लक्षच**

अंदाज केलेल्या प्रमाणापेक्षा प्रत्यक्ष गुणोत्तर प्रमाणात पडणाऱ्या प्रचंड तफावतीचे मुख्य कारण खर्च व फायद्यांविषयी केले गेलेले चुकीचे अंदाज हे होय. धरणाच्या खर्चाविषयीचे हे अंदाज सातत्याने प्रचंड प्रमाणात चुकीचे ठरत आहेत या गोष्टीची सरकारी अधिकाऱ्यांना पूर्ण जाणीव असूनही धरणांचा प्रारंभीचा खर्चविषयक अंदाज सतत कमीच दाखवला जातो, ह्या गोष्टीवरच आमचा रोख आहे. पाटबंधारे खात्यावरील जनतेच्या विश्वासाला तडा जात आहे. ह्या घटनेच्या काही कारणांचे विश्लेषण करणे आवश्यक आहे.

(अ) धरणाच्या बांधकामासाठी लागणाऱ्या साधनसामुग्रीच्या किंमती भयानक प्रमाणात वाढल्या आहेत. या उलट फायदे (शेतीउत्पादने, धान्य, फळफळावळ, भाजीपाला इ. किंमती) त्या प्रमाणात वाढले नाहीत. किंमतीमधील या असंतुलित वाढीमुळे व्यय-फायदा-गुणोत्तर प्रमाणाला धक्का बसला आहे.

(ब) प्रारंभी पुरेशी तपासणी न केल्यामुळे गृहीत न धरलेल्या अनेक गोष्टींवर जादा खर्च करावा लागतो. (पूल, कालव्यांचे फाटे इ.) तसेच नुकसान भरपाई व पुनर्वसनाचा खर्च वाढत जातो. (कारण पाटबंधारे खात्याने ठरविलेल्या जमिनीच्या किंमती बहुधा अन्याय प्रमाणात कमी असतात)

(क) किंमतीत भरमसाठ वाढ होण्यास असणारे एक प्रमुख कारण म्हणजे अनेक प्रकल्प पूर्ण होण्यास लागणारा उशीर. हा उशीर वाहतुकीच्या अडचणी, यंत्रसामुग्री किंवा कच्चा माल न मिळणे यांसारख्या अनेक कारणांनी होतो. धरणे दुरुस्तीचा व नीट राखण्याचा, खर्चही मोठ्या प्रमाणात वाढला आहे.

(ड) सध्या अस्तित्वात असलेल्या अनेक योजनांत दोषपूर्ण Head work, पाणी निचऱ्याची अयोग्य व्यवस्था यासारख्या अनेक तांत्रिक चुका आहेत.

(इ) भविष्यकालीन फायद्याचे प्रमाण कमी करणारे प्रमुख कारण म्हणजे पाण्याच्या साठ्यात (टाक्यांत) जलद गतीने साचणारा गाळ. पाणीपुरवठा क्षेत्राचे जतन करण्याकडे संपूर्ण दुर्लक्ष केल्यामुळेच गाळ साठण्याची गती वाढते.

अपुरी प्रारंभिक तपासणी, उशीर, अकार्यक्षमता, पाणलोटक्षेत्राची अपुरी व्यवस्था, किंमतीतील असंतुलित वाढ या कारणांना योग्य उपाय शोधल्याखेरीज धरणांपासून मिळणारा प्रचंड फायदा हे एक स्वप्नच राहील. जनतेची अशी समजूत करून दिली जाते की, खर्चापेक्षा फायदा जास्त असणारे प्रकल्पच हाती घेतले जातात व त्यापासून खरोखरच प्रचंड फायदे मिळतात.

आता मोठ्या धरणांच्यामुळे होणाऱ्या सामाजिक व परिस्थितिजन्य दुष्परिणामांकडे लक्ष देऊया. औद्योगिकरणामुळे व शहरीकरणामुळे होणाऱ्या प्रदूषणांविषयी

पुष्कळच बोलले जाते; परंतु मोठमोठ्या धरणांमुळे सभोवतालच्या क्षेत्राचे जे प्रचंड नुकसान होते त्याबद्दल फारच थोडी वाच्यता केली जाते. तेव्हा अशा काही अडचणींची पुढे चर्चा करू.

**जमिनीची झीज:**

धरण बांधताना सुरुवातीला पाणलोटक्षेत्राच्या आसपास अनेक लहान-मोठे रस्ते बांधले जातात व असे रस्ते बांधताना बरीच जंगलतोड होते. डोंगरउतारावर रस्ते बांधले जातात आणि त्यासाठी पुष्कळ माती, मुरुम, खडक खोदला जातो. हे काम होणाऱ्या नुकसानाची पर्वा न करता केले जाते. कच्चे रस्ते योग्य पन्हळ अथवा आधाराशिवाय बांधले जातात एखाद-दुसऱ्या पावसाळयानंतर रस्ते धुपून जातात. ह्या धुपणीमुळे भूस्खलन होण्याची प्रक्रिया आणखी जलद होते. जमिनीच्या झिजेमुळे पाण्याच्या साठ्यात (जलाशयात) गाळ साठण्याचे प्रमाण वाढते. त्यामुळे धरणाची पाणी साठण्याची क्षमता कमी होऊन धरणाचे आयुष्यमान कमी होते. निरनिराळ्या पाहणीतून असे दिसून आले आहे की, भारतातील धरणांची पाणी साठविण्याची क्षमता जलाशयात साचणाऱ्या गाळामुळे प्रतिवर्षी १.५ ते २% इतकी कमी होते. (जपानमधील Tenrya नदीवरील यासुका (yasuoka) तलावाची क्षमता तेरा वर्षात ८५% इतकी कमी झाली, तर नाइल नदीवरील अस्वान (Aswan) धरणामुळे तेथील शेतकरी तलावात साठणाऱ्या सुपीक गाळापासून मिळणाऱ्या फायद्यांना मुकले.)

नुकत्याच केल्या गेलेल्या अकरा तलावांच्या पाहणीत असे दिसून आले की, प्रत्येक शंभर चौरस किलोमीटर पाणलोटक्षेत्रात खडक बनविणारा गाळ साठणाऱ्या क्षेत्राचे प्रमाण सहा हेक्टरमीटर ते १६.६ हेक्टरमीटर इतके म्हणजे अपेक्षित प्रमाणाच्या दुप्पट ते पाचपट आहे. निजामसागर तलावाची ३६% क्षमता नष्ट झाली असून आता त्याच्यापासून केवळ ६००० हेक्टर क्षेत्रालाच पाणीपुरवठा होऊ शकतो. (प्रारंभी ११००० हेक्टर क्षेत्राला पाणीपुरवठा होत असे.) अशीच घट मयूराक्षी आणि घोड तलावातही अपेक्षित आहे. अशीच धक्कादायक परिस्थिती इतरही अनेक ठिकाणी निर्माण झाली आहे. हिमालयातील नद्यांचे गाळ वाहून आणण्याचे प्रमाण सपाटीवरील नद्यांपेक्षा बरेच जास्त असल्याने तिथे हा धोका फार मोठ्या प्रमाणात जाणवेल. भारतीय पाटबंधारे-इतिहासात टेहरी (Tehri) धरण हे अशा प्रकारच्या संकटाचे सर्वांत मोठे उदाहरण ठरण्याची शक्यता आहे. टेहरी-गढवाल प्रदेशात जंगलतोडीमुळे आणि उतारावरील रस्त्यांमुळे अनेक भूस्खलनाचे (प्रस्तरभंगाचे) प्रकार घडले आहेत व यामुळे शेकड्यांनी जीवितहानी व कोट्यावधी रुपयांच्या साधनसंपत्तीचा नाश झाला आहे. या प्रदेशातील टेकड्या भौगोलिकदृष्ट्या इतक्या अस्थिर व कमकुवत आहेत की, लहानशा सुरुंगामुळे देखील मोठ्या प्रमाणात भूस्खलन घडून येते व कृत्रिम सरोवरे तयार होतात. भागीरथीच्या वाढत्या दाबामुळे सरोवरे फुटून विध्वंसक पूर आले.

**वन्य प्राण्यांचा विनाश**

मोठ्या धरणामुळे अनेक लहान लहान खेडी पाण्याखाली जातात आणि तेथील रहिवाशांचे पुनर्वसन करणे कठीण पडते. परिणामत: रहिवासी डोंगरातील अधिक उंच भागात जाऊन वस्ती करतात व उपजीविकेसाठी जंगलतोड करतात. ह्या जंगलतोडीमुळे जमीन उघडी पडते व जमीन व वनस्पती नष्ट होण्याची क्रिया जलद घडू लागते. जनावरे व इतर पाळीव प्राणी चरण्यासाठी नवीन कुरणांच्या शोधात

जंगलात हिंडू लागतात व जंगली प्राणी अधिक घनदाट अरण्यात ढकलले जातात व शिकाऱ्यांच्या तावडीत सापडतात. पश्चिम महाराष्ट्रातील पवना, मुळशी आणि कोयना येथील 'कातकरी' लोकांना पूर्वी शेतांवर रोजगार मिळत असे; परंतु आता शेते पाण्याखाली गेल्यामुळे लहान लहान भट्ट्यांतून तयार होणारा कोळसा विकण्याखेरीज त्यांना गत्यंतरच नाही. धरणांमुळे नैसर्गिकरित्या होणाऱ्या जंगलतोडीपेक्षा अनेक पटींनी जास्त जंगलतोड होते. सदाहरित वनराई असलेल्या पश्चिम घाटात जवळ जवळ वीस धरणे तयार होत आहेत. तेथील हजारो एकरातील वृक्ष तोडले गेले आहेत किंवा येत्या दहा वर्षात तोडले जातील. 'काळी' च्या पहिल्या व दुसऱ्या टप्प्यात २४३५० एकरांतील वृक्ष तोडले गेले आणि 'भेडती' धरणामुळे २०००० एकर जंगल नष्ट होणार! सुप्रसिद्ध इडिक्की (Idukki) धरणामुळे हजारो एकरांतील हिरवीगार वनराई नष्ट झाली, जिची पुन:निर्मिती अशक्यप्राय आहे. देशाच्या वनसंपत्तीविषयीच्या धोरणानुसार एकूण भूभागापैकी ३३% भूभाग जंगलाखाली असावा; परंतु प्रत्यक्ष पाहणीत फक्त २०.५% भूभागच जंगलाखाली आहे असे दिसून आले. खाजगी पाहणीत तर हे प्रमाण १६.५% इतके कमी आहे असे आढळले.

**भूकंप :**

द्विपकल्प कवचामध्ये (Pennisul shield) बांधल्या गेलेल्या 'कोयना' धरणाला भूकंपाचा धोका नाही असे मानले जात असे; परंतु १९६७ मध्ये कोंडलेल्या पाण्याच्या दबावामुळे भूगर्भशास्त्रात 'Strike-slip-movement' म्हणून ओळखली जाणारी घटना घडली व त्यामुळे Risher scale वर सहापेक्षाही जास्त तीव्रता दाखविणारे भूकंपाचे धक्के लागोपाठ बसत राहिले. डिसेंबर ६७ मध्ये बसलेल्या धक्क्यामुळे दोनशेपेक्षा जास्त जीवितहानी झाली. अशाच प्रकारच्या घटना ऱ्होडेशियातील झांबसी नदीवरील कोरीबा (Koriba) धरण, अमेरिकेतील Kremasta धरण आणि रशियातील अनेक धरणांबाबत घडल्या आहेत. १) पाण्याच्या पातळीच्या वाढीचे प्रमाण २) पाण्याच्या साठवणाचा काळ ३) पाण्याची उच्चतम पातळी ४) पाण्याची पातळी उच्च असण्याचा काळ या धरणांशी निगडित असलेल्या सर्व गोष्टींचा भू-पृष्ठाच्या हालचालींशी निकटचा संबंध आहे, असे शास्त्रीयदृष्ट्या सिद्ध झाले आहे. म्हणून प्रत्येक धरणाच्या खर्चापैकी काही ठराविक रक्कम (साधारण १%) भूकंप निवारण निधी म्हणून वेगळी काढून ठेवली पाहिजे व असे संकट आल्यास संकटग्रस्तांना मदत किंवा दान म्हणून पैसे न देता नुकसानभरपाई हा त्यांचा हक्क मानून या कायम स्वरूपाच्या निधीतून पैसे दिले गेले पाहिजेत.

**महापूर :**

धरणांमुळे नद्यांच्या प्रवाहात समतोल राखला जाऊन पुराचा धोका टळतो; परंतु साचणाऱ्या गाळामुळे धरणाची कार्यक्षमता कमी होऊन अचानक आलेला लोंढा थोपवू न शकल्याने पुराचा धोका उद्भवतो. कधीकधी दाण्याची पातळी जास्तीत जास्त किती होईल, याविषयीचे अंदाज चुकतात. धरण फुटू नये म्हणून जास्तीचे पाणी सोडणारे दरवाजे असतात; परंतु कधीकधी हे दरवाजे उघडूनही त्यांची क्षमता पुरी पडत नाही व धरण कोसळते. अशा वेळी जीवित व वित्तहानी फारच प्रचंड प्रमाणात होते. कारण धरणाच्या आसपासच्या क्षेत्रातील रहिवाशी पुराची मुळीच शक्यता नाही म्हणून निर्धास्त असतात. मोठ्या धरणांविषयीच्या जागतिक समितीने जगातील ८९२५ धरणांचा अभ्यास केल्यावर असे दिसून आले की, गेल्या १७५ वर्षात ४५० मोठे अपघात घडून आले व यातील बहुतेक अपघात सदोष

बांधकामामुळे व योग्य ती काळजी न घेतल्यामुळे घडून आले होते. फक्त १४ अपघात युद्धामुळे व भूकंपामुळे घडून आले. यावरून धरण फुटल्यामुळे होणाऱ्या प्रचंड नुकसानीला मनुष्य स्वत:च जबाबदार आहे ही गोष्ट दिसून येते. भारतात १९७४ पर्यंत बांधलेल्या ४३३ धरणांपैकी ४० धरणे फुटली. धरणे फुटण्याचे जागतिक प्रमाण ५.९% इतके तर, भारतात ते ९.५% आहे! म्हणूनच धरणाच्या एकूण खर्चापैकी निदान २% रक्कम तरी अशा अनपेक्षित संकटासाठी आधीच बाजूला काढून ठेवणे दूरदर्शीपणाचेच ठरेल.

**जलविद्युत खरोखरच स्वस्त आहे का?**

सध्या असे गृहीत धरले जाते की, जलविद्युत सर्वात किफायतशीर आहे. जलशक्ती हे नूतनीकरणाजोगे (renewable) साधन आहे. म्हणजेच एका वर्षात न वापरलेली जलशक्ती (ऊर्जा) कायमची नाहीशी होत नाही. याउलट कोळसा व तेल यापासून मिळणारी शक्ती नूतनीकरणाजोगी नाही. म्हणजेच ह्या पिढीने वापरलेला प्रत्येक टन कोळसा पुढील पिढ्यांना उपलब्ध होऊ शकत नाही. शिवाय अशा प्रकारची शक्ती प्रदूषणापासून मुक्त असून नैसर्गिक संपत्तीचे नुकसान करीत नाही. जलशक्तीचा सर्वात मोठा फायदा हा आहे की, प्रामुख्याने पाणीपुरवठ्याचे उद्दिष्ट असलेल्या धरणापासून ती सहजपणे मिळू शकते. विद्युत्‌निर्मितीचा खर्च फारच अल्प, प्रत्येक युनिटला ५ ते ७ पैसे, इतका असतो. त्यामुळे जलविद्युत्‌निर्मितीवर स्वाभाविकपणे भर दिला जातो. (येत्या १५ वर्षात १०००० मेगावॅटइतकी उत्पादनक्षमता असलेली धरणे बांधावीत अशा योजना आहेत.) केरळ-कर्नाटकातील काही धरणांचा (इडकी, सरस्वती, काळी (भेडती) जलविद्युत्‌निर्मिती हा एकमेव फायदा आहे. अशा विशिष्ट धरणांच्याबाबतीत जल-विद्युत्‌निर्मितीचा खर्च बराच जास्त असतो. उदा. भेडती प्रकल्पाचा उत्पादनखर्च प्रत्येक युनिटला १८ पैसे इतका येतो. दुसरा महत्त्वाचा मुद्दा म्हणजे हजारो एकर हिरवीगार वने या धरणांमुळे पाण्याखाली जातात. ह्या जंगलापासून मिळणारे उत्पन्न प्रकल्पाच्या खर्चात मिळवले जात नाही, ही आश्चर्याची गोष्ट आहे. जल विद्युतनिर्मिती प्रकल्पाच्या जागेची निवड फारच विचारपूर्वक केली पाहिजे. कारण प्रत्येक जागी जलविद्युतनिर्मिती इतर प्रकारच्या विद्युतनिर्मितीपेक्षा अधिक किफायतशीर असेलच असे नाही. उदा. काळी प्रकल्प, ज्याचा एकमेव फायदा जलविद्युत्‌निर्मिती हा आहे. तेथील उत्पादनखर्च दर युनिटमागे १८ ते १९ पैसे गृहीत धरला आहे. शिवाय कित्येक एकर सदाहरित जंगले या प्रकल्पांच्या पूर्ततेसाठी तोडली गेली आहेत. त्यांचे उत्पन्न या खर्चात मिळवले तर प्रत्येक युनिट २२ पैशाला पडेल. इतर प्रकारच्या विद्युतनिर्मितीच्या साधनांपेक्षा हा खर्च बराच जास्त आहे.

ऊर्जा समस्येला आणखीही बाजू आहेत, ज्यांचा विचार आजतागायत केला गेलेला नाही. भारतातील ७०% जनता जंगलातील लाकूडफाट्याचा इंधन म्हणून उपयोग करते. त्यांना इंधनाची भव्य साधने (जलविद्युत्‌सुद्धा) परवडण्याजोगी नसतात. ह्या लोकांना (लाकूड-फाटा) अल्प किंमतीत उपलब्ध होणे अत्यंत जरूर आहे. प्रचंड प्रमाणात जंगलतोड झाल्यास गरीब जनतेचा इंधन मिळविण्याचा हा मोठा मार्गच नष्ट होईल.

व्यापारी इंधनाच्या (Commercial fuel) किंमतीत होणाऱ्या वाढीचा दर हा आम जनतेच्या दरडोई उत्पन्नापेक्षाही जास्त आहे. म्हणून जळाऊ लाकूड नष्ट करून केलेली विद्युतनिर्मिती अन्याय्य आहे. कारण तिचा



03487 4B

वापर समाजातील आर्थिकदृष्ट्या सबळ घटकच करू शकतील. गरीब जनतेपासून लाकडी इंधन हिरावून घ्यायचे नसेल तरच जलविद्युत निर्मिती योग्य ठरेल व तसे घडणार नसेल तर मोठाच अन्याय होईल व आर्थिक विषमता वाढीस लागेल.

वरील विवेचनावरून प्रस्तुत लेखक धरणे बांधण्याच्या विरुद्ध आहे असा समज होईल, तो काही अंशी खरा असला तरी वस्तुस्थिती तशी नाही. भारताच्या आर्थिक इतिहासात धरणांची कामगिरी किती महत्त्वपूर्ण आहे याची पूर्ण जाणीव आम्हाला आहे. धरणांपासून मिळणारे फायदे केवळ गृहीत न धरता त्यांचे योग्य विश्लेषण करावे असा लेखकाचा आग्रह आहे. कोणत्याही राजकीय पक्षाशी संबंधित नसलेल्या संशोधकांनी किंवा सामाजिक, शैक्षणिक संस्थांनी अशा धरणांपासून मिळणाऱ्या अप्रत्यक्ष सामाजिक फायद्या-तोट्याचा अभ्यास करावा व धरणांचे खरे स्वरूप उघड करावे. ह्यात कोणत्याही विशिष्ट सार्वजनिक संस्थेच्या अकार्यक्षमतेबद्दल दोषारोप करण्याचा हेतू नाही; परंतु जनतेच्या पैशाच्या बळावर चालणाऱ्या मोठ्या संस्थांच्या सर्वसाधारण प्रवृत्तीबद्दल नापसंती दर्शविण्याचा हेतू आहे.

(अ) कागदोपत्री आर्थिक लाभाचा काटा मोठ्या धरणांच्या बाजूला झुकलेला दिसला तरी भारतातील विशिष्ट परिस्थितीत (यंत्रसामुग्री व इतर साधने मिळण्यात येणाऱ्या अडचणी, अनेक प्रकल्प एकदम सुरू केल्याने आर्थिक सहाय्य वेळेवर न मिळणे, पुनर्वसनाच्या व नुकसानभरपाई देण्याच्या कामात अकार्यक्षमता व दिरंगाई) यामुळे लहान धरणेच अधिक लाभदायक ठरतील. लहान धरणात ह्याच अडचणी लहान प्रमाणात असल्याने त्या लवकर सोडविता येतात. ह्या लेखाचा निष्कर्ष असा आहे की, फायदा-खर्च कमी प्रमाणात असणारी लहान धरणेच शेवटी अधिक फायदेशीर ठरतील. पाणी अडवणे व प्रत्यक्ष पाणीपुरवठा ह्यात कमी काळ जाईल व फायद्याची वाटणी समप्रमाणात होईल.

(ब) धरण फुटण्यामुळे होणारे नुकसान कमी असेल - मोठी व लहान धरणे फुटण्याची शक्यता जरी सारखीच असली तरी लहान धरण कोसळल्याने होणारे नुकसान मोठ्या धरणापेक्षा कमी असेल. तसेच लहान धरणामुळे भूकंप होण्याची शक्यता मोठ्या धरणांपेक्षा कमी असेल.

(क) धरणग्रस्तांच्या पुनर्वसनाचा प्रश्न अधिक सुलभ होईल-मोठ्या धरणांपेक्षा जास्त संख्येने लोकांना धरणांसाठी जागा द्यावी लागेल; परंतु आसपासच्या खेड्यातून अशा निर्वासितांना सामावून घेणे जास्त सुलभ असते. याउलट मोठ्या धरणामुळे जागा नाहीशा झालेल्या सर्वांना आसपासच्या खेड्यांतून सामावून घेणे अशक्य असते. कारण निर्वासितांची संख्या प्रचंड असते. (कोयना धरणामुळे निर्माण झालेल्या निर्वासितांपैकी ७८१ कुटुंबांचे पुनर्वसन अजून व्हायचे आहे. कारण ३५००० निर्वासितांना आसपासच्या खेड्यांतून सामावून घेणे अशक्यच आहे.)

**निर्वासितांच्या समस्या :**

ह्या लोकांनी कुठे जायचे? ह्या लोकांच्या प्रश्नांना जबाबदार कोण? हे लोक शहरात जाऊन गलिच्छ वस्त्यात राहून भीक मागतात का? पाटबंधारे व ऊर्जा खात्याने ह्या ज्वलंत प्रश्नांचा गंभीररित्या विचार करण्याची वेळ येऊन ठेपली आहे. (एकट्या महाराष्ट्रातील सहा जिल्ह्यातच (सांगली, सोलापूर, सातारा, पुणे, कोल्हापूर, नगर) धरणांमुळे निर्वासित झालेल्यांची संख्या १,६०,००० इतकी आहे. हे निर्वासित केवळ २९ धरणांमुळे झालेले आहेत. मग भारतातील १,५०० धरणांमुळे होणारे निर्वासित व

त्यांच्या समस्या यांची कल्पनाच केलेली बरी. येत्या काही वर्षात ५०,००,००० लोक धरणांमुळे निर्वासित होतील. (यात पुनर्वसन झालेले निर्वासित मोजलेले नाहीत)

राजकीय निर्वासितांविरुद्ध एवढा गदारोळ माजविणारे राजकीय पक्ष, शासन लवकर व्यवस्था करू शकत नाही म्हणून ५० लाख लोकांच्या नशिबी बकाल आयुष्य येणार आहे त्याविरुद्ध कोणताच आवाज उठवीत नाहीत आणि ह्या गरीब जनतेच्या जिवावरच शहरी लोक ऊर्जाशक्तीचा उपभोग घेत आहेत, घेणार आहेत.

नुकत्याच केल्या गेलेल्या पश्चिम महाराष्ट्रातील मध्यम आकाराच्या धरणाच्या (पवना) पाहणीनुसार असे आढळून आले आहे, की, जमिनी, घरे इतर स्थावर मालमत्तेबद्दल दिली जाणारी नुकसानभरपाई मूळ किंमतीच्या केवळ ५०% असते. धरणग्रस्तांच्या पुनर्वसनासाठी दिली गेलेली गावे त्यांच्या मूळ गावापासून ५० मैल दूर असतात. धरणग्रस्तांची परिस्थिती यामुळे अधिकच कष्टदायक झाली आहे. सर्व प्रकल्पांच्या खर्चाचा बोजा करदात्यांवर पडतो, याच गोष्टीचा विचार केला जातो; पण धरणग्रस्तांना जी किंमत मोजावी लागते त्याचा मुळीच विचार केला जात नाही. धरणांचा फायदा समाजातील एका घटकाकडून दुसऱ्या घटकाकडे जातो, त्यामुळे संपत्ती व उत्पन्न यांच्यातील फरक वाढतच जातो. धरणाचा संभाव्य खर्च व फायदा यांचा विचार करताना, वरील गोष्टींचा विचार केला जात नाही.

लेखाचा समारोप करताना काही सूचना कराव्याशा वाटतात, ज्यांचा उपयोग मोठ्या व मध्यम प्रकारच्या धरणातील त्रुटी कमी करण्यासाठी केला जावा.

(अ) देशाच्या दृष्टीने सद्यःस्थितीलाच नव्हे तर भविष्यकाळातही महत्त्वपूर्ण ठरणाऱ्या भौगोलिक व सामाजिक घटकांचा संबंधित अधिकाऱ्यांनी गंभीररित्या विचार करावयास हवा. पाटबंधारे व ऊर्जा खात्याच्या अंदाजपत्रकात हे सामाजिक खर्च व फायदे मोजले जावेत.

(ब) धरणग्रस्तांना संपूर्ण नुकसान भरपाई ताबडतोब दिली पाहिजे. त्या कामासाठी तज्ज्ञांची समिती नेमून तिला खास अधिकार दिले पाहिजेत. ह्या समितीच्या संमतीशिवाय प्रकल्प पूर्ण झाला, असे प्रमाणपत्र मिळू नये. ठराविक कालावधीत पुनर्वसन न झाल्यास १५% अधिक नुकसान भरपाई मिळावी.

(क) धरण-बांधकामाबरोबरच, पाणी पुरवठाक्षेत्रात वृक्षसंवर्धनाला सुरुवात करावी. धरणाच्या सभोवतालचा १५०० फूट पट्टा हरितपट्टा म्हणून घोषित करावा व तेथील वृक्ष तोडण्यास बंदी करावी. 'देवराई' किंवा 'गावची जळाऊ लाकडासाठी असलेली राई' या संकल्पना पाणलोट क्षेत्रातील तसेच साठवण क्षेत्रातील खेडेगावात पुन्हा रूढ व्हाव्यात.

(ड) मोठ्या धरणांना दिले जाणारे अवाजवी महत्त्व कमी करून लहान धरणांना प्राधान्य दिले जावे. मोठ्या धरणाइतकीच पाणी पुरवठ्याची क्षमता असलेली लहान धरणांची मालिका तयार करावी व मोठ्या धरणापासून उत्पन्न होणारे धोके टाळावेत.

● ● ●

# धरण आहे नावाचं मोठं ।
# आम्हाला डोळाभर पाण्याची भेट ॥

— मेधा पाटकर

**नर्मदातीरावरच्या भिल्लांना खुद्द शहाद्या धडगावचे आदिवासी देखील 'जंगली' म्हणून ओळखतात. सरदारसागर धरणामुळे, सातपुड्यातील अक्राणीमहाल, अक्कलकुवा तालुक्यातील हे लोक विस्थापित होत आहेत. त्यांच्या गावागावातून पाड्यापाड्यांतून फिरून, आदिवासींना हाकारा घालत केलेली अशीही एक नर्मदापरिक्रमा.**

सातपुड्याच्या सातव्या रांगेच्या कुशीतलं जुनाना एक गाव. कुठल्याही आदिवासी गावासारखं वरवर विस्कळीत वाटणारं, तरी आतून सांधलेलं, टुमदारही. घरं सुमारे सत्तर, चार पाड्यात विखुरलेली. टेकड्यांमागून लपंडाव खेळत असल्यासारखी. जंगलात म्हटलं तरी साऱ्या डोंगरभागात जंगल फक्त टकलावरल्या केसांसारखं तुरळकच. जाड सागवानी लाकडांची प्रशस्त घरं सोडाच, त्यांचा एखादा वासाही झाकू न शकण्याइतपतच जंगल.

गावात शिरलो तेव्हा गाव तसं पहुडलेलंच. घराशेजारी कुठेकुठे बाईबापडा खुडुकमुडुक कामात. वाटेत नर्मदाकाठी भेटलेल्या ढोरक्याबरोबर कारभारी छेल्यादादाला निरोप दिलेला दुसऱ्यांदा. कारभारी गावचा म्होरक्या. त्याला टाळून गाव त्रयस्थाला सामोर जाणं कठीणच. चर्चा-विचारात तर बऱ्याच ठिकाणी कारभाऱ्याचाच कारभार. जुनान्यात पाटील, कारभारी भाऊभाऊ. घरंही शेजारीच पण तोंडं दोन दिशांना. त्याची काळजी आधीच घेतली होती. पाटलाच्या मुलाला बरोबर ठेवून वेगळा निरोप पाठवून, तरी गाव झटक्यात सामोरं येईना. पाड्यापाड्यांकडे पोरं पिटाळली. काही दुरूनच, आमच्या ऐवजी आमच्यापेक्षाही त्यांच्या अधिक ओळखीच्या 'भया' मागे पळता पळता निरोप घेऊन गेली.

**हे तिहेरी फेरे —**

बघता बघता पाड्यापाड्यांतून गाव गोळा झालं. "हाजा होय के?" म्हणत, आमच्यातल्या एकेकाला न्याहाळत विचारपूस. बऱ्याच जणांची नावानिशी, मागील भेटीच्या आठवणींसह चौकशी केली. सोंज्याची बाई मागच्या वेळेस खूप आजारी होती. धडगावला दवाखान्यात, चार डोंगर रांगा ओलांडून नेलं नव्हतंच. झिऱ्यादादाचं अतिक्रमणाचं शेत वरच्या पाड्यावर असल्यामुळे त्याला तिथे, इथे दोन घरं राखणं जड जात होतं. वगैरे वगैरे. जुनी चुरगळलेली नोटीस घेऊन आलेला पाल्यादादा तेवढ्यात मागूनच निघून जाऊ लागला. मागच्या वेळेसच त्याची नोटीस पाहण्याचं ठरलं होतं. मग? परततोय का विचारलं. म्हणाला, "बाय, तू कोयलं करीन आवलो. पूण आमुहू काय मुंदू, गाव डुबण्यं कि नाय?" म्हणजे? पुन्हा पहिल्यापासून सांगावं लागणार? तेवढ्यात मागेच उभा राहिलेला जोरदार पुढे झाला. "काय रे, पुन्हा पुन्हा काय विचारतो बाईला? ती एवढी गावात चालचालून आली तरी पटत नाही होय? 'आमुहू' म्हणू नको, 'मेहे' म्हण.



03487 5A

आम्हाला नाय तुझं पटत." तो चूप झालाही. पण मलाच चूप बसवेना. खोदत गेले. कळलं, "हापेश्वरच्या मंदिराचा महाराज सांगत होता, नर्मदामातेवर धरण वगैरे सगळं झूट आहे." महाराज मंदिराच्या शिवारातही प्रेमाने बघतही नसेल पण त्याचं (देवाच्या साक्षीने म्हटलेलं!) वाक्य कोरलं गेलं होतं. आमच्यावरचा विश्वास, आजवरच्या साऱ्या सरकारी घोषणा-लिखाणावरचा अविश्वास आणि महाराजाला दुरूनच वाहून ठेवलेली श्रद्धा अशा तिहेरी फेऱ्यात त्याचा विचार अडकला होता. जोरदारनेच मग त्याचा ताबा घेतला. "पाल्या, अरे त्या महाराजाचं ऐकतोस? आम्ही सारे गाववाले आता तयार झालोयत् तर तू एकटा... बाई, आम्ही अडाणी. असेच बसून रहातो म्हणून डुबूनच जातो नाहीतर काय? आता नाही बसणार. कलेक्टरला पण विचारणार, बाबा रे आमचं घर घेतोस, जमीन घेतोस. ता आमची हाडकंच विकायची राहिलीयत्, तेवढी तरी राहू देत..."

**सरकारच सर्वाधिक कायदेभंग करतं तेव्हा?**

सरदार सरोवर धरणामुळे बुडणाऱ्या धुळ्याच्या अक्राणी तालुक्यातल्या २४ गावांपैकी एक सुरुंग सोडलं तर बाकी सारी जंगलं जमिनीवरची. 'जमिनला जमीन' आणि 'घरला घर', 'माणसा-गुरांसाठी पाणी चारा' एवढंच लोकांच्या मनात स्पष्ट. तलाठी असो की कलेक्टर, बिचारे हात जोडून प्रकल्पग्रस्त त्याला पुन्हा पुन्हा सांगत असतात, नर्मदा वॉटर डिस्प्यूट्स ट्रायब्युनल कारण ॲवॉर्ड की न्यायाधीरण; कुठलाच कायदा लोकांना माहीत नाही, सांगितला गेलेला नाही. सांगू म्हटलं तर सरकारी अधिकाऱ्यांचीच पंचाईत. कारण ॲवॉर्डनुसारच करायचं म्हटलं तर लोकांच्या लक्षात बरंच काही येणार. **एक :** गुजरातमध्ये धरणक्षेत्रात जायची इच्छा नसल्यास, महाराष्ट्रातच पुनर्वसन तेही सर्व तत्त्वे, अटी पाहून करणं हे सरकारचं कर्तव्य आहे. ("गुजरातमध्ये गेलात तर खातेदाराला कमीत कमी पाच एकर जमीन, शाळा, दवाखाना वगैरे मिळेल" असं अर्धसत्यच अधिकारी सांगत असले तरीही.) **दोन :** ॲवॉर्डनुसार प्रत्येक खातेदाराला कमीत कमी पाच एकर जमीन असं म्हटल्यास, त्याच्या अंमलबजावणीसाठी अतिक्रमणदारांची (अक्राणीतील जवळ जवळ सर्वच शेतकऱ्यांची) निदान १९७८ पूर्वीपासून कसणाऱ्यांची, सरकारी ठरावाने मान्य झालेली जमीन मालकी महसूल खात्यातर्फे मान्य करणे व प्रत्येक शेतकऱ्याला इच्छेनुसार खातेफोड करून देणे हे सरकारचे कर्तव्य ठरते. **तीन :** घरं, सामानसुमान, नवीन जागी हलवणे सरकारी खर्चाने करावे लागणार व तेही त्यासाठी गावोगाव पोहोचणारे रस्ते बांधून. चार नवीन वसाहतीच्या ठिकाणी शाळा, दवाखाना पंचायतघर, बियारण-साठवण केंद्र, सभा-चावडी, मोठ्या रस्त्याला जोडणाऱ्या वाटा, पिण्याचे पाणी, गुरांना तलाव सारंच द्यावं लागेल. महाराष्ट्र सरकारकडेच. सरदार सरोवर बाधित. इतर दोन (गुजरात व मध्य प्रदेश) राज्यांपेक्षाही पुनर्वसनासाठी अधिक सुसंगत, स्वतंत्र यंत्रणा असूनही लोकांना हक्कांची जाणीव दिली जात नाही. ते सरकारच सर्वाधिक कायदेभंग करू इच्छिणारं असल्यानेच, असंच म्हणावं लागेल की नाही? पुरोगामित्वाचं पीस खोवून घेण्यासाठी किंवा लोक शक्तींच्या दबावाखाली एखाद्या विषयावर पुरोगामी कायदा करायचा आणि तो मोडण्याच्या पळवाटाही आपणच शोधत राहायचं, असा याच नाही, अनेक बाबतीत प्रकार.

**कायदा काय म्हणतो?**

तरीही धुळ्यातील सरदार सरोवराच्या

१०/११ हजार लोकसंख्येच्या साऱ्या तेहतीस विस्थापित गावांमधल्या पाड्या-पाड्यांवर आता कायदा पोहोचलाय. दूरवर विखुरलेले पाडे आता या प्रश्नावर एकत्र आलेयत. ते सरकारला विचारणार, विचारूही लागले आहेत. कायदा नेमकं काय म्हणतो? महाराष्ट्रात आम्हाला कुठे वसवणार? सरोवरात बुडणाऱ्या १२,००० हेक्टर्स जमिनीला नाही; तर आमच्या पुनर्वसनासाठी जंगल जमीन देण्यालाच १९८० चा जंगल संरक्षण कायदा कसा काय लागू पडतो? पैशाविना खातेफोड आणि जंगल जमिनीचे महसूलीकरण न करणारा तलाठी नि फॉरेस्टवाला गुन्हेगार की आम्ही?

**अंधार जरा बाजूला सरकल्यागत**

धनखेडीतलं पहिलं घर, नर्मदातटावरूनच दिसलं तेव्हा सूर्य बाजूच्याच मणिबेली गावापलीकडे, जणू त्याच्याच पार वडगावमध्ये बांधल्या जाणाऱ्या सरदार सरोवर धरणाला धरून धरूनच, खाली उतरत होता. आम्ही मात्र घरापुढच्या कुंपणाचे चारदोनच बांबू आणि बांबूच्याच तीन फुटी 'माली'वर ठेवलेली दोन चार मडकी नि 'तुंबडी' दिसताच, शंभर कि.मी. चा सारा थकवा पाठीवरच्या बॅगेत कोंबून गावाचे टेकाड चढू लागलो. पहिलीच वेळ असल्याने, पाटलाकडे जावं की कारभाऱ्याकडे याचा, लोकांच्या मदतीने अंदाज घेतला. मुंगो पाटील तरुण, अलीकडेच वडिलांकडून पाटीलकी घेतलेला; तरी "त्याच्यानेच मीटिंग बोलावणं होणार." हे साऱ्यांकडूनच ऐकलं. वाटेतल्या दोन्ही पाड्यावर ओळखी करून, सर्वांनी धरणाबद्दल बोलायला बसायचंच हे पटवूनच पाटलाघरी पोहोचलो. त्याची जवळच नेलमध्ये दिलेली, माहेरी आलेली बहीण मिठाबाई हसून स्वागत करून गेली तेव्हा भरत चाललेला. अंधारही जरा बाजूला सरकल्यागत वाटलं.

तीन पाड्यातली १०-१२ माणसं तरी गोळा झालीच. एकाच्या शेतातच, ज्वारीचे खुंट खुपणार नाहीत अशा बेताने बसलो. सूर्याच्या साक्षीविना मीटिंग वगैरे, सर्वांनाच नवीन होतं केवळ कुणी शहरवाले एवढ्या दुरून आले, हाच मुद्दा एकत्र आणणारा असावा. पण त्याहूनही मुख्य विचार झाला, मुंगोदादाचा. तो सिंगोळीपाड्यावरच्या शेतात गेला आहे, म्हणून मीटिंग आज नको असं ठरलं. उद्या सकाळीच सूर्य उगवण्याच्या आधी त्याला बोलावून घ्यायचं. एकदा निर्णय झाल्यावर मात्र मंडळी जरा ऐसपैस बसली. न्याहाळता न्याहाळता विचारत. इतर गावात कायकाय बोलणं झालं ते काहीजण जाणत होते. नर्मदाकाठंकाठं चालतानाच निरोप घेतले दिले जातात; कधी मोळगीच्या बाजारातही, म्हणाले.

धनखेडीत बहुतेक सगळे वसावा. भिलोरीतंच मोकळेपणी बोलत गेले. भाषेच्या भिन्नतेचा नसता बागुलबोवा नाही. बोलताना एका जागी फार वेळ बसणंही त्यांना कठीण. बघता बघता आपल्या समोरचा माणूस आपल्या शेजारी पोहोचलेला दिसायचा. एखाद्या बाबतीत सगळ्या गावाचा विचार काय असं विचारताच फार मोठ्या जबाबदारीच्या भावनेने व काहीशा गोंधळानेही, काही निवडकजण स्वतःच गावच्या प्रतिनिधित्वाची जाणीव असलेले, १५-२० फुटांवर जाऊन उभे राहायचे. काय उत्तर द्यावं, या चर्चेत मनोमन गुंगून जायचे.

**गोलमाल है भाई सब गोलमालच**

तेवढ्यात मिऱ्या रामजी भिल बऱ्याच चोपड्या नि कागद घेऊन आला. बघताच लक्षात आलं, माळावरच्या गंजक्या पेटीत चुरगळतील अशीच कोंबलेली सारी कागदपत्रं उचलून घेऊन आला असणार. बोलणं तोडू नये वगैरे नसते सोपस्कार न मानता सरळ आमच्यापुढे धरता झाला. "माझी

जमीन किती आहे सांगा." वाड्याची १ एकर १२ गुंठे, दराबारीची २ एकर ० गुंठे वगैरे सातबारातून पाहून सांगितले. मुद्दा होता, जमिनीच्या भरपाईचा. ज्यातील १० घरं गुजरातेत गेली आणि ९६ खातेदारांना तिथेच जमिनी मिळाल्या त्या मणिबेलीतल्या, व या धनखेडीतल्या लोकांना घराची नि जमिनीची भरपाई मिळालीय. मिन्याभाऊला ना त्याच्या जमिनीचं नेमकं माहीत, ना तिला मिळालेला भाव. पैसे बँकेत ठेवलेयत क्षेत्रफळ म्हणजे नेमकं काय आणि कुठे, किती तेही मिन्याभाऊ सांगू शकत नव्हता. गावात एकराची भाषा बोलणारेच कमी. थोडंफारच पण शिक्षण घेतलेलेही तीन तडवी कुटुंबांचे प्रमुखच. वसावा त्यांचा कधीकाळी सल्ला घ्यायला जातातही, पण अंतर ठेवूनच; मिन्याभाऊची सारी पावतीपुस्तकं पाहिल्यावर लक्षात आलं, भरपाईचा काही भाग मुदतीच्या खात्यात, काही चालू खात्यात ठेवलेला. त्यामागचे कारण व टक्केवारीचे गणित ना त्यांना माहीत, ना कागदोपत्री कुठे लिहिलेले. मुदतीच्या ठेवीच्या पावतीवर किती वर्षांची ठेव, तोही उल्लेख नाही. शिक्षितही सरकारी कारभारात अशिक्षित ठरतो म्हणतात, तेच. मिन्याच्या वडिलांच्या नावावर ते निधन पावले तेव्हा असलेल्या जमिनींची भरपाई मिन्या व त्याचा भाऊ दमण्या यांच्या नावे, एकत्र-खात्यावर ठेवलेली. दोघांनी एका वेळी ठरवून, एकत्र अंगठे देऊनच पैसे काढता येतील, हे सांगताच भोवतीच्या चार-पाच जणांसह मिन्या नि दमन्या घटकाभरापूर्वी चिंता चेहऱ्यावरून बाजूला सारत हसू लागले.

**शाळा नाही शिक्षण नाही, आमचा गोम्या अंगठा मारी.**

अशा प्रकारे शिस्तशीर पैशाचे व्यवहार, तेही चार भक्कम भिंतीतल्या कुठल्या ऑफिसात ही गोष्टच त्यांच्या कल्पनेबाहेरची. उडीद, ज्वार, तूर, लाल मिरची यातून 'दाल रोटु' पुरतं स्वावलंबन असताना विक्रीचे एकूण व्यवहारच फार माफक करणारे वसावा, आपट्याची पानं, चारोळी असे चार दोन जंगल उत्पन्नाचे प्रकारही कधीमधीच बाजारात जाऊन विकणारे.

सारा प्रकार त्यांच्या सांगण्यावरून लक्षात आला. भरपाईचे पैसे ठरवताना, ठेवीत घालताना त्यांचा सहभाग तर नाहीच. पुनर्वसनासाठी नेमलेल्या जिल्हा सल्लागार समितीवर घेतलेला शेजारच्या गावचा पुढारी त्यांचा खरा पुढारी नव्हेच. भरपाईच्या पैशांची खात्यांमध्ये विभागणी करताना, ऑफिसमध्ये त्यांना बोलावलं होतं खरं, पण बरेच अधिकारी बसलेले, बोलणं मराठीत. आदिवासींना समजणाऱ्या भाषेत, समजावून सांगणारे कर्मचारी मिळणार तरी कुठून?

**वसवले कसले? फक्त हलवले गेले.**

अक्कलकुवा तालुक्यातील ९ गावांपैकी मणिबेलीतले गुजराथी भाषा बोलणारे, गुजराथमध्ये पोरी दिलेले व तिथल्या पोरी आणणारे तडवी स्वखुषीने गुजरातमध्ये वसवले गेले. वसवले कसले, फक्त हलवले गेले. जमीन दिली, ती कधी न कसलेली जंगलजमीन, मोठमोठी खोडे जमिनीत रुतलेली ती काढून पहिली नांगरणी करण्यापुरताच ट्रॅक्टर नि मजुरीचा मिळून खर्च १५०० रु. एकरी.

सरपंच, उपसरपंच प्रथम जमीन ताब्यात घेतल्यावर आता जमीन नाकारून झगड्यासाठी उभे राहिलेले. बाकी, 'आता बोलून काय उपयोग' म्हणून कामाला लागलेले. मूळ गावातली जमीनही सध्यातरी कसायला मिळतेय, त्याच समाधानात राहणारे.

**प्रत्येक चर्चेच्या वेळी ह्या दाराआडच उभ्या असतात.**

नारणभाईंच्या पत्नीने लगबगीने चहा

ठेवायला घेतला. ही बाई फार हुशार. दहा-बारा पुरुषांशी आम्ही बोलत असताना जरा मागे बसूनही पार पाडणारी. नोटीस किती वर्षांपूर्वी आली, घर हलवायला किती दिवस लागले, सारेच अडलेले प्रश्न ती पूर्ण करत असे. मऊशार राखेने घासून घासून त्यांच्या पद्धतीने चकचकीत केलेल्या कपांची मांडणी पटकन् झाली. पण कापसाच्या रोपांच्या काटक्या-काटक्या गोळा करताना डोळयात पाणी आणून म्हणाली, "पाहा बाई, आता ही पाळी आली आमच्यावर. तू मणिबेलीत लाकडांच्या राशी पाहिल्या होत्यास ना? आता इथे तर नावालाही जंगल नाही, तर लाकूडफाटा कुठचा?... आम्ही जंगल तोडतो, म्हणतात बाई. पण मग कुणी मोठे मोठे लोक पाणी घेतात, कुणी घरं बांधायला भुई घेतात. आम्ही जंगलसंपत्ती पण घ्यायची नाही का? आमच्याकडे पैसे नाहीत म्हणूनच, नाही का?" न्यायाच्या शाब्दिक गप्पा, संकल्पना, संपत्ती वाटपाचं गणित तिने तिचं तिचंच मांडलंही होतं.

अट्टीला, जुनाल्याला, भरडला बायांशी जरा जास्त बोलणं झालं. 'धुळयाच्या बगीच्यात चाले जन्ता गाडी' अशी गावाच्याच सीमेआडून पाहणाऱ्या नवलाईची आणि 'जल्मी सुताऱ्या गर बांदारो। वेवाणी वेचीने डंड भरावो॥' (जन्मभर पुरणारं घर सुताऱ्या बांध। विहिणीला विकून (जंगल खात्याला) दंड भरेन थांब॥) अशी वास्तववादीही गाणी एकाच सुरात तासन्तास गटागटाने गाणाऱ्या बायका पहाटे ३लाच जात्यावर बसणाऱ्या. दिवसभर जात्यासारख्याच गरगरत कामात राहणाऱ्या. तेही मुलांच्या नहाण्या धुण्यास फारसा वेळ न देता प्रत्येक चर्चेच्यावेळी दाराआड किंवा बांबूच्या तट्ट्यामागे (भिंतीमागे) त्या पोरांसकट उभ्या असायच्याच. एखादीच म्हातारी काठीसकट मधोमध येऊन ऐकत बसायची. ती बोलू लागताच इतर कुणी गप्प करायचं म्हणून सभेनंतर माझ्याजवळ येऊन आपल्या कारभारी झालेल्या पोराचं कौतुक करायची.

मोकळया झाल्यातरी गाव कुठे जाणार, कसा जाणार याबद्दल बाया गोंधळलेल्याच. त्यांची मोठ्यात मोठी चिंता, आपल्या दूर गेलेल्या पोरी कशा भेटतील, ही. जुनान्याच्या पाटलाची पोरगी भुशाच्या खडीला दिलेली. जुनानाही उठणार नि भुशाची खडीही. पोरं कुठे जाणार नि माय कुठे?

**विकास प्रकल्पांना आव्हान**

सरदार सरोवरात बुडणाऱ्या महाराष्ट्रातील ३३ गावांच्याच ३३ कोटी कहाण्या सांगता येतील. 'नर्मदा आमची विहीर' समजून, दुरून वाटावं तशा धार्मिकतेशिवायच ह्या आदिवासींनी या डोंगरदऱ्यात आपलं थोडकंच जीवन जपलेलं. तेही आता उद्ध्वस्त होणार. धरणाच्या फायद्या-तोट्याचं गणित मांडताना, या गोष्टीचा विचारच केलेला दिसत नाही. टाटा कन्सल्टन्सीतर्फे केले गेलेले सरदार सरोवर धरणाचे आर्थिक मूल्यमापन हे याचा उत्तम नमुना आहे.

६००० कोटी रु. चा हा प्रकल्प (एका अंदाजानुसार, ८००० कोटींवरही जाईल असा) पण तिन्ही प्रकल्पग्रस्त राज्यांपैकी महाराष्ट्र व मध्यप्रदेश या दोन्हींमध्ये प्रकल्पग्रस्त कुटुंबाचे सर्वेक्षण तर झालेले नाहीच, पण पर्यावरणाच्या दृष्टीनेही अभ्यास झालेला नाही. आजवरच्या 'उकाई'चा अलीकडचा, गुजराथेतलाच धरून अनेक प्रकल्पांच्या फायद्याबद्दलची आश्वासनं प्रत्यक्षात न उतरल्याचं सर्वच जाणतात. जिथे पाणी व वीज या फायद्याचे प्रमाण अपेक्षेप्रमाणे घडले आहे, तिथेही न्यायाच्या निकषावर प्रकल्प तपासून पाहिलेलेच नाहीत. किती पाणी व किती वीज कुठल्या आर्थिक गटांना मिळाली हा प्रश्न विचारल्याविना ते



03487 6A

शक्य नाही. पाणी प्रकल्पामुळे रोगराई, जमिनीच्या प्रतीवरचा परिणाम इ. गोष्टी तर आहेतच. या दृष्टिकोणातून आजच्या मोठमोठ्या विकास-प्रकल्पांना आव्हान देण्याची गरज आहे. नर्मदा विकास प्रकल्पामधील तीस लहानमोठ्या धरणांच्या निमित्ताने हे सर्व विचार कुणाच्याही मनात उभे राहतील, राहिले पाहिजेत. त्यासाठी काही गोष्टींची मात्र निश्चित आवश्यकता आहे. एक तांत्रिक तज्ज्ञांची. सरकारी विनंतीवर व मदतीने कार्य करणारे नव्हेत तर स्वायत्त तज्ज्ञांच्या गटाची. विकास कार्यासाठी झटणाऱ्या लोकांमध्ये निश्चित स्थान असलेल्या व जोखीम घेण्यास तयार अशा सामाजिक संस्थांमार्फतच हे घडले तर अगदीच योग्य होईल. दुसरं म्हणजे, निव्वळ आयोजित प्रकल्पांचे फायदे-तोटे तपासून नव्हे तर जास्तीत जास्त व्यावहारिक, फायदेशीर असे पर्याय सुचवूनच, हे आव्हान स्वीकारल्यासारखे होईल.

**न्याय्य पुनर्वसनासाठी आग्रह**

सरदार सरोवर धरणामुळे विस्थापितांच्या न्याय्य पुनर्वसनासाठी आग्रह धरताना वरील अधिक मूलगामी बाबींचा विसर पडता नये. सरदार सरोवराचे 'जीवन' (पाणी) ज्यावर अवलंबून आहे अशा अजून सुरुवात न झालेल्या, मध्यप्रदेशातील नर्मदा सागर धरणाविषयी तर हे प्रश्न ताबडतोबीने विचारले जायलाच हवेत. मात्र पुनर्वसनासाठी द्यावयाच्या लढ्याचेही महत्त्व यामुळे कमी होत नाही. उलट पुनर्वसनाची शक्यता, त्यातील अडचणी याही प्रकल्पाच्या योग्यतेने (Viability) बाबतच्या निर्णयचा महत्त्वाचा निकष मानला जावा हे पाहाणे योग्य ठरेल. जसे पर्यायी जमीन कुठल्याही कारणामुळे मिळवता येत नसेल, तर जमिनीवर तुलनेने अलीकडेच स्थायिक झालेल्या आदिवासींना पुन्हा 'फिरत्या शेती' (Shifting cultivation) वर ढकलणं हा अन्याय नव्हे, गुन्हाच ठरला पाहिजे. आज पुनर्वसनाची बाब श्रीशैलम, सिंगरौली, उकाई, कोयना कुठल्याच प्रकल्पांमध्ये पूर्ण गांभीर्याने हाताळलेली दिसत नाही, सरदार सरोवराबाबतही तीच दिशा ठरणार अशी चिन्हं आहेत. एरव्ही सर्व (तीनही राज्यांतल्या) विस्थापितांच्या पुनर्वसनास आयोजित त्यापेक्षाही अधिक खर्च निव्वळ या प्रकल्पांवरील अधिकारी/तज्ज्ञ यांच्याच वसाहतीवर झाला नसता! पुनर्वसनाच्या नियमित आढाव्याचे काम सरकारी संस्थेवर महाराष्ट्रात सोपवलेच गेले नसते! वगैरे वगैरे.

**एकीचा बांध घालू ऽ ऽ**

हे सारे म्हणताना, पुनर्वसनाचा प्रश्न उचलून धरणाऱ्या संस्थांचीही एक बांधिलकी आवश्यक आहे. बांधिलकी, हा प्रश्न नेटाने अखेरपर्यंत धसास लावण्याची बांधिलकी, विकासाच्या नावाखाली विस्थापन वाढत असताना, या प्रश्नाच्या महत्त्वाशी बांधिलकी, तंत्रज्ञ व समाज-संघटक यांच्या सहकार्याशी बांधिलकी, क्षुल्लक मानापानाच्या पलीकडे, निव्वळ प्रश्नाशी याच बांधिलकीच्या आधारावर एका धरणाशी संबंधित पुनर्वसनाच्या कार्यास राष्ट्रीय पुनर्वसन धोरणाकडे, व विस्थापनाची योग्य दखल घेऊन इतर निकषांच्या बरोबरीने यातूनही विकास-प्रकल्पांच्याच पर्यायांकडे नेता येईल.

● ● ●

# नर्मदा खोरे विकास प्रकल्प

**अजित पेंडसे**

नर्मदा खोरे विकास प्रकल्पास सध्या जबरदस्त राजकीय रंग चढलेला आहे. या प्रकल्पातील वादग्रस्त सरदार सरोवर धरणाचा प्रश्न पुन्हा एकदा निकराला येऊन पोचला आहे.

एकीकडे 'नर्मदा बचाओ' आंदोलकांच्या नेत्या श्रीमती मेधा पाटकरने कार्यकर्त्यांबरोबर नर्मदा प्रकल्पाच्या विरोधात ६ ऑगस्ट '९३ ला जलसमर्पण करण्याचे जाहीर केले होते. परंतु केंद्राने आंदोलकांच्या सध्याच्या मागण्या मान्य केल्याने आत्म समर्पण आंदोलन चार महिने स्थगित करण्यात आले आहे. पर्यावरण व पुनर्वसन या दोन प्रश्नांपासून सुरू झालेले आंदोलन 'आता धरणाचा पुनर्विचार केला पाहिजे' या सीमेवर पोहोचले आहे, हे एक चित्र.

तर दुसरे चित्र म्हणजे गुजरात सरकारचे नर्मदा विकास मंत्री श्री. बाबुभाई पटेल ओरडून सांगतात की प्रकल्पाच्या अस्तित्वाविषयी चर्चाच होऊ शकत नाही. काहीही झाले तरी गेली ४० वर्षे अडून राहिलेल्या योजनेची अंमलबजावणी झाल्या शिवाय आम्हाला मागे फिरता येणार नाही. धरण होणारंच व या बाबत तडजोड होणार नाही. (शूल पाणेश्वर मंदिर पाण्याखाली गेले ही घटना धरण होणारच याची साक्ष देते.) तसेच गुजरातचे मुख्यमंत्री श्री. चिमणभाई पटेल यांनी व्यक्त केलेल्या प्रतिक्रियांमुळे, गुजरात सरकार व केंद्र सरकार दरम्यान उघड संघर्ष होण्याची शक्यता आहे. तेव्हा अशा या वादग्रस्त नर्मदा खोरे विकास प्रकल्पाची माहिती करून घेण्याची सर्वांना उत्सुकता आहे. त्या प्रकल्पाची दिलेली ही ओळख.

नर्मदा भारतातील पाचव्या क्रमांकाची मोठी नदी आहे व तिचा उगम मध्य प्रदेशातील पूर्वेकडील शहडोल जिल्ह्यातील अमरकंटक जवळ असलेल्या मैकल पर्वतावरील कोटीतीर्थ कुंडातून, १०५१ मिटर (३४४८ फूट) उंचीवरून झालेला आहे.

१३१२ कि.मी. (८१५ मैल) लांबीची नर्मदा नदी मध्य प्रदेश (१०७७ कि.मी. किंवा ६६९ मैल) महाराष्ट्र (७४ कि.मी. किंवा ४६ मैल) व गुजरात (१६१ कि.मी. किंवा १०० मैल) या तीन राज्यातून वाहात शेवटी गुजरातच्या पश्चिमेस खंबाताच्या आखातात भडोचजवळ, अरबी समुद्रास जाऊन मिळते. मध्य प्रदेश व गुजरात राज्यांना 'नर्मदामाई' ही वरदान ठरली आहे.

महाभारत व स्कंद पुराणात नर्मदा नदीचा वारंवार उल्लेख आलेला आहे. स्कंद पुराणात रेवा खंड म्हणून स्वतंत्र विभाग आहे. कालिदासाने रघुवंश व मेघदूतात नर्मदेचा उल्लेख केलेला आहे. स्कंद पुराणातील अनेक कथांपैकी एक प्रसिद्ध हकीगत म्हणजे, एकदा भगवान शंकर अमरकंटक पर्वतावर उग्र तप करीत असताना त्यांच्या अंगातून जोरात घाम यायला लागतो व तो त्यांच्या जटेतून बाहेर

पडताना त्याचे शुभ्र जलात रूपांतर होऊन तो प्रवाह कुंडात जमा होऊन वाहू लागतो व येथूनच नर्मदेच्या उगमेला सुरवात होते.

भारतातील बहुतेक सर्व मोठ्या नद्या पूर्ववाहिनी असून त्याचे पाणी बंगालच्या उपसागराला मिळते. परंतु नर्मदा त्याला अपवाद आहे. ती मध्य प्रदेशातून पूर्वेकडून-पश्चिमेकडे वाहात पुढे गुजरात मधून अरबी समुद्रास मिळते. मध्य प्रदेशात शहडोल, मण्डला, जबलपूर, नरसिंहपूर, होशंगाबाद, खंडवा व खरगोज, महाराष्ट्रात धुळे व गुजरातमध्ये भडोच जिल्ह्यातून तिचा प्रवास होतो.

जलसंपत्तीच्या दृष्टीने नर्मदा नदी ही हिंदुस्थानला मिळालेली अमूल्य देणगी आहे. तिच्या पात्रात बाराही महिने भरपूर पाणी असते. जून ते सप्टेंबर या चार महिन्यात कोसळणाऱ्या पावसाने नर्मदा दुथडी भरून वाहते. यामुळे संपूर्ण खोरे सुपीक असते. परंतु दुर्दैवाची गोष्ट म्हणजे फक्त १० टक्के पाणी जमिनीत मुरते व उरलेले उपयोग न होता समुद्रात वाहून जाते. (थोडक्यात वाया जाते.) त्याच बरोबर दरवर्षी येणाऱ्या महापुराने मोठ्या प्रमाणात प्राणहानी व कोट्यावधी मालमत्तेचे नुकसान होते ते वेगळेच.

नर्मदेच्या वाया जाणाऱ्या पाण्याचा अधिक चांगला वापर कसा करता येईल या विचाराला खरी चलना सरदार वल्लभभाई पटेल यांनी १९४६ मध्ये देऊन ही कल्पना उचलून धरली. तेव्हा पासून खऱ्या अर्थाने प्रकल्पाच्या अभ्यासास सुरवात झाली. गेली चार दशके नर्मदेवरील योजनांचा प्रत्येक पैलूवर (उदा. पुनर्वसनाचा प्रश्न, पर्यावरणाचा धोका, भूकंपाची भिती, तांत्रिक अडचणी वगैरे) सखोल अभ्यास केल्यावर ती तावून सुलाखून बाहेर पडली. १९७९ मध्ये 'नर्मदा वॉटर डिसप्यूट' ट्रीब्यूनलने नर्मदेचे १/३ पाणी गुजरात व २/३ पाणी मध्य प्रदेश व त्या बरोबर राजस्थान व महाराष्ट्रास थोड्या प्रमाणात पाणी देण्याचा निर्णय दिला. ऑक्टोबर १९८९ मध्ये नियोजन मंडळाने योजनेच्या प्रस्तावाला संमती दिली.

या योजनेची थोडक्यात ओळख करून द्यायची म्हणजे नर्मदा नदीवर ठिकठिकाणी लहान-मोठी धरणे, बंधारे बांधून पाण्याचा प्रवाह सरदार सरोवर व नर्मदा सागर धरणाखाली अडवून, साठलेल्या जलाशयांचा उपयोग शेती, पिण्याचे पाणी, उद्योगधंद्यासाठी लागणारे पाणी, विद्युतनिर्मिती वगैरे गोष्टींकडे करून जनतेला त्याचे अनेक लाभ मिळवून देणे हा मुख्य उद्देश होय. दरवर्षी पुरामुळे होणाऱ्या अफाट नुकसानीला पाणी अडवल्यामुळे आपोआप प्रतिबंध बसणार आहे हा महत्त्वाचा फायदा वेगळाच.

नर्मदा विकास प्रकल्पाचे प्रत्यक्ष बांधकाम फक्त गुजरात व मध्य प्रदेशात पसरलेले आहे. परंतु योजनेचा फायदा गुजरात, मध्यप्रदेश, महाराष्ट्र व राजस्थान या चार प्रांतांना मिळणार आहे.

**गुजरातमधील सरदार सरोवर प्रकल्पाचे बांधकाम:**

प्रकल्पाचे धरण काँक्रीटमध्ये होत आहे. १९८८ मध्ये नवगावजवळ नर्मदेवर १४० मिटर (४५९ फूट) उंच व १२१० मिटर (३९७० फूट) लांब धरण व दोन विद्युत निर्मिती केंद्रे (एक जमिनीखाली व दुसरे कॅनॉलच्या तोंडाशी) यांची कामे जोरात चालू आहेत. याशिवाय राजस्थानच्या सीमेपर्यंत ४००० क्युसेक्स क्षमतेचा ४५० कि.मी (२८० मैल) लांबीच्या कालव्याचा समावेश आहे.

दोन्ही वीज केंद्रांची स्थापित क्षमता १४५० मेगावॅट (Installed Capacity) आहे. त्यात गुजरातचा वाटा ५६० मेगावॅट आहे. प्रत्यक्ष वीज किती व कशी उपलब्ध होणार याची माहिती अजून उघड करायची आहे. धरणाच्या योजनेचे सर्व टप्पे १० वर्षात म्हणजे १९९८ पर्यंत तर कॅनॉलचे काम २००० पर्यंत पूर्ण करण्याचे ठरविण्यात आले आहे. आज धरणाचे ६० ते ६५ टक्के काम पूर्ण झाल्याचा दावा केला जात आहे.

ऑक्टोबर १९८८ मध्ये प्रकल्पाचा खर्च रु. ६४०६ कोटी होता. आज तो सुमारे रु. १४,००० कोटी झाला आहे. जागतिक बँकेची मदत थांबली असल्यामुळे प्रकल्पाचा खर्च भागविण्यासाठी राज्यातील सहकारी बँकांखेरीज तेल व नैसर्गिक वायू महामंडळाकडून कर्ज, किसान विकास पत्र, कर्ज रोखे व अनिवासी भारतीयांकडून निधी उभारण्यात येणार आहे. याशिवाय महाराष्ट्र, मध्य प्रदेश व राजस्थानकडून येणाऱ्या रु. २००० कोटी रुपयांपैकी सुमारे सव्वातीनशे कोटी रुपये येणे आहे.

**मध्य प्रदेशमधील बांधकाम :**

मध्य प्रदेशात या योजनेनुसार २९ मोठी धरणे, १३५ मध्यम व ३००० छोटी धरणे बांधण्यात येणार आहेत. योजनेतील तीन प्रमुख धरणे म्हणजे -

**१) नर्मदा सागर** : खंडवा जिल्ह्यातील पुनासा गावी ९१ मिटर उंचीचे धरण बांधण्यात येणार आहे. वीज केंद्राची क्षमता १००० मेगावॅट आहे. (एकूण खर्च रु. २१६८ कोटी.)

**२) ओंकारेश्वर** : खंडवा जिल्ह्यातील माधांता गावी ७३ मिटर उंचीचे धरण व ५२० मेगावॅट क्षमतेचे वीजनिर्मिती केंद्राचे बांधकाम होणार आहे. (एकूण खर्च रु. ८२५ कोटी.)

**३) महेश्वर** : खरगोत जिल्ह्यातील महेश्वर गावी ३५ मिटर उंच व ७९० मि. लांबीचे धरण व ४०० मेगावॅट शक्तीचे वीज केंद्र बांधण्यात येणार आहे. (एकूण खर्च रु. ४६५ कोटी.)

इतर छोटी वीज केंद्रे मिळून एकूण २०८३ मे. वॅट वीज उत्पन्न होणार आहे. याशिवाय सरदार सरोवर वीज निर्मितीतील ५७ टक्के हिस्सा म्हणजे ८२७ मेगावॅट वीज मिळणार आहे ती वेगळीच. म्हणजे एकूण २९१० मे. वॅट वीज मध्य प्रदेशाच्या वाटणीला येणार आहे.

नर्मदासागरच्या तीन प्रमुख धरणांवर एकूण ३४५८ कोटी रुपये खर्च येणार आहे. तिन्ही धरणांची कामे जोरात चालू आहेत. धरणामुळे साठलेले पाणी ४५२.६५ कि. मी. लांबीच्या कालव्याने ठिकठिकाणी नेण्यात येईल याशिवाय सरदार सरोवर धरणाच्या साठ्यापैकी २/३ पाण्याचा हिस्सा मध्य प्रदेशाला मिळणार आहे तो वेगळाच.

नर्मदा खोरे विकास प्रकल्पाचे अनेक फायदे व तोटे आहेत, त्याची गोळा बेरीज आजतरी कागदपत्रीय आहे. प्रकल्पातील चारी राज्यांचा संक्षिप्त सारांश म्हणजे—

**महाराष्ट्र :**

सरदार सरोवर धरणातून १४५० मे. वॅट उत्पादित होणाऱ्या वीजेच्या २७ टक्के वाटा महाराष्ट्राला मिळणार आहे. त्याचा फार मोठा फायदा उद्योग धंद्यास होईल. ३७.५०० हेक्टर जमीन लागवडीखाली येईल. दुष्काळी भागास नियमित पाणी मिळून एक कायमची अडचण दूर होईल.

परंतु ५००० कुटुंबांच्या जमिनी व सातपुड्यातील ३६ आदिवासी गावे आणि ६५७० हेक्टर जमीन (त्यात १५१९ हेक्टर शेतजमीन, ३४५९ हेक्टर जंगल व १५९२ हेक्टर नदीचा पृष्ठभाग येतो) पाण्याखाली



03487 7A

जाणार आहे. बेघर होणाऱ्या कुटुंबाच्या पुनर्वसनाची अत्यंत बिकट समस्या निर्माण होणार आहेत. विस्थापनामुळे त्यांच्या हातचे जंगल, पाणी, उत्पादक साधने, स्थिर जीवन वगैरे साधन संपत्ती निघून जाईल. या लोकांसाठी केंद्रसरकारने धुळे जिल्ह्यातील २७६९ हेक्टर जंगल जमीन देण्याची तयारी दर्शविली आहे. तेव्हा सातपुड्यांतील उरला सुरला हिरवा जंगलपट्टा तोडून काही कुटुंबे तिथे वसविल्यामुळे जंगल तर जाईलच परंतु जंगलाच्या आसपास ४०-५० आदिवासी गावांच्या जंगल उत्पन्न, गुरेचराई वगैरे गोष्टींवर अतिक्रमण होईल.

**राजस्थान :**

राजस्थानच्या ओसाड भागात पाण्याची अत्यंत जरूरी आहे. कॅनॉलने मिळणाऱ्या पाण्यामुळे ७५ हजार हेक्टर जमीन लागवडीखाली येईल. दुष्काळी भागात पिण्याच्या पाण्याचा पुरवठा हे एक मोठे वरदान आहे. अल्प प्रमाणात मिळणाऱ्या वीज पुरवठ्यामुळे उद्योगधंद्यात मदत होईल.

**गुजरात :**

नर्मदा प्रकल्प म्हणजे गुजरात राज्याची जीवन रेखा (लाईफ लाईन) असे मुख्यमंत्री सर्वांना ओरडून सांगत आहेत.

जमेची बाजू म्हणजे ७५ टक्के दुष्काळी भागास पाणी मिळेल. १८ लाख हेक्टर क्षेत्र लागवाडीखाली येणार आहे. त्यामुळे पिकांच्या उत्पादनात प्रचंड वाढ व १४५० मेगावॅट पैकी १६ टक्के मिळणाऱ्या वीजेचा उपयोग उद्योगधंद्यासाठी होईल. सौराष्ट्र, कच्छ व त्यांच्या सभोवतालच्या १३५ गावांना व ८२१५ खेड्यांना आवश्यक असलेला पाणी पुरवठा सुलभतेने करता येणार आहे. उद्योग धंद्यास लागणाऱ्या पाण्याची गरज भागविता येईल. सहा लाख लोकांना नोकऱ्या व व्यवसाय मिळतील, पुरामुळे होणारे कोट्यावधी रुपयांचे नुकसान टाळता येणे शक्य आहे. तसेच मत्स्योद्योग व वन्य पशुविकास, नवीन पर्यटन स्थळे, गायरानाची वाढ, पाण्याशी संलग्न पक्षांची वाढ साठलेल्या पाण्याच्या बाष्पीभवनामुळे हवामानात होणारी सुधारणा वगैरे अनेक फायदे आहेत. ही झाली नाण्याची एक बाजू.

परंतु नाण्याची दुसरी बाजू पाहता प्रकल्पाचे तोटे पण दिसू लागतात. प्रकल्पाने एकूण ७४६९ हेक्टर जमीन कायमची पाण्याखाली जाईल. (४५२३ हेक्टर जंगल किंवा वन जमीन, १८७७ हेक्टर सुपीक व १०६९ नदीचा पृष्ठभाग व वाया गेलेली जमीन) तसेच १९ खेडी पाण्याखाली जात आहेत. धरणग्रस्त होणाऱ्या लोकांची संख्या १ लाखाच्या घरात जाईल. यामुळे पर्यावरणाची होणारी हानी वेगळीच आहे. त्या शिवाय सद्या अस्तित्वात असलेले अनेक वन्य पशुपक्षी व काही दुर्मिळ वनस्पतींचा नाश होईल.

**मध्य प्रदेश :**

मध्य प्रदेशचा मुख्य फायदा म्हणजे तेथे बांधण्यात येणाऱ्या पॉवर हाऊसची २०८३ मेगावॅट वीज व त्या बरोबर गुजराथच्या १४५० मेगावॅट वीज उत्पादनापैकीचा ५७ टक्के हिस्सा, अशी प्रचंड प्रमाणात वीज मिळणार आहे. त्याचा उद्योगधंद्यास फार मोठा उपयोग होईल व मध्य प्रदेशमध्ये औद्योगिक क्रांती होईल. २७.५५ लाख हेक्टर जमीन लागवडीखाली येईल व त्यामुळे उन्हाळी पिकांचे मोठ्या प्रमाणात उत्पन्न मिळेल. धरणामुळे तयार होणाऱ्या जलाशयातील पाण्याचा उपयोग विविध कामासाठी करण्यात येणार आहे. उदा. मत्स्योद्योगाचा विकास, ग्रामीण भागातील अर्थव्यवस्थेची भरभराट व लोकांचे



03487 B

जीवनमानात सुधारणा वगैरे.

मध्य प्रदेशाला येणारे तोटे म्हणजे धरणाच्या जलाशयात १९३ खेडी व २०८२८ हेक्टर जमीन पाण्याखाली जाईल. त्यामुळे सुमारे १४९२४ कुटुंबे बेघर होतील व ९५००० लोकांच्या पुनर्वसनाचा प्रश्न उभा राहील. जी २०,८२८ हेक्टर जमीन जलाशयाच्या पाण्याखाली जाणार आहे त्यात ७८८३ हेक्टर सुपीक, २७३७ हेक्टर जंगल व १०२०८ हेक्टर नदीचा पृष्ठभाग व वाया गेलेल्या जमिनीचा समावेश आहे.

आज नर्मदा खोरे विकास प्रकल्पाच्या नाट्यमय संघर्षाचा शेवटचा अंक परमोच्च बिंदूपर्यंत पोहोचला आहे. परंतु नर्मदा प्रकल्पाच्या विविध घडामोडींचा नियमित वेध घेणाऱ्या अभ्यासकांच्या काही ढोबळ प्रश्नांना अजूनतरी समाधानकारक उत्तरे न मिळाल्यामुळे ते गोंधळलेल्या स्थितीत आहेत. उदा. नर्मदा प्रकल्पग्रस्तांना दिले जाणारे लाभ त्यांच्या पर्यंत पोहोचतील का? त्यांना ते केव्हा मिळतील? वेळापत्रकाप्रमाणे योजना २००० पर्यंत पूर्ण करायची आहे. ती वेळेवर पूर्ण झाली नाही तर फायदा व खर्च याचे प्रमाण (कॉस्ट बेनीफिट रेशो) विषम होण्याची शक्यता नाकारता येत नाही. (योजनेचे कामकाज लांबले की खर्च वाढणार व लाभाचे प्रमाण कमी होणार) प्रकल्पाच्या खर्चाचे अंदाजपत्रक दरवर्षी वाढत आहे तेव्हा या अफाट खर्चाचा मेळ कसा घालणार आहेत व त्यासाठी लागणारा निधी कधी व कसा जमा करायचा हा स्वतंत्र चर्चेचा विषय होणार आहे.

नर्मदा खोरे विकास प्रकल्प व अमेरिकेतील टेनेसी नदीवरील योजना यात विलक्षण साम्य आहे. १८ मे १९३२ मध्ये अमेरिकन काँग्रेसने 'टेनेसी व्हॅली ॲथॉरिटी' हा कायदा संमत केला व त्यानुसार तिघांच्या 'बोर्ड ऑफ डायरेक्टरची' स्थापना केली. बोर्ड ऑफ डायरेक्टरची निवड करण्याचे अधिकार फक्त अमेरिकेच्या अध्यक्षाना दिले आहेत. या मंडळाला सरकारचेच अधिकार असले तरी त्यात लवचिकपणा ठेवला आहे व त्यामुळे खाजगी कार्यपद्धतीप्रमाणे काम करण्याचा वाव ठेवला आहे. या योजनेमध्ये टेनेसी नदी व उपनद्यांवर ४७ धरणे बांधून पाणी अडविण्यात आले आहे. व त्याचा फायदा सभोवतालच्या सात राज्यांना मिळून त्यांची प्रचंड भरभराट झाली आहे.

अमेरिकेचे अध्यक्ष 'जॉन एफ केनडी' यांनी १८ मे १९६३ रोजी राष्ट्राला उद्देशून केलेल्या भाषणात म्हटले आहे. The work of TVA will never be over. There will always be new frontiers for it to conquer. For in the minds of men the world over, the initials TVA stand for progress, and the people of this area are not afraid of progress.

टेनेसीवरील योजना नंदनवन निर्माण करू शकते, तर मग नर्मदेवरील प्रकल्पाने ते का शक्य होऊ नये....?

● ● ●

03487 8A

# "सरदार सरोवर प्रकल्पामुळे लाखोंची झाडाझडती"

## मिलींद कोठावदे

ह्या देशात आजपर्यंत कुठल्याही प्रकल्पात झाले नाही एवढ्या मोठ्या प्रमाणावर विस्थापन सरदार सरोवर प्रकल्पामुळे होणार आहे. सरदार सरोवर प्रकल्पातील धरणामुळे पाणी आडल्यानंतर तीन राज्यांतील २४५ गावे बुडणार आहेत आणि ह्यातील लोकांची संख्या १,५०,००० - (दीड लाख) एवढी आहे. पहिल्यापासून गुजरात सरकार मात्र विस्थापितांची संख्या ६७,००० च असल्याचे सांगते. परंतु केंद्रीय जलसंसाधन मंत्र्यांनी सरदार सरोवर धरणामुळे बुडणाऱ्या कुटुंबांची संख्या ३०,००० असल्याचे, आपल्या संसदेतील निवेदनात १९९२ मध्ये म्हटले होते. ही दीड लाखाची जी संख्या आहे त्यात फक्त धरणामुळे बुडणाऱ्यांचा समावेश आहे. ह्या प्रकल्पाअंतर्गत कालव्याचं जगातलं सगळयात मोठं जाळं (Canal network) तयार होणार आहे त्यात १,७०,००० शेतकऱ्यांना प्रकल्पग्रस्त व्हावं लागणार आहे. ह्यामधील २५,००० लोकांची संपूर्ण घरंदारं, शेतजमिनी कालव्याच्या पाण्यात बुडणार आहेत. थोडाफार फरक केल्यास बाकीच्यांचीही हीच कथा होणार आहे. काहींची घरं वाचणार आहेत पण सर्व जमीन जाणार आहे. काहींची जमीन सगळी नसली तरी बरीचशी जाणार आहे, काहींची थोडी का होईना जाणार आहे, जे भूमिहीन होणार नाहीत त्यांच्यापैकी बऱ्याच जणांची घरं ह्या कालव्याच्या पाण्यात बुडणार आहेत. कालव्यामुळे ह्याप्रकारे बुडणाऱ्या लोकांना सरकार 'प्रकल्पग्रस्त' किंवा 'विस्थापित' म्हणायला तयार नाही.

पर्यावरणाची जी हानी सरदार सरोवरामुळे होणार आहे ती भरून काढण्यासाठी (?) एका अभयारण्याचा प्रस्ताव सरकारने मांडला आहे, त्यासाठी गुजरातेतल्या १०८ गावामधील ४२,००० आदिवासींना उठविण्यात येणार आहे. १३,७४४ हेक्टर जंगलाच्या दुप्पट जमिनीवर २६ हजार हेक्टरांवर पर्यायी जंगल लावण्याच्या योजना आहेत. गुजरातेत त्या भागात (कच्छमध्ये) जमीन-कुटुंब १.५ हेक्टर आहे. त्यामुळे किमान ८-१० हजार कुटुंबांचा प्रश्न येतो.

विस्थापितांच्या पुनर्वसनासाठी सुद्धा हजारो लोकांना त्यांच्या जमिनी, त्यांची घरंदारं, त्यांच्या उपजीविकेची साधने गमवावी लागणार आहेत. ह्यात भूमिहीन मजुरांना, मालकांच्या गैरहजेरीत जमिनी कसणाऱ्या कुळांना, बटाईने काम करणाऱ्या बटाईदारांना, भागेलीने काम करणाऱ्यांना, अशा सर्वांना मोठ्या प्रमाणावर परागंदा करून जमीन मालकांना आकर्षक रकमा देऊन ह्या जमिनी पुनर्वसनासाठी काढून घेण्यात येणार आहेत. ह्या जमिनींमध्ये विस्थापितांचं पुनर्वसन होईलच, ह्याची खात्री देता येत नाही. तशा कुठल्याही योजना सरकारने मांडलेल्या नाहीत. जिथे पुनर्वसन करू असे सरकार म्हणते तिथे-म्हणजे तलावाच्या आसपासच्या २७६९ हेक्टर



03487 8B

जंगलातील आदिवासींच्या जमिनी, त्यांच्या उपजीविकेची साधनं काढून घेण्यात येणार आहेत. आता तर सागबाराजवळचा १५०० हेक्टरचा एक जंगलाचा पट्टाही वरील 'पुनर्वसनासाठीच्या राखीव पट्ट्याला' जोडण्याची योजना सादर केलेली आहे. ह्या भागातल्या सर्व आदिवासींनी जंगल जमिनीवर अतिक्रमण केलेले आहे आणि त्यामुळे त्यांना उठवलेच पाहिजे, अशी सरकारची भूमिका आहे. त्यांनी जायचं कुठं? हे उत्तर द्यायची बांधिलकी सरकारची नाही.

ह्या प्रकारच्या विस्थापनाला द्वितीय विस्थापन (Secondary displacement) म्हणतात. अशा प्रकारच्या द्वितीय आणि तृतीय विस्थापनांच्या परिमाणांचा आणि परिणामांचा अंदाजसुद्धा करता येणे शक्य नाही.

पाणलोट क्षेत्राच्या विकास उपाययोजना, गरुडेश्वर वीअर डॅमसारखे सरदार सरोवराची क्षमता वाढविण्यासाठी बांधण्यात आलेले आणि येणारे (ancillary) सहाय्यक प्रकल्प, नव्यानेच घोषीत केलेले ऊर्जा निर्मिती प्रकल्प, रासायनिक उद्योग, सत्ताधाऱ्यांच्या डोक्यातून येणाऱ्या नवनवीन कल्पनांतून उभे राहणार आहेत. पण आज आपल्या विचार आणि अंदाज करण्याच्या शक्तीबाहेर असणारे प्रकल्प ह्यामुळे ज्यांची संपूर्णपणे वाताहत झाली आहे, होणार आहे त्यांच्यासाठी नियोजनकर्त्यांनी नियोजनात काहीही जागा ठेवलेली नाही.

१९६१-६२मध्ये बांधल्या गेलेल्या केवाडिया कॉलनीसाठी सहा गावांमधील ४०,००० लोकांना उठवण्यात आले होते. सरकारी अधिकाऱ्यांसाठी ही डॅम कॉलनी बांधण्यात आली होती. ही गोष्ट आता सगळेचजण विसरून गेलेत.

अशातऱ्हेने संपूर्ण सरदार सरोवर प्रकल्पामुळे सुमारे दहा लाख लोक परागंदा होणार आहेत. परंतु ह्या सर्व प्रकल्पग्रस्तांना सामावून घेईल असा पुनर्वसनाचा संपूर्ण आराखडा उपलब्ध नाही. विस्थापितांच्या सरकारी व्याख्येत कालव्यांमुळे ग्रस्त झालेले लोक, कॉलनीमुळे विस्थापित झालेले लोक, सहाय्यक प्रकल्पांमुळे ग्रस्त झालेले लोक, द्वितीय विस्थापनाने प्रभावित झालेले लोक ह्यांचा मुळात समावेशच नाही. ह्या लोकांना प्रकल्पग्रस्तांचा दर्जा नाही आणि त्यामुळे प्रकल्पग्रस्तांसारखा कायदेशीर हक्क ही नाही.

"त्याचप्रमाणे मोठ्या शेतीवर भागेली, बटाईने काम करणारे बटाईदार, शेतमजूर हे देखील विस्थापित होतील. धरणाच्या पाण्यामुळं टापू (बेटं) बनणाऱ्या गावांचाही विचार नाही. सखल व डोंगराळ भागात नावाडी, कहार, कोळी, टरबूजवाडीवाले, जंगलावर गुजराण करणारे आदिवासी, मोलमजुरी करून धरणग्रस्त भागातल्या अर्थव्यवस्थेवर अवलंबून असणारे मागासवर्गीय यांचा कुठे उल्लेखच नाही. विस्थापित कोण याची व्याख्या ठरवायला हवी," असे संजय संगवई यांनी त्यांच्या "नर्मदा प्रकल्प : साराच हितसंबंधाचा मामला!" ह्या किर्लोस्करच्या जानेवारी १९८९च्या अंकात म्हटले आहे.

सरदार सरोवर प्रकल्पामुळे प्रत्यक्ष वा अप्रत्यक्षपणे ज्यांना काही फटका बसणार आहे अशा आदिवासी व बिगरआदिवासी जनतेला अंधारात ठेवले आहे. प्रकल्पामुळे त्यांना काय सोसावे लागणार आहे, पुढ्यात काय वाढून ठेलले आहे याबद्दल काहीही सांगितले गेले नाही.

आताच्या पुनर्वसन धोरणात व नियोजनात प्रकल्पग्रस्तांपैकी ७४%च्यावर

लोकांचा विचारच केला गेलेला नाही. परंतु जे सरकारच्या प्रकल्पग्रस्तांच्या व्याख्येत बसतात त्यांच्याबाबतीत सुद्धा 'मरण' अटळच असते. भू-संपादनाच्या नोटीसा शासनाने दिल्यानंतर लोकांना हरकत असेल तर भूसंपादन कायद्यानुसार न्याय मागण्याचा हक्क असतो, संधी मिळते. पण ही प्रक्रिया योग्य पद्धतीने झाली तरंच हे शक्य असते. उदा. धरणाच्या पाण्याच्या साठ्याखाली येणाऱ्या जमिनींच्या/घरांच्या मालकांना अशा नोटीसा देण्यापूर्वीच काही हजार कोटी प्रकल्पावर खर्च केले तर या धरणग्रस्तांच्या हरकती अर्थहीन ठरवल्या जातात, आणि मग धरणाच्या लाभ आणि हानीविषयी प्रश्न, धरणाच्या आवश्यकतेविषयी प्रश्न, अगदी नुकसानभरपाई विषयक प्रश्न विचारण्याचा लोकांचा हक्क सरळ सरळ नाकारला जातो. जी गावं बुडणार आहेत त्यातील अनेक गावांमध्ये आजसुद्धा भू-संपादनाच्या नोटीसा सरकारने पाठवलेल्या नाहीत. ही गांवं पाण्याखाली गेल्यानंतर सरकारी अधिकाऱ्यांना भूसंपादनासाठी नोटीस पाठवायची असते, लोकांना सांगायचे असते, त्यांना हरकत असेल तर कायद्याचा मार्ग खुला करून द्यायचा असतो, ह्याची आठवण होईल की नाही हा प्रश्नच आहे. विकासाच्या प्रक्रियेत अगदी सुरुवातीपासून लोकांचा सहभाग, त्यांना निर्णय घ्यायचा अधिकार हा एक खूप लांबचा पल्ला आहे, हे खरंच नव्हे, ते एक स्वप्नच आहे फक्त!

ज्या आदिवासींना 'अतिक्रमणदार' म्हटलेले आहे, ज्यांनी वनखात्याच्या जमिनींवर अतिक्रमण केले आहे, असे सरकारचे म्हणणे आहे त्यांना नोटीसा पाठवायची 'गरज' सरकारला वाटत नाही. त्यांना तसेच काही न विचारता बुडू द्यायचे. त्यांना कायदेशीररित्या काय हक्क आहे? महाराष्ट्रातील ३३ पैकी २४ गावात असे अतिक्रमणदार आहेत.

१९७९ नंतरच्या जूनपर्यंतचे राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय अहवाल हेच सांगतात की संपूर्ण पुनर्वसन होणे अशक्य आहे आणि जे पुनर्वसन होईल ते न्याय्य असण्याची सुतराम शक्यता नाही. १९८९च्या जानेवारीतील नर्मदा कंट्रोल ॲथॉरिटीचा (नर्मदा प्राधिकरण) जागतिक बँकेला दिलेला 'स्टेटस् रिपोर्ट', मध्य प्रदेशच्या नर्मदा प्राधिकरणाने गुजरात सरकारला पाठविलेली पत्रे, १९८९च्या एप्रिल-मे मध्ये भारतात आलेल्या जागतिक बँकेच्या पुनर्वसनविषयक उपगट अहवाल, सेंटर फॉर सोशल स्टडीज, सुरत आणि टाटा इन्स्टिट्यूट ऑफ सोशल सायन्सेस मुंबई यांचे अहवाल आणि अगदी आत्ताचा म्हणजे जून १९९२ मधला जागतिक बँकेच्या ब्रेडफोर्ड मोर्स आणि थॉमस बर्जर यांच्या अध्यक्षतेखालील स्वतंत्र पुनर्मूल्यांकन समितीचा अहवाल या सर्वांतून पुनर्वसनाचे भीषण स्वरूप उभे राहते.

जागतिक बँकेच्या मोर्स-बर्जर समितीने उजेडात आणलेली तथ्ये धक्कादायक आहेत. अहवालाच्या १७व्या प्रकरणात त्यांनी तथ्ये एकत्र करून आपला मुख्य निष्कर्ष नोंदविला आहे. ह्या प्रकरणात पुनर्वसनाबाबत खालील गोष्टी त्यांनी नमूद केल्या आहेत- "प्रकल्पाचा विस्थापनाच्या अंगाने कोणता व किती आघात किती लोकसंख्येवर होईल हे निश्चित करण्यासाठी आवश्यक ती आधारभूत तयारी आणि या स्वरूपाच्या आघाताचे मोजमाप करण्याचे काम बँकेनेही केले नाही व भारत सरकारनेही केले नाही. ज्या लोकांवर प्रकल्पाचा आघात होणार त्यांना विश्वासात घेतले नाही, त्यामुळे मामला अधिकच

दोषपूर्ण बनला. १९८५ साली अर्थसहाय्याच्या करारांमध्ये शर्तींचा, तरतुदींचा समावेश करताना प्रकल्पग्रस्त लोकांमध्ये फार मोठ्या संख्येने आदिवासी आहेत याची पुरेशी दखल बँकेने घेतली नाही. १९८२ साली आदिवासी लोकांच्या पुनर्वसनाच्या संदर्भात स्वत:च निश्चित केलेल्या मार्गदर्शक तत्त्वांची उपेक्षा बँकेने केली. विस्थापित होण्यापूर्वीच जीवनमान किमानपक्षी लवकरात लवकर गाठता येईल, खरे तर ते अधिक उंचावले जाईल. अशाप्रकारे पुनर्वसन झाले पाहिजे व तेच सुयोग्य पुनर्वसन म्हणता येईल, ही भूमिका १९८५ साली सरदार सरोवर प्रकल्पाच्या संदर्भात केलेल्या कारमदारामध्ये स्पष्ट नमूद केल्यानंतरही, सुसंगतपणे व सातत्याने तिचा पाठपुरावा केला नाही वा आग्रह राखला नाही. याबाबतीत बँकेने पुरेसे बळ लावले नाही वा बांधिलकी ठेवली नाही. केवाडिया वसाहतीच्यामुळे, तात्पुरती धरणे बांधण्यासाठी जी गावे विस्थापित झाली त्यांची उपेक्षा भारत सरकार आणि बँकेने अशी दोघांनीही केली. धरणाच्या खालच्या अंगाला असलेल्या लोकांवर धरणाचा काय परिणाम होईल ह्याचा विचार केला गेला नाही. हे लोक विस्थापित होणार नसले तरी, त्यांचे जीवन विस्कळीत व उद्ध्वस्त होण्याची शक्यता असते. 'भूधारक' आणि 'भूमिहीन' असा भेद करण्यास संमती देऊन डूब क्षेत्रातल्या वास्तवाची उपेक्षा १९८५ सालच्या करारामध्ये झाली. तसेच अतिक्रमणदार शेतकऱ्यांचे हक्कही मान्य केले गेले नाहीत. कालवे व जलसिंचन व्यवस्था यांच्यामुळे धरणग्रस्त होणाऱ्यांना पुनर्वसन-विषयक तरतुदींचा अजिबात लाभ दिला गेला नाही." ह्या समितीने ह्या प्रकल्पामुळे झालेल्या आणि होणार असलेल्या प्रचंड मानवीय हानीला भारत सरकार आणि जागतिक बँक ह्या दोहोंनाही जबाबदार धरले आहे.

गुजरात सरकारने भूमिहीन, अतिक्रमणदार, प्रौढ मुलगे या सर्वांना भू-धारकांच्या बरोबरीने दोन हेक्टर जमीन देण्यास जन आंदोलनाच्या प्रचंड दबावामुळे १९८७-८८ मध्ये मंजुरी दिली. परंतु पांढऱ्यावर काळे करणे आणि ते प्रत्यक्षात आणणे ह्यात किती अंतर आहे हे लवकरच स्पष्ट झाले. ह्यामध्ये सुद्धा फक्त धरणामुळे विस्थापित होणाऱ्या लोकांचाच गुजरात सरकारने समावेश केला. त्यातही ६७,००० एवढेच लोक धरणामुळे विस्थापित होणार आहेत, असे गुजरात सरकार वारंवार म्हणतच असते.

नर्मदा कंट्रोल ऑथॉरिटीच्या 'स्टेटस् रिपोर्ट' मध्ये तर सरकारने मान्य केले की खुद्द गुजरातच्या १९ प्रकल्पग्रस्त गावातील ३३२२ कुटुंबांपैकी केवळ पाचशेच्या आसपास कुटुंबांना जमीन देऊ केली होती. जागतिक बँकेच्या अहवालात तर गुजरातमधील तथाकथित 'आदर्श' पुनर्वसन ग्रामांचा खरपूस समाचार घेण्यात आला आहे. 'परवेरा' व 'गुत्तल' पुनर्वसन वसाहतींमधील दैन्यावस्थेचे वर्णन करून या पुनर्मूल्यांकन दलाने 'गुजरात सरकारकडे न्याय्य पुनर्वसन करण्याची राजकीय इच्छाशक्तीच (Political will) नसल्याचे' म्हटले आहे. खुद्द गुजरातच्या विस्था-पितांसाठीच पुनर्वसन योजना तयार नाही हे ही त्यात दाखवले आहे.

गुजरातमधील पहिल्या सुरुवातीच्याच प्रकल्पग्रस्तांचे पुनर्वसन नियोजित धोरणा-नुसार झालेले नाही. जमीन हाती लागण्याच्या

कारभारात अनेक कुटुंबीय फसविले गेले. फारच कमी कुटुंबांना 'जमिनीसाठी जमीन' मिळाली. पुष्कळ भूधारकांना ५ एकर जमीन दिली. मग त्यांच्याकडे कितीही अधिक जमीन असो. आता नव्याने ज्या लोकांना जमिनी दाखवण्यात येत आहेत त्याबाबत गावागावातून अनुभव येत आहे की एकाच गावची जमीन अनेक गावांना दाखवली. दाखवलेली जमीनही खडकाळ होती नाहीतर खार जमीन होती. नर्मदा कंट्रोल ॲथॉरिटीच्या बैठकीत गुजरात सरकारच्या प्रतिनिधीनं स्पष्टच म्हटलं होतं की, मध्यप्रदेशमधल्या विस्थापितांनी गुजरातेत ६०-६५ हेक्टर जमीन पाहिली, ती सर्व खार, खडकाळ होती. ती विस्थापितांना पसंत पडली नाही. गुजरातेत पुनर्वसनासाठी जमीनच नाही असे सूचित करण्यात आले. पुनर्वसनासाठी वन-जमीन मिळण्याची अजिबात शक्यता नाही असे केंद्रीय पर्यावरण खात्याच्या सचिवांनी स्पष्ट केले. गुजरातकडे पडीक, सीलिंग व जंगल जमीन मिळून ३८,२२३ हेक्टर्स जमीन आहे असे सरकारने नर्मदा प्राधिकरणाला दाखवले. पण जंगलजमीन देण्याचं केंद्राने नाकारले; गुजरात-महाराष्ट्राच्या अधिकाऱ्यांच्या सांगण्यानुसार ९०% जमीन कुचकामी वा चुकीच्या रेकॉर्डमुळे! गुजरातच्याच ३३०० च्यावर विस्थापित कुटुंबांच्या पुनर्वसनाची शक्यता नाही. हा प्रश्न राजकीय इच्छेचा आहे, तसाच प्रत्यक्ष क्षमतेचाही आहे.

समुहाचे पुनर्वसन एका ठिकाणी व्हावे आणि पुनर्वसनानंतरचे जीवन पूर्वीपेक्षा चांगले हवे ही तत्त्वे तर ज्यांचे पुनर्वसन झाले त्यांच्या बाबतीत पाळली गेली नाहीत. पुनर्वसनाच्या ओघात गुजरातेत गावे विस्कटली गेली आहेत. गाव म्हणून पुनर्वसन करण्याइतकी जमीन कोठे उपलब्ध नसल्याने लहान लहान तुकड्यांमध्ये कुटुंबे वसविली गेली आहेत. धरणाजवळचे गुजरातमधले गाव वडगाम, त्यातील माणसे २८ ठिकाणी विखुरली गेली आहेत. तसेच ८ ते १० गावांमधील कुटुंबं १३० जागांवर विखुरली गेली आहेत. एकेका कुटुंबाचेही विभाजन कोठे कोठे झाले आहे.

मालू, कृष्णापुरा, खांमेटा, कांबोईकुवा, अमरोली, टिंबी-राजूवाडिया येथे झालेले पुनर्वसन हे लोकांच्या जीवनाशी प्रचंड खेळ करून करण्यात आले. त्यावेळी नर्मदा जलविवाद लवादाची एकही अट न मानता, जागतिक बँकेबरोबरच्या करारातील एकही शर्त न जुमानता हे पुनर्वसन झाले. आश्वासनं दिल्याएवढी जमीन अथवा मोबदला तर मिळालेला नाहीच. इथेही जमिनी वाटपात अनेकजण फसवले गेले. शेतीसाठी निकामी असलेल्या किंवा पाणथळ झालेल्या जमिनी लोकांच्या पदरी आल्या. जळाऊ लाकूड, गुरांसाठी चारा एवढ्याच गोष्टींची कमतरता होती असे नाही तर ज्या गावांमध्ये ह्या लोकांचं पुनर्वसन झालं तिथं त्यांना सामाजिक जीवनात स्थैर्य आणि सुरक्षितता यांचा अनुभव दुर्मिळच होता. गधेर आणि वडगामच्या लोकांना बळाचा वापर करून १९९१ च्या पावसाळ्यात उठवले गेले होते. त्यावेळी ही गावे धरणाच्या भिंतीचे बांधकाम चालूच ठेवलं गेल्यामुळे अंशत: बुडणार होती. हे सर्व 'पुनर्वसन झालेले लोक' त्यांच्या आधीच्या गावातील संसाधनांवरच पोटाची खळगी भरण्यासाठी, अवलंबून होते. वडगाम, कातखेडी, माकडखेडा, कडादा, अंतरास आणि गधेर ह्या आपल्या गुजरातेतील मूळच्या गावाकडे आणि बोरखेडी, अमळाली ह्या

मध्यप्रदेशातील आपल्या मूळच्या गावाकडे ती बुडणार आहेत हे माहीत असूनही लोकांचा ओघ परत सुरू झाला आहे, नव्या गावामध्ये जगता येत नाही आणि नव्या जमिनी जीवनाचा आधारच बनू शकत नाहीत म्हणून गुजरातेत गेलेल्या मध्यप्रदेशातील गावांची ही कथा तर आपल्या विस्थापितांसाठी पर्यायी जमीन आज मध्यप्रदेशकडे नाही. मध्यप्रदेशातल्या १९३ प्रकल्पग्रस्त गावांपैकी फक्त ८९ गावांचेच सर्वेक्षण झाले आहे. १९८५ मध्ये बर्गी धरणामुळे झालेल्या विस्थापितांचे पुनर्वसन करायचे होते त्यावेळी ह्या सरकारने आमच्याकडे जमीन नाही हे स्पष्ट केले होते. बर्गी ह्या मध्यप्रदेशातच बांधलेल्या धरणाबाबत असे म्हणणाऱ्या म.प्र.सरकारने सरदार सरोवरामुळे बुडणाऱ्या १९३ गावांची जबाबदारी गुजरातवर ढकलली आहे, त्यात नवल काही नाही! त्यांच्याबाबत गुजरात सरकार निष्काळजीपणाच करत असल्याचा मध्यप्रदेशचाच आरोप आहे.

महाराष्ट्रातल्या बुडणाऱ्या ३३ गावांचा समावेश अक्राणी-अक्कलकुवा ह्या धुळे जिल्ह्यातील तालुक्यांमध्ये होतो. ह्याबाबत मध्यप्रदेश सरकारसारखीच बांधिलकीची प्रशासनाच्या पातळीवरील कमतरता, धोरणविषयक त्रुटी, आवश्यक त्या यंत्रणांचा अभाव, लोकांशी सल्लामसलत करण्याविषयी सतत प्रकट केली जाणारी उपेक्षा, अपर्याप्त प्रमाणात जमिनीची उपलब्धता आणि या गावांमध्ये (महाराष्ट्रातल्या) विस्थापित होणाऱ्यांची संख्या , त्यांच्या पुनर्वसनासाठी लागणारी जमीन इत्यादींचे आकडे बदलत राहिले. सरकारी सर्वेक्षणच अपुरे असल्याचे नर्मदा धरणग्रस्त समितीने आपल्या तपशीलवार सर्वेक्षणातून दाखवून दिले. नर्मदा बचाओ आंदोलनाच्या महाराष्ट्रातील नर्मदा धरणग्रस्त समितीबरोबरच मध्यप्रदेशातील नर्मदा घाटी नवनिर्माण समिती आणि गुजरातमधील नर्मदा असरग्रस्त संघर्ष समिती ह्यांनीसुद्धा ह्या संपूर्ण प्रकल्पामुळे विस्थापित होणारे लोक, त्यांची संख्या, अंशतः ज्यांचे नुकसान होणार आहे असे लोक, त्यांची संख्या, त्यांची गावे, त्यांचे सामाजिक जीवन यांचा अत्यंत सखोल आणि तपशीलवार अभ्यास, यांचे सर्वेक्षण केले आहे. महाराष्ट्र सरकारने आपल्या राज्यातील विस्थापितांबाबत निश्चित धोरणच जाहीर केलेले नाही. केंद्रीय वनखात्याचा वारंवार नकार येऊन देखील विधानसभेत सरकार सरळ सरळ विस्थापितांना वनजमीन देण्याची भाषा करीत होते. ही वनजमीन आधीच अपुरी आहे. वनखात्याचे वृक्षारोपण खड्डे आहेत. अनेक ठिकाणी जमीन लागवड योग्य नाही. तळोदा तालुक्यातले घनदाट जंगल कापून तेथे पुनर्वसन करण्याचा घाट घातला आहे. केंद्रीय वनखात्याने ह्या जंगलाची तोड करण्यास विरोध दर्शविला आहे आणि तळोद्यातल्या ह्या जंगलांमधल्या, जंगलांवर सर्वस्व अवलंबून असणाऱ्या आदिवासींनी जायचे कुठे?

गुजरातने 'उदार' अशी सुधारित भूमिका घेतल्यानंतरही महाराष्ट्र व मध्यप्रदेश फक्त भूधारक विस्थापितांनाच तेवढी दोन हेक्टर जमीन द्यावयास तयार आहेत. भूमिहीन, अतिक्रमणदार व प्रौढ (भूधारक कुटुंबामधील) यांना त्यांच्या राज्यात पुनर्वसनाचे लाभ मिळणार नाहीत. गुजरात राज्यात स्थलांतर करणे त्यांना भाग पडेल. "पुनर्वसनाविषयीची भूमिका तिन्ही राज्यांच्या एकसारख्या नसल्यामुळे आपले पुनर्वसन कोठे व्हावे ही निवड करण्याचे स्वातंत्र्य

कागदावरच राहते; व्यवहारात त्याला अर्थ उरत नाही. गुजरातकडे त्यांच्या विस्थापितांसाठीच जमीन नाही. महाराष्ट्र व मध्यप्रदेश राज्यांमधील कदाचित थोड्याच विस्थापितांचे पुनर्वसन गुजरात राज्यात होऊ शकेल'' — (मोर्स आणि बर्जर समितीचा अहवाल.) महाराष्ट्र आणि मध्यप्रदेशातही हीच स्थिती आहे, हे आपण पाहिलेच. धरणात पाणी साठायला सुरुवात झाली पण बुडणाऱ्या लोकांनी जावे अशी जमीन आहे कोठे?

नर्मदा कंट्रोल ऑथॉरिटीच्या (नर्मदा प्राधिकरण) बैठकांमधून हे स्पष्ट झाले आहे की, पुनर्वसनासाठी अत्यंत कमी जमीन उपलब्ध आहे. ३ जून १९८८ च्या बैठकीत केंद्रीय समाजकल्याण मंत्रालयाच्या सचिवांनी सरदार सरोवरामुळे विस्थापित होणाऱ्या लोकांसाठी जमीन उपलब्ध नाही आणि '' न केवल गुजरातमे यह परिस्थिती है, दूसरे प्रदेशोमें भी है।'' अशी टिप्पणीही त्यांनी केली. गुजरात सरकारच्या प्रतिनिधीने ह्या बैठकीत 'आम्ही शोधलेली सरकारी जमीन क्षारयुक्त, खडकाळ आणि बहुतांश शेती करण्यासाठी अयोग्य आहे. गुजरातच्या विस्थापितांनीसुद्धा ही जमीन स्वीकारण्यास नकार दिला आहे' अशी कबुली दिली. नर्मदा व्हॅली डेव्हलपमेंट ऑथॉरिटी (म्हणजेच नर्मदा घाटी विकास प्राधिकरण) ह्या सरकारी यंत्रणेच्या उपाध्यक्षांनी केंद्रीय समाजकल्याण मंत्रालयाच्या सचिवांना लिहिलेल्या एका पत्रात (दि. १५ नोव्हेंबर १९८८) ह्याला दुजोरा दिला आहे, ''वेगवेगळ्या तारखांना ३०१३४ हेक्टर सरकारी जमिनींचे पुनर्वसनासाठी जे प्रस्ताव गुजरात सरकारने मांडले आहेत, त्यापैकी बहुतांश शेतीसाठी अयोग्य आहेत आणि ही सर्व जमीन छोट्या-छोट्या तुकड्यांमध्ये विखुरलेली आहे. आत्तापर्यंत फक्त २२० हेक्टर सरकारी जमीन (बडोदा जिल्ह्यातील गुंटाल गावाच्या जवळची) शेती योग्य आहे.'' आतापर्यंत सरकारने ३०,१३४ हेक्टर जमिनीत अजून थोडी जमीन वाढवून प्राधिकरणाला आमच्याकडे ३८,२२३ हेक्टर्स जमीन पुनर्वसनासाठी आहे, असे सांगितले आहे. ३०,१३४ मधील २२० हेक्टरच जमीन शेतीयोग्य आहे असे सरकारी सूत्रेच म्हणतात. इकडे गुजरात सरकार मात्र दररोजच वर्तमान पत्रांमधून 'आम्ही एवढ्या लोकांचे पुनर्वसन केले, एवढ्या लोकांना पर्यायी जमिनी दिल्या, असे जाहीर करत असते.

केंद्रीय पर्यावरण आणि वनमंत्रालयाने वनजमीन द्यायला नकार दिल्यानंतर आणि वरीलप्रमाणे वस्तुस्थिती बाहेर पडायला सुरुवात झाल्यावर 'जमिनीबद्दलचा बोजा मध्यप्रदेश किंवा गुजरात सरकार दोघांनाही नको आहे. महाराष्ट्राचीही आपल्या विस्थापितांकडे पाहण्याची दृष्टी फारशी वेगळी नाही,' हे स्पष्ट झाले.

गुजरात सरकारने आपली असमर्थतता लपविण्यासाठी आता पुनर्वसनासाठी खाजगी जमिनी विकत घेऊन उपलब्ध करून देण्याचा प्रस्ताव मांडला आहे. ह्या बाबतीत सुद्धा परिस्थिती अत्यंत निराशाजनक आहे. नर्मदा घाटी विकास प्राधिकरणाच्या उपाध्यक्षांनी केंद्रीय समाज कल्याण मंत्रालयाच्या सचिवांना लिहिलेल्या पत्रात हे नमूद केले आहे. 'गुजरात सरकारने आम्हाला २,६४४ हेक्टर खाजगी जमिनींची यादी पाठवली आहे. परंतु त्यांनी आम्हाला त्यांचे नकाशे, सातबाराचे उतारे यापैकी काहीही दिलेले नाही. गुजरात सरकारचे पुनर्वसन अधिकारी आमच्या

पुनर्वसन अधिकाऱ्यांना जमिनी दाखवण्यात टाळाटाळ करत आहेत' एका बड्या सरकारी यंत्रणेलाच जर गुजरातचे अधिकारी दाद लागू देत नसतील तर...

'जागतिक बँकेचे अर्थसहाय्य मिळविण्यासाठी पुनर्वसनाबाबत त्यांच्याबरोबरच्या करारामधील काही अटींचे पालन करणे आवश्यक होते. जमीन उपलब्ध नाही. अशावेळी, केवाडिया कॉलनीमुळे विस्थापित झालेल्या ४०,००० लोकांचे विस्थापन पूर्ण झाले अशा थापाही मारल्या गेल्या. ह्या अहवालामध्ये पुनर्वसनासंबंधी लवकरात लवकर 'क्लीव चिट' मिळविणे जागतिक बँकेच्या कर्जासाठी आवश्यक आहे असेही मत मांडले. वर ह्या अहवाल सामाजिक संस्था व पत्रकार यांच्या हातात पडू नये असेही म्हटले. दुसरीकडे आपल्याच १९८९ च्या पुनर्मूल्यांकन उप-दलाचा अहवाल गुंडाळून ठेवून जागतिक बँकेने पुनर्वसनाबद्दल चाललेल्या अक्षम्य घिसाडघाईबद्दल जोरदार टीका करून आर्थिक मदत मात्र चालूच ठेवली. मोर्सबर्जर कमिटीने मात्र "मोठ्या प्रमाणावर विस्थापन होणाऱ्या जवळपास कोणत्याही प्रकल्पावर समाधानकारक व सुयोग्य पुनर्वसन झालेले नाही, हे लक्षात घेऊन बँकेने अधिक ठाम व आग्रही भूमिका घ्यायला हवी होती. धरणाचे बांधकाम बंद ठेवून, प्रकल्पाची अंमलबजावणी करण्यापूर्वीच, एक पाऊल मागे घेऊन, थोडे थांबून तटस्थपणे विचार करण्याची गरज आहे. परंतु पुनर्वसनात चालढकल केली तरी प्रकल्पाचे काम होत राहीलच, असे दिसते" असे आपल्या जून १९९२ च्या अहवालात निर्विवादपणे नमूद केले. ह्या अहवालानंतर जागतिक बँकेवर प्रचंड दबाव देशभरातूनच नव्हे, तर जगभरातून आला आणि जागतिक बँकेने ह्या प्रकल्पातून अंग काढून घेतले.

जलाशयाखाली (धरणाच्या भिंतीमागच्या) येणाऱ्या लोकसंख्येपैकी १०% हून कमी लोकांचे पुनर्वसन होण्यासाठीच्या नुसत्या प्रयत्नांमध्येच एवढ्या अडचणी आल्या आहेत. गुजरात, मध्यप्रदेश, महाराष्ट्र यांच्या एकाही गावाचे पूर्णपणे पुनर्वसन आजपर्यंत झालेले नाही, १९७८-७९ पासून प्रक्रिया सुरू असूनही...

गुजरात सरकार आता म्हणते की, विस्थापितांनीच आता जमीन शोधावी, तीही खाजगी, लाभक्षेत्रातल्या जमीनदारांकडून पुनर्वसनासाठी जमीन मिळवून द्यायची जबाबदारी सरकारची असते पण आता विस्थापितांनाच जमीन शोधून काढण्याची 'मुभा' दिली आहे. त्यांना 'मदत' करायला सरकारी अधिकाऱ्यांची आणि आमदार-खासदारांची एक समितीही नेमली आहे. नर्मदा घाटी विकास प्राधिकरणानेच ह्या योजनेबद्दल म्हटले आहे, "मध्यप्रदेश के विस्थापित मुख्यत: आदिवासी हैं जिनके पास अन्य प्रदेश के जमीनदारोंसे मोल-तोल करने की क्षमता नही है।" खेडा, बडोदा, अहमदाबाद, मेहसाणातील 'पॉवरफुल' किसान लॉबी लाभक्षेत्रातल्या आपल्या जमिनी मध्यप्रदेशातल्या आदिवासींना द्यायला तयार होतील? त्यात परत ह्या व्यवहारात सरकारी अधिकारी आणि लोकप्रतिनिधी( ?) आहेतच. ह्या योजनेअंतर्गत २५४ परिवारांना घरं तयार करायला जी जमीन दिली गेली ती आधीच कोणीतरी कसत आहेत. शेतीसाठी जी जमीन दिली ती 'बंजर' आहे. पोटाची खळगी भरता येणे तिथे शक्य नाही म्हणूनही काही लोक तिथे जायला तयार नाहीत. अशाही घटना समोर येत आहेत की विस्थापितांना दिलेल्या अशा जमिनीही

सरकार कालवे बांधण्यासाठी काढून घेते आहे.

या खाजगी वाटाघाटींबद्दल व खरेदी समितीबद्दलही पुनर्मूल्यांकन गटाने सडकून टीका केली आहे. म.प्र.सरकारनेही आक्षेप घेतला आहे. 'सेंटर फॉर सोशल स्टडीज'सारख्या सरकारच्याच देखरेख गटानेही तथाकथित आदर्श पुनर्वसन व खरेदी समितीवर गंभीर आक्षेप घेतले आहेत. ह्या खाजगी वाटाघाटींच्या योजनेमुळे बरेच विस्थापित आता पूर्णत: फसले आहेत. सुरतच्या सेंटर फॉर सोशल स्टडीजच्या सप्टेंबर १९८७ च्या अहवालानुसार पाच 'पुनर्वसन स्थळांवर' खरेदी समितीच्या मध्यस्थीने आदिवासींनी आपले किडूक-मिडूक फुकून टाकून ज्या जमिनी विकत घेतल्या त्या जमिनींवर आधीच स्थानिक बँकांचे कर्ज होते. एकेका जमिनीवर दीड-दीड लाखाचे कर्ज... जमिनी खरेदी करताना ह्या गोष्टींचा आदिवासींना पत्ताच नव्हता. ह्या जमिनींवर कोणत्याही प्रकारचे कर्ज नाही असेच त्यांना सांगण्यात आले होते. करारमदारांमध्येही बँकेच्या कर्जाचा कोठेही उल्लेख नव्हता. आता बँका ह्या आदिवासींकडून ते पैसे परत मागते आहे जे त्यांनी बँकेकडून कधी घेतलेच नव्हते.

मेधा पाटकर त्यांच्या एका लेखात म्हणतात "एका केंद्रीय कार्यालयातील तुटपुंज्या माहितीच्या आधारे देशभरातील सुमारे ११९ प्रकल्पांतील विस्थापितांमध्ये ५० टक्क्यांहून अधिक आदिवासींचे प्रमाण आहे. एकूणच गरिबांच्या हातातून संपत्ती छिनून घेणे हे विकास प्रकल्पांचे वैशिष्ट्य झाल्यासारखे. अशांची सर्व संपत्ती-संस्कृती 'सार्वजनिक हिताच्या' नावाखाली प्रकल्पासाठी संपादित केली जाते. त्यांचे सर्वांगी होणारे नुकसान मोजू-मापू शकणारी यंत्रणा, कार्यपद्धती, कर्मचारी शासनाकडे नसतातच; पण त्याहून महत्त्वाचे, त्याची गरजही वाटत नसते. १८९४ च्या जुनाट भूसंपादन कायद्यानुसार नुसते पैसे देऊन विस्थापितांना पळविण्याची सोय असतेच. विस्थापितांची व्याख्याही सरकारी कागदपत्रांनुसारच!" मोबदला म्हणून पैसे दिले जातात, त्यातून झोपडीचे वासे सुध्दा विकत घेता येत नाहीत. मध्यप्रदेशमधल्या निमाडसारख्या भागातील बुडणारी मोठी गावे ही शेतकऱ्यांची आहेत. त्यांच्या नदीकाठच्या जमिनी गेल्यामुळे होणाऱ्या नुकसानाचे मूल्यांकन करता येईल का? ज्या समुहांना पैशांचे व्यवहार फारसे करावे लागत नव्हते, निसर्गावर जे आधारित होते, त्यांच्या जीवनात जंगल आणि नदीचे जे महत्त्व होते, त्याची भरपाई कशी द्यायची? ह्या गोष्टी पैशांमध्ये मोजता येतात का?

नर्मदा घाटीतील जनता आपला जगण्याचा अधिकार बजाविण्यासाठीच लढा देत आहे. मानवांचे असणारे परस्परसंबंध, मानवाचे व निसर्गाचे नाते झुगारून देऊन ही जी विकासाच्या नावाखाली होणारी नैसर्गिक साधनसंपत्तीची विलक्षण लूटमार व विल्हेवाट आणि प्रचंड मानवी हानी आणि ती सुद्धा फक्त काही उपभोक्त्यांसाठीच चालू आहे. त्यामागचा न्याय काय, हा अधिकार कोणी कोणाला दिला हे शोधण्यासाठी नर्मदाघाटीतील लढा अत्यंत शांततामय मार्गांनी चालू आहे. हे आणि अशी सारी आंदोलने यासाठी आहेत.

सरकार मात्र लोकांनी त्यांच्या गावातून उठावे म्हणून प्रचंड दडपशाही करत आहे. एप्रिल १९९३ मध्ये गुजरात उच्च न्यायालयाने एक महत्त्वपूर्ण निकाल दिला.

तो लोकांच्या बाजूने होता. ह्या निकालाद्वारे धरणग्रस्त लोकांचे पूर्णतया पुनर्वसन झाल्याशिवाय बळाचा वापर करून त्या लोकांना त्यांच्या गावातून हलवण्याची मनाई केली गेली. हा निकाल देताना सर्वोच्च न्यायालयाच्या एका निकालाचा उच्चन्यायालयाने आधार घेतला. 'धरणाच्या पाण्याखाली गावे बुडण्याआधी निदान सहा महीने आधी तरी धरणग्रस्तांचे पूर्ण पुनर्वसन करणे सरकारवर बंधनकारक आहे', असा तो सर्वोच्च न्यायालयाचा निकाल आहे. पावसाळा पंधरा दिवसांवर येऊन ठेपला आहे. १९९३ च्या ह्या पावसाळ्यात गुजरातमधील, दहा गावं (३०१९ कुटुंबं) व महाराष्ट्रातील पाच गावं (६४९ कुटुंबं) पाण्याखाली जाणार आहेत. (संदर्भ: राज्यमंत्र्यांचे लोकसभेतील दि.१४ एप्रिल १९९३ चे भाषण). त्यांचे पुनर्वसन अद्याप व्हायचे आहे.

तरीही न्यायालयाच्या आदेशाचे उल्लंघन करून हत्यारबंद पोलिसांच्या तुकड्या खेड्यांतील लोकांवर दडपशाही व जबरदस्ती करून त्यांना खेडी सोडण्यास भाग पाडत आहेत. नर्मदेच्या खोऱ्यांमधील आपली राने-वने, घरे सोडून त्यांनी बाहेर पडावे म्हणून सरकारी दडपशाहीचा वरवंटा लोकांवर फिरत आहे. लोकांना उचलून 'परवेता'सारख्या ठिकाणी नेऊन टाकण्यात येत आहे. बाबा आमटेंनी आपल्या "नर्मदा : भ्रांतियाँ और तथ्य" या पुस्तिकेत मणिबेलीतील ८० कुटुंबांना उचलून 'परवेतामध्ये नेऊन ज्या पद्धतीने पुनर्वसित केलं होतं त्याचे हृदयद्रावक वर्णन केले आहे. 'परवेता की दर्दनाक कहानी' त्यांच्याच शब्दात— "सबसे बुरी हालत तो शायद उन ८० परिवारोंकी है जिन्हे महाराष्ट्रके धुले जिले के गाव मणिबेली से हटाकर गुजरात के परवेता गाव मे बसाया गया है। अपने नार घरमे (वैसे यहा की गंदगी को देखते हुए इसे घर कहना मुश्किल है) विस्थापितोंकी मृत्यु दर ४९ प्रति १००० तक पहुंच गयी है जो कि मणिबेली और परवेता दोनोंकी मृत्यु डर से कहीं अधिक है। इसका कारण ढूँढना कठिन नही है - अनाज के भण्डारोंमें बहुत कमी आना, प्रति व्यक्ति आय भी कम हो जाना, मवेशियोंकी संख्या घट जाना इत्यादी। जहाँ कि आदिवासी कई तरह के अनाज और दाल खाते थे आज उन्हे थोडेसे धान और जवार पर निर्वाह करना पड रहा है। परवेता में जो जमीन उन्हें मिली है उससे वे अपने भरण-पोषण का केवल एक तिहाई भाग ही पूरा कर पाते हैं। बाकी का निर्वाह वे मणिबेली की जमीन के आधार पर करते है। इन लोगोंकी व्यथा का सही अनुमान उस दिन की कल्पना करके ही लगाया जा सकता है, जब इनकी जमीनें मणिबेली में डूब चुकी होंगी और इन्हे सहारा देनेवाला कोई नही रहेगा।" अशाप्रकारे लोकांना बळजबरीने उचलून दुसरीकडे नेऊन टाकणे ह्याला 'पुनर्वसन' म्हटले जाते आणि नुकतेच गुजरात सरकारने जाहीर केल्याप्रमाणे जाहीरही केले जाते की आत्तापर्यंत आम्ही नर्मदा योजनेअंतर्गत पाच हजार कुटुंबांचे पुनर्वसन केले.

संपूर्ण पुनर्वसन होईपर्यंत सरदार सरोवराच्या भिंतीमागे थोडेसुद्धा क्षेत्र बुडीत होऊ नये, असा न्यायालयाचा आदेश गुंडाळून ठेवून सरकार धरणाचे बांधकाम रेटते आहे. बळाचा वापर करून लोकांना उठवू नये हा आदेश धुडकावून लावून सरकारने केलेल्या जुलूम जबरदस्तीच्या व दडपशाही खुणा नर्मदा खोऱ्यातील खेड्यांच्या अंगावर उमटत आहेत. पोलिसांच्या तुकड्या

बिनदिक्कत अत्याचार करत आहेत. शेतकऱ्यांना मारहाण, जुलूम-जबरदस्ती नि अटक, वृद्धांना व बालकांनाही ह्यातून सोडले जात नाही. स्त्रियांनाही मारहाण आणि शेवटचे हत्यार म्हणून स्त्रियांवर अमानुष बलात्कार... नुकताच अंतरास या गावात बुधीबाई नावाच्या बाईवर पोलिसांनी बलात्कार केला, तिने आंदोलनात भाग घेतला म्हणून! आंदोलन गावागावातून मोडून काढण्यासाठी हे शेवटचे शस्त्र वापरले जात आहे. बुधीबाई ही काही बलात्कार झालेली पहिली स्त्री नाही...

समाजावर असेच आघात करत आपला 'विकास चालू आहे'

भारतीय द्वीप कल्पातील पहिल्या मानवाच्या पाऊलखुणा नर्मदेच्या खोऱ्यात उमटल्या होत्या, असे म्हटले जाते. आपल्याकडील मानवी सभ्यतेच्या पहिल्या खुणा नर्मदेच्या खोऱ्यात सापडल्या आहेत. नर्मदेच्या खोऱ्यातील मातीच्या पोटात अजून बरेच काही दडलेले आहे. काही मानववंश शास्त्रज्ञांच्या मते सुनियोजित उत्खनन केल्यास मोहेंजोदडो-हराप्पाच्या पूर्वीच्याही अनेक संस्कृती आपल्याला ह्या मातीच्या पोटात गाडल्या गेलेल्या दिसून येतील. आद्य संस्कृतीनंतर इथे नांदलेल्या अनेक संस्कृतींना, त्यामधील दुव्यांना आपण नर्मदेच्या पाण्याखाली बुडवणार आहोत...

नर्मदा नदी ही भारतातल्या पवित्र नद्यांपैकी एक अत्यंत महत्त्वपूर्ण नदी. पवित्र मानला गेलेला 'परिक्रमामार्ग' जो केवळ नर्मदेचेच वैशिष्ट्य आहे, हजारो सामाजिक आणि भावनिक महत्त्वाची ठिकाणे, पवित्र घाट आणि हजारो प्राचीन आणि मध्ययुगीन मंदीरं आपण बुडवणार आहोत.

आदिवासींच्या देवदेवता आणि दानवांचं काय? एका पर्वतालाच ते देव मानतात. एखाद्या झाडालाच त्यांच्या समाजात देवत्व प्राप्त झालेले असते. दऱ्याखोऱ्यांमध्ये, देवरायांत, झाडांमध्ये वसलेल्या त्यांच्या ह्या देव-दानवांचं काय? त्यांच्या जीवनात असलेल्या, खोलवर रूजलेल्या, शतकानुशतकं, पिढ्यानूपिढ्या निसर्गाशी जोडलेल्या संस्कृतीचं काय? प्राण्यांमध्ये, पक्ष्यांमध्ये देवत्व शोधणाऱ्या ह्या एका समृद्ध समाज जीवनाचं काय होणार?

आजूबाजूच्या निसर्गाशी एकरूप होऊन, आपल्या नैसर्गिक ठेव्याला जपत, आपल्या अत्यंत कमी गरजांसह सामाजिक आणि सांस्कृतिक दृष्ट्या अत्यंत परिपूर्ण जीवन हे आदिवासी व्यतीत करत असतात. हे सर्व आपण त्यांच्यापासून हिरावून घेणार आहोत. नर्मदा खोऱ्यातल्या मातीच्या पोटातल्या प्राचीन संस्कृतींबरोबरच सध्या तिथे नांदत असलेल्या एका संस्कृतीलाही आपण मूठमाती देणार आहोत.

आदिवासींना शहरातल्या रस्त्यांवर, झोपडपट्ट्यांमध्ये फेकून देणे. त्यांना सुरत-मुंबईच्या हायवेवर भीक मागायला लावणे, त्यांच्या स्त्रियांना वेश्याव्यवसायात प्रवृत्त करणे, हा आपल्याला अभिप्रेत असलेला 'विकास' आहे आणि हाच विकास आपल्या संस्कृतीचं एक अभिन्न अंग बनत चालला आहे...

● ● ●


# नर्मदा प्रकल्प - पायाभूत प्रश्न अनुत्तरितच

**वर्षा ढेरे - गजेंद्रगडकर**

गेल्या दीड-दोन वर्षांपासून सरदार सरोवर प्रश्नानं देशात आणि देशाबाहेरही बरीच खळबळ निर्माण केली आहे. ऑगस्ट ९३च्या पहिल्या आठवड्यात नर्मदा बचाव आंदोलनाच्या नेत्या मेधा पाटकर यांनी जलसमाधीचा निर्णय जाहीर केल्यानंतर सरकारने आंदोलनांशी वाटाघाटी करून भडका शमविला आहे, इतकंचपण तोही तात्पुरताच. खरा प्रश्न अजून सुटलेला नाही आणि तो नजीकच्या काळात सुटण्याची चिन्हंही नाहीत.

सरदार सरोवर प्रकल्पाची बीजं थोड्या थोडक्या नव्हेत, तर सेहेचाळीस वर्षांपूवी रोवली गेली आहेत. देशाला स्वातंत्र्य मिळालं त्याच वर्षी म्हणजे १९४७ मध्ये या प्रकल्पाची कल्पना प्रथम पुढे आली. महाराष्ट्रासारखंच गुजरातलाही दुष्काळाने कायम ग्रासलेलं आहे. दक्षिणेकडचा काही भाग सोडला तर गुजरातच्या बहुसंख्य खेडी-शहरांना दरवर्षी असह्य पाणी-टंचाई सोसावी लागते. आणि दुथडी भरून वाहणारी नर्मदा आपलं कित्येक दशलक्ष क्युसेकस् पाणी दरवर्षी अरबी समुद्राला अर्पण करते. सरदार सरोवर प्रकल्पामुळे पाणी-टंचाईचा हा प्रश्न सुटेल आणि नर्मदेच्या पाण्याचा चांगला वापर होऊन शेतं आणि मनं हिरव्या समृद्धीने नटतील, हा या प्रकल्पामागचा विचार. गुजरातच्या कायापालटाचं हे चित्र डोळ्यासमोर ठेवून ५ एप्रिल १९६१ रोजी त्यावेळचे पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरू यांच्या हस्ते गुजरातमधल्या भडोच जिल्ह्यात नवग्राम मुख्य धरणाच्या जागेचं भूमिपूजन करण्यात आलं.

भडोचमधल्या ४६० फूट उंचीच्या या मुख्य धरणाशिवाय या प्रकल्पामध्ये लहान, मध्यम आणि मोठ्या अशा एकूण ३२०० धरणांचा समावेश आहे. या धरणांमुळे गुजरातमधल्या १८ लाख हेक्टर जमिनीला, तर राजस्थानमधल्या ७५,००० हेक्टर जमिनीला सिंचनाचा फायदा मिळेल असं



सांगितलं गेलं आहे. मुख्य धरणाच्या पाण्यावर, तसंच कालव्यांच्या पाण्यावर तयार होणाऱ्या विजेचा पुरवठा मध्यप्रदेश, महाराष्ट्र आणि गुजरात या तीनही राज्यांना मिळण्याची योजना आहे. शिवाय कच्छ आणि सौराष्ट्रातल्या पाण्याचं दुर्भिक्ष्य असलेल्या काही भागांना पिण्याचं पाणी उपलब्ध होईल, असा विश्वास गुजरात सरकारने प्रकट केला आहे.

गुजरात सरकारच्या दृष्टीने बहुउद्देशीय असलेल्या या प्रकल्पाचा मुहूर्ताचा दगड १९६१ मध्ये रोवला गेला असला तरी १९७९ मध्ये नर्मदा जलविवाद न्यायाधिकरणाने निर्णय देईपर्यंत अख्खी १८ वर्षं या प्रकल्पाचं काम पूर्णपणे थांबलं होतं. पर्यावरण, विस्थापितांचं पुनर्वसन, आणि इतर सर्व आवश्यक अभ्यास धरणाच्या बांधकामाबरोबरच केले जातील, आणि १९८९ पर्यंत हे सर्व अभ्यास पूर्ण केले जातील या अटीवर १९८७ साली केंद्र सरकारने या प्रकल्पाला Environmental and forest clearance दिल्यानंतर मात्र १९९८ च्या जूनमध्ये प्रकल्प तडीला नेण्याच्या निश्चयाने गुजरात सरकारने अतिशय वेगाने या प्रकल्पाच्या कामाला सुरुवात केली.

प्रत्यक्षात, सिंचन आणि वीजनिर्मितीचे लाभ नजरेसमोर ठेवून तयार केलेल्या या प्रकल्पाची आखणी एकांगी विचारातून झाली आहे. सरदार सरोवर प्रकल्पामुळे गुजरातेत होणाऱ्या हरितक्रांतीचं चित्र गुजरात सरकारने पुन्हा पुन्हा सर्वांच्या समोर मांडलं पण धरणामुळे पर्यावरणाला पोचणाऱ्या धोक्याचा आणि विस्थापितांच्या पुनर्वसनाचा अत्यंत महत्त्वाचा मुद्दा प्रकल्पाच्या आराखड्यात समाविष्टच केला नाही. कोणताही विकास-प्रकल्प उभारण्यापूर्वी, त्या प्रकल्पामुळे पर्यावरणावर होणाऱ्या संभाव्य आघातांचे तपशीलवार मोजमाप (Environmental impact Assessment) विचारात घेऊनच प्रकल्पाचा आराखडा तयार करावा लागतो. या ठिकाणी मात्र पर्यावरणाला पोचणाऱ्या धोक्यांबाबतची कोणतीही पायाभूत माहिती हाताशी नसतानाच प्रकल्प उभारायला सुरुवात झाली. शिवाय या बाबतीत स्थानिक जनतेला सहभागी करून घेतलं असतं तर पर्यावरणीय उपाय योजनांची आखणी अचूकपणे करता आली असती. पर्यावरणावर या धरणामुळे नेमके कोणते आघात होणार आहेत, आणि ते किती तीव्र असणार आहेत याबाबतची माहिती उपलब्ध नाही. या मुद्यांवरच १९८३ मध्ये पर्यावरण आणि वनखात्याने प्रकल्पाला मंजुरी दिली नव्हती. ती माहिती पुढच्या चार वर्षात उपलब्ध न होऊनही १९८९ पर्यंत सदर बाबींचा अभ्यास पूर्ण करण्याच्या अटींवर १९८७ मध्ये प्रकल्पाला दाखविलेला हिरवा कंदील हाच पुढच्या पर्यावरण विनाशाचं पहिलं सूचन करणारा होता.

धरणामुळे पाण्याखाली जाणाऱ्या एकूण जमिनीपैकी १३,७४४ हेक्टर जमीन जंगलांनी व्यापलेली आहे. शिवाय सरदार सरोवर प्रकल्प लाभदायी ठरावा, यासाठी ज्या इंदिरा सागर प्रकल्पाची निर्मिती केली जाणार आहे, त्या प्रकल्पामुळे एकूण ९१,३४८ हेक्टर जमीन पाण्याखाली जाणार आहे. यातील ४०,३३२ हेक्टर्स जंगलं आहेत. म्हणजेच एकूण ५४,०७६ हेक्टर्स जमिनीवरची जंगलं या धरणांमुळे नष्ट होणार आहेत. एवढ्या प्रचंड प्रमाणावर होणारा

जंगलांचा नाश पर्यावरण संतुलनाला घातक आहे, हे कुणीही मान्य करेल. जंगल संहारामुळे वनस्पती आणि प्राणी अशा दोन्ही सृष्टीचं वैविध्य संकुचित होणार, हे निश्चित.

याशिवाय धरणाच्या कॅचमेंट एरियामधील जंगलांचा ऱ्हास झाल्याने नद्यांच्या पात्रात गाळ साठण्याचा धोका आहे. त्यामुळे पाण्याची पातळी वाढल्याने होणारे दुष्परिणाम वेगळेच. दलदलीमुळे जमिनीचं क्षारीकरण होण्याचाही धोका आहे. बांधाच्या वरच्याच नाही तर खालच्याही भागाला धोका आहेच. पाणी अडवलं गेल्यामुळे मासे आणि इतर जीवसृष्टी नष्ट तर होणार आहेच पण समुद्र आत येण्याचीही शक्यता आहे.

या प्रकल्पाच्या विरोधातला दुसरा मुद्दा आहे तो विस्थापितांच्या पुनर्वसनाबाबतचा. या प्रकल्पामुळे एकूण ३९,१३४ हेक्टर जमीन पाण्याखाली जाणार असून १४८ खेड्यांमधले तीन लाख लोक विस्थापित होणार आहेत. मध्यप्रदेशातली ९३, गुजरातेतली १९ तर महाराष्ट्रातली ३६ खेडी बुडणार आहेत. या तीन लाखांमधली ४७ टक्के जनता आदिवासी असल्यामुळे विस्थापनाचा प्रश्न अधिक गंभीर आहे.

ज्यांना विस्थापित व्हावं लागणार त्यांना विश्वासात न घेणं ही या बाबतीतली पहिली चूक ठरली. विश्वासात न घेतल्यामुळेच प्रकल्पग्रस्तांचा विरोध अधिक तीव्र झाला आहे. प्रकल्पग्रस्तांमध्ये आदिवासी मोठ्या प्रमाणात आहेत, याचा विशेष विचार करणं अपेक्षित होतं. पण तसं झालं नाही. शिवाय विस्थापित होण्यापूर्वीचं जीवनमान लवकरात लवकर गाठता येईल नव्हे, ते अधिक उंचीवर नेता येईल, अशा प्रकारे पुनर्वसन व्हायला हवं. जागतिक बँकेने या प्रकल्पाला अर्थसहाय्य करण्यासाठी १९८५ मध्ये जो करार केला त्यात ही बाब स्पष्टपणे नमूद केली होती. पण त्यानुसार पाऊल उचललं गेलेलं नाही आणि बँकेनेही गुजरात शासनाचा या बाबतीत पाठपुरावा केला नाही, असं या बँकेने नेमलेल्या मोर्स-बर्सर समितीनेच आपल्या अहवालात म्हटलं आहे.

सरदार सरोवरातील एकाच मुख्य धरणामुळे विस्थापित होणाऱ्या तीन राज्यांतील विस्थापितांसाठी सरकारचं धोरण समान नाही, ही विस्थापनाच्या प्रश्नातली मुख्य बाब आहे. भू-धारकांशिवाय, भूमिहीन, अतिक्रमणदार, आणि प्रौढ मुलं या सर्वांना सरसकट दोन हेक्टर जमीन देण्याचं उदार धोरण गुजरात सरकारने स्वीकारलं आहे. पण महाराष्ट्र आणि मध्यप्रदेश सरकार फक्त भूधारक विस्थापितांनाच तेवढी दोन हेक्टर जमीन द्यावयास तयार आहेत. पुनर्वसनाच्या बाबतीत तीन राज्यांच्या भूमिका अशा वेगवेगळ्या असल्यामुळे आपले पुनर्वसन कुठे व्हावं, ही निवड करण्याच्या विस्थापितांच्या स्वातंत्र्याला अर्थच रहात नाही. 'पुनर्वसनाच्या ओघात गुजरातेतही गावं विस्कटली गेली आहेत. संपूर्ण गावाचे पुनर्वसन करण्याइतकी जमीन कुठेच उपलब्ध नसल्याने लहान लहान तुकड्यांमध्ये कुटुंबं वसविली गेली आहेत. काही ठिकाणी तर एकेका कुटुंबाचंही विभाजन झालं आहे' असा शेरा मोर्स समितीने मारला आहे.

विस्थापितांबाबतचं धोरण ठरविताना आदिवासींची जीवनसाधनं आणि जीवनप्रणाली यांचा अभ्यास सरकारने मुळीच केलेला नाही. आदिवासींना लागणाऱ्या ८०

टक्के वस्तू जंगलातून येतात, हे सरकारी अहवालात नमूद केलं जातं. पण विस्थापनामुळे या जंगलांवरचा त्यांचा हक्क जाणार हे मानण्याची मात्र सरकारची तयारी नाही. निदान आदिवासींना त्याची नुकसानभरपाई तरी द्यायला हवी. पण याबाबतीत अद्याप तरी ठोस पाऊल उचललं गेलेलं नाही. एकूणच आदिवासींच्या या विस्थापनामुळे सांस्कृतिक पर्यावरणालाही मोठी ठेच लागणार आहे. विशेषत: गुजरात आणि मध्यप्रदेशातल्या जंगलांमध्ये वाढत्या शहरीकरणापासून स्वत:चा बचाव करून असलेली दुर्मिळ आदिवासी संस्कृती या प्रकल्पामुळे लोप पावणार आहे.

१९८५ पासून गुजरातच्या आदिवासींमध्ये काम करणाऱ्या बाबा आमटे आणि मेधा पाटकर यांच्या नेतृत्त्वाखाली अनेक सामाजिक कार्यकर्त्यांनी विस्थापनाच्या या प्रश्नाला प्राधान्य देऊनच १६ फेब्रुवारी १९८६ ला नर्मदा बचाव समितीची स्थापना केली. या धरणामुळे कुणाचा फायदा होणार, कुणाचं नुकसान होणार, पुनर्वसन कुठे आणि कसं करणार, पर्यावरणाची आणि नैसर्गिक साधन संपत्तीची होणारी हानी कशी भरून काढणार या सगळ्या प्रश्नांची समाधानकारक उत्तरं मिळाल्याशिवाय विस्थापनाला अनुमती देणार नाही, अशी नर्मदा बचाव समितीची प्रथम पासून भूमिका आहे. थोडक्यात पर्यावरण आणि पुनर्वसन या मुद्यांवर आंदोलकांची विरोधी भूमिका सरकारच्या या बाबतीतल्या दुर्लक्षामुळे दिवसें दिवस अधिक तीव्र होते आहे आणि दुसरीकडे आजपर्यंत एक हजार कोटी रुपये खर्च करून बसलेल्या गुजरात सरकारने ही प्रतिष्ठेची बाब केली असल्यामुळे कुठल्याही परिस्थितीत प्रकल्प तडीला नेण्याचा चंगच या सरकारने बांधला आहे.

वाढती लोकसंख्या आणि त्यामुळे होणारा ऊर्जेचा वाढता वापर लक्षात घेता मोठ्या धरणांना विरोध करून चालणार नाही, हे खरं, पण अशा प्रकल्पांवर खर्च होणारा पैसा आणि प्रकल्पातून मिळणारे लाभ यांचा सुयोग्य मेळ घालायला हवा. मुख्य म्हणजे, अशा कोणत्याही धरणांना हिरवा कंदील दाखविताना विस्थापितांचं प्रकल्प उभारण्यापूर्वी सुयोग्य पुनर्वसन, धरणाखाली जाणाऱ्या जंगलांच्या क्षेत्राच्या किमान तीन-चार पट क्षेत्रावर वृक्ष लागवड या अटींची पूर्तता झाल्याची खात्री करून घ्यायलाच हवी. पर्यावरण आणि विस्थापित यांना दिल्या जाणाऱ्या महत्त्वावरच धरणासारख्या विकास प्रकल्पांचं खर यश अवलंबून आहे, ही जाणीव शासनाने ठेवायला हवी. मात्र पर्यावरण रक्षणाचा झेंडा हातात घेऊन सरसकट सगळयाच विकास कार्यक्रमांना विरोध करण्याची एकांगी भूमिका सामाजिक कार्यकर्त्यांनीही कटाक्षाने दूर ठेवायला हवी. ज्याला चिरस्थायी विकास म्हणता येईल, अशा पर्यावरणाला पोषक विकासाची आज गरज आहे आणि म्हणूनच निसर्ग आणि माणूस यांच्यातलं हे निरोगी नातं निर्माण होण्यासाठी माणसा- माणसामधला सुसंवाद आता वाढीला लागायला हवा, तरच सरदार सरोवरासारखे प्रकल्प हे समस्या न बनता मैत्रीपूर्ण उत्कर्षाची व्यासपीठं बनतील.

● ● ●

# संपूर्ण नर्मदा प्रकल्पः गुजरातचे व देशाचे हित...!

**शाम सुरनीस**

**अ ) मूळ मुद्दा - गुजरातचे राजकारण.**

गुजराती नेत्यांचे व काही गटसमुदायांचे या प्रकल्पाबाबतचे धोरण, पाठपुरावा, हटवादीपणा, अरेरावी व दांडगाई लक्षात घेतली तर...

हा संपूर्ण प्रकल्प म्हणजे गुजरातची 'राक्षसी महत्त्वाकांक्षा' आहे हे लक्षात येईल.

**उद्देश –**

राक्षसी महत्त्वाकांक्षेचा उद्देश एकच. संपूर्ण भारताचे आर्थिक नियंत्रण गुजरातने म्हणजेच गुजराथ व्यापाऱ्यांनी आपल्या हातात ठेवण्यासाठी ज्या अनेक क्लृप्त्या, युक्त्या, योजल्या होत्या त्यातलीच ही एक विद्यमान संघर्षात्मक वळण घेतलेली योजना आहे.

**पार्श्वभूमी –**

याबाबत गुजरातपुढे जपानचे उदाहरण आहे. दुसऱ्या महायुद्धात अमेरिकेने हिरोशिमावर अणुबाँब टाकून पराभव केला तरीही आजचे चित्र काय दिसते आहे. अमेरिकेवर आर्थिक आक्रमण करून जपानने (आपली श्रेष्ठता सिद्ध करून) वर्चस्व मिळवल्याची चिन्हे दिसताहेत.

गुजराती राज्यकर्त्यांच्या आजपर्यंतच्या सर्व योजना पडताळून पाहिल्या तर यामागची भूमिका हीच दिसून येईल. संयुक्त महाराष्ट्र चळवळीत मुंबई जरी महाराष्ट्राला मिळाली तरी मुंबईतील अर्थकारणाच्या नाड्या गुजरात्यांनीच हातात ठेवण्याचे प्रयत्न केलेले आहेत. एवढेच नव्हे तर मुंबईचे सर्व ग्राहकांचे (Consumer product चे) शोषण गुजरात गेली कित्येक वर्षे करते आहे. महाराष्ट्राच्या सीमेवर छोटेमोठे उद्योग प्रचंड प्रमाणात उभे करून गुजरातने लूट चालवली आहे. धुळे जिल्ह्यातल्या मजुरांच्या चाललेल्या शोषणाची १९ व्या शतकात मँचेस्टर येथे होत होती त्या शोषणाचीच तुलना करता येईल. एक हर्षद मेहता किती हजारो कोटींचे गैरव्यवहार करू शकतो हे आम जनतेने नुकतेच पाहिले आहे.

महाराष्ट्राला निरनिराळ्या मार्गांनी तुडवल्यानंतर आता ही राक्षसी महत्त्वाकांक्षा भारतीय स्तराकडे वळली आहे. गुजराती माणूस हा मुळातच व्यापारी वृत्तीचा. तेव्हा शासकीय तत्त्व व प्रजातंत्रामागचं सत्त्व (Spirit) हे त्यांच्या लक्षात येणं कठीण. या संपूर्ण नर्मदा प्रकल्पामागं गुजरात शासनाची 'व्यापारी भूमिका' ठामपणे दिसून येते.

**दिवाळखोरी राज्यशासन –**

आर्थिक बाबतीत संशोधन केल्यास गुजराथ शासनाचे आजपर्यंतचे बरेचसे व्यवहार दिवाळखोरीत आणणारेच आहेत. अर्थात सरकारची दिवाळखोरी जरी असली

तरी दुसऱ्या बाजूने कोणाची तरी भरभराट ही होतच असते. मध्यंतरी नर्मदा सिमेंट या कंपनीने विक्रीकर (न भरता) तुंबवला होता. असे समजते की गुजरात सरकारने या तुंबलेल्या रकमेचे समभाग (शेअर्स) विकत घेऊन कंपनीची बोळवण केली. राक्षसी महत्त्वाकांक्षा असली तरीही; जर तुम्ही वाममार्गानं उत्कर्ष साधू असं ठरवलं तर त्याचे परिणाम विपरित होतात. नर्मदा सरोवर (धरण) बांधकामात निकृष्ठ प्रतीचे सिमेंट वापरून धरण धोकादायक केले आहे असा १९८५-८६ सालच्या महालेखा परिक्षकांच्या अहवालात उल्लेख आहे. यावरून गुजरातच्या राजकारणी नेत्यांचं धोरण 'शेंडी तुटो वा पारंबी तुटो' आम्ही हे सर्व 'तडीपार' नेणारच असा आहे हे निश्चितपणे दिसून येते.

**ब ) तांत्रिक बाजू व फायदेशीर भाग –**

तांत्रिक बाबतीत एक म्हणता येईल की ब्रिटिश राजवटीत संपूर्ण भारताचं त्रिमिती सर्वेक्षण झालेलं होतं (Great Trigonometrical Survey of India). त्यामुळं महत्त्वाच्या मोठ्या योजना व प्रकल्पांचं नियोजन फक्त फायदेशीर प्रकल्प व सुरक्षितपणा लक्षात घेऊनच केलेलं होतं. सर्व भारतातली मोठमोठी धरणं, सरोवरं पहिल्या ३/४ पंचवार्षिक योजनांमध्ये प्राधान्य देऊन समाविष्ट केलेली होती. त्यावेळी राजकीय हेतू (हाच केवळ महत्त्वाचा हे मानून) सर्वश्रेष्ठ असे धोरण नव्हते. परंतु नंतरच्या पंचवार्षिक योजनांमध्ये राजकीय/प्रांतीय हितसंबंध यांचे दडपण वाढू लागले व त्यामुळे सत्तेमधे ज्यांचे वर्चस्व होते अशा मान्यवरांनी स्वत:ची प्रतिष्ठा पणाला लावून केवळ महत्त्वाकांक्षेसाठी अशी धरणे पदरात पाडून घेतली व ती पूर्ण झाली. नर्मदा प्रकल्प हा त्यातला सगळयात मोठा प्रकल्प.

चाफेकर नावाचे एक सुविख्यात मुख्य अभियंता महाराष्ट्र शासनात (त्यावेळच्या मुंबई राज्यात) होऊन गेले. अशा महाकाय प्रकल्पा बाबतचे त्यांचे विचार या नर्मदा प्रकल्प वाद्यांनी पुन्हा एकदा अभ्यासावेत. अशा कोट्यावधी पैशांचा चुराडा करणाऱ्या (व परिणामी दिवाळखोरीचा लाभ होणाऱ्या) प्रकल्पांना त्यांचा कडवा विरोध होता. अर्थात् आर्थिक कारणाबरोबरच भूगर्भशास्त्रीय कारणही त्यामागे होते.

**भूगर्भशास्त्रीय धोके –**

याबाबत सावधानतेच्या धोक्याची सूचना गुजरात राज्यातल्या सर्व जनतेला देणे अत्यावश्यक आहे. सुरक्षितपणाचा विचार या नर्मदा प्रकल्पाबाबत सर्वात प्रथम व्हावयास हवा होता. परंतु सर्वच नर्मदेच्या 'प्रवाहपतीत' असल्यामुळं त्या महाभयंकर होऊ शकणाऱ्या आपत्तीकडे कोणाचंही लक्ष गेलेलं नाही. भूगर्भशास्त्राचं सूक्ष्म ज्ञान असलेले कितीतरी तंत्रज्ञ खाजगी चर्चेत म्हणतात. 'होवून जाऊ द्या एकदा राजकीय नेत्यांच्या मना प्रमाणं'. संपूर्ण गुजरात या प्रकल्पानंतर उद्‌भणाऱ्या महाभयंकर आपत्तीत सापडणार. आणि भूगर्भातल्या मोठमोठ्या स्तरांचं स्थलांतर होऊन ज्याप्रमाणे द्वापरकाली कृष्णाची नगरी द्वारका समुद्राखाली बुडाली तसा महाप्रलय होईल तेव्हाच या राक्षसी महत्त्वाकांक्षेचं परिणामी स्वरूप दिसेल. तेव्हा या नर्मदा प्रकल्पाखाली येणाऱ्या शेकडो धरणांचं 'प्रचंड फायदा' या नावाखाली खोटे आकडे मांडून

समर्थन केलं जातं, ते सर्व भ्रमिष्टपणाचं द्योतक आहे. 'घी देखा, लेकिन बडगा नही देखा' अशी त्यामागची धोक्याची सूचना आहे.

**क ) खरे फायदे –**

प्रकल्प चालू असतानाच या प्रकल्पाचे फायदे संबंधितांना मिळून गेलेले आहेत. कागदोपत्री या प्रकल्पांचे खर्चाचे आकडे ५०,००० कोटी रु च्या आसपास वाचण्यात येते. आजपर्यंतच्या सर्व प्रकल्पांची अंदाजपत्रके व पुर्णतिनंतरचा प्रत्यक्ष खर्च यांचे प्रमाण कमीतकमी ५ पट व जास्तीत जास्त २० पट असे आढळून येते.

बांधकामाची कंत्राटे घेणाऱ्या आसामी (गले लठ्ठ उद्योगपती) चे फायदे जरी सोडून दिले (कोणताही स्थापत्य बांधकाम करणारा, ४०% टक्के फायद्याशिवाय कंत्राट घेत नाही) तरी काहीही न करता राजकीय उलाढाली करून प्रकल्पाचा पाठपुरावा चालू ठेवणारा नेता १ टक्का (मूळ ५०,०००/- कोटी च्या अंदाजपत्रकावर) कमिशन म्हटले तरी ५०० कोटी मिळवू शकतो. (यातले आत्तापर्यंतचे बरेचसे मिळवून झाले सुद्धा). त्यातून विद्यमान मुख्यमंत्री चिमणभाई पटेल हे भ्रष्टाचाराबाबत किती प्रतिकूल आहेत? हे जनतेला माहीत आहे. तसेच स्वत: चिमणभाई पटेल यांनी पूर्वी ७५ साली विजय तेंडुलकर यांना एका मुलाखतीत याबाबत कबुलीजबाब दिलेला तो त्यांनी एका पुस्तकात छापला पण आहे. त्यामुळे या खेळातले पत्ते अगदी उघड आहेत. जनमतातून निवडून आलेले हे राजकीय 'राक्षस' जनतेच्याच उरावर उघडपणे नाचत आहेत हे दृष्यच मोठे विदारक आहे.

तेव्हा नर्मदा प्रकल्प (त्यातील सरदार सरोवर वगैरे धरून) हा किती (आणि कोणाला?) फायद्याचा आहे याबाबत आर्थिक-विस्तृत विवेचनाची जरूर नाही. प्रकल्प पूर्ण होईतोवर शेकडो उद्योगपती, व हाताच्या बोटावर मोजता येणारे राजकीय नेते, याच्या पाच पिढ्या तक्यागिर्द्यावर लोळत परदेशी मद्ये ढोसत राहतील, एवढी अगणित संपत्ती मिळवू शकतील (इतका फायदा मिळवू शकतील) इतर अनेक फायदे (अगणित) निराळेच.

**ड ) प्रकल्पग्रस्तांचे पुनर्वसन –**

हे बाकीचे विषय या प्रकल्पाचा पाठपुरावा करणाऱ्यांच्या दृष्टीकोनातून अगदीच क्षुल्लक आहेत. एखाद्या कुत्र्यापुढे जशी 'शिळी भाकरी' टाकावी त्या प्रवृत्तीनं या समस्येकडे ते पाहतात.

चिमणभाईंना गुजरातेतच हे पूनर्वसन केलेलं आवडेल. कारण गुजरातमधे मजूर कामगारांची फारच कमी संख्या आहे. बाहेरून (मुख्यत्वेकरून धुळे आदिवासी भाग) कंत्राटी दलालामार्फत मजूर मागवले जातात आणि शोषण करून सहा महिन्यात हाकलून दिले जातात.

हे सर्व पाहता स्वातंत्र्यापूर्वीची ब्रिटिशांची राजवट खूपच 'बरी' असे बरेच वृद्ध बोलून दाखवतात.

● ● ●

# "सरदार सरोवर प्रकल्प" – आर्थिक पाहणी

**विश्वनाथ ना. विखे**

गुजरातमधील सौराष्ट्र व कच्छमधील पाण्याचा प्रश्न नेहमीसाठीच मिटेल व ते पाणी आसपासच्या राज्यांनाही (म. प्र., महाराष्ट्र व राजस्थान) उपयोगी पडेल ह्या भावनेतूनच "सरदार सरोवर नर्मदा निगम" चा उगम झाला. ह्या अक्राळविक्राळ प्रकल्पाला १९७९ सालीच जरी हिरवा कंदील मिळाला तरी या ना त्या कारणाने त्याच्या बांधणीची खरी सुरुवात झाली ती १९८८ मध्ये. प्रकल्पाची कालमर्यादा १७ ते २२ वर्षांपासून दहा वर्षांवरती आणण्यात आली व टाईम लिमिट ठरलं जुलै १९९८. पाच वर्षापूर्वीची टोटल कॉस्ट जी जवळ-जवळ १२००० कोटी रुपये होती ती २०,००० कोटीच्या घरात गेली. नर्मदा सरोवर धरण जवळ-जवळ १००० कोटी, पॉवरहाऊसेस् (रिव्हर बेड व कॅनल बेड) ९६५ कोटी, जमीन व पुनर्वसन ५०० कोटी आणि इतर सर्व मिळून २७०० कोटी तसेच निरनिराळे पाट-कालवे व वितरणप्रणालीसाठी जवळ-जवळ ८५०० कोटी रुपयांचं अंदाजपत्रक ठरविण्यात आलं. म्हणजे जवळ-जवळ १२२०० कोटी रुपये आणायचे कुठून? वर्ल्ड बँकेनी ७२० कोटी रु. ची व जपाननी २४० कोटी रुपयांची हमी दिली. महाराष्ट्र, मध्य प्रदेश व राजस्थानने मिळून सुमारे २१०० कोटी रु. द्यायचे व गुजरात सरकारने ५१०० कोटी पुरवायचे. बाकीचे २५०० कोटी पब्लीक बाँड्स् सिस्टेमनी तयार करायचे ठरविण्यात आले.

सौराष्ट्र व कच्छ दुष्काळग्रस्त क्षेत्र असल्यामुळे पाण्याची टंचाई तिथं चिरकाल जाणवत आली. राजस्थानही कमी पावसाचा प्रदेश, मध्यप्रदेश जंगलग्रस्त व महाराष्ट्राचा उत्तरभाग ओसाड. म्हणून हा अवाढव्य प्रकल्प विकोपास आला. उत्तम शेती, धान्य-पैदास, पेयजल व वीज पुरवठा ही ती ह्यामागील उद्दिष्टे. पण हा प्रकल्प क्लिअर करताना प्रदुषणाचा भाग नेमका त्यावेळेस गाळण्यात आला. जमीन मालकी व पुनर्वसनही जरा तंतोतंत जुळलं नाही आणि म्हणूनच हे गुजरातचं वरदान समजण्यात येणारा प्रकल्प दिवसें-दिवस अभिषाप ठरत आहे.

ऑक्टोबर १९८८ मध्ये बारा गावांचे हजारो लोक बेघर झाले. त्यांनी सुखसमाधानाचा सूर हारवला. २२ फेब्रु. १९८९ला पहिला विद्रोह दिसून आला. मॅगसेसे, जमनालाल बजाज सारखे बडे-बडे अॅवार्ड जिंकणारे, पद्मविभूषण किताब झिडकारणारे आंतरराष्ट्रीय ख्यातिप्राप्त श्री बाबासाहेब आमटे व श्रीमती मेधा पाटकर ह्या आंदोलनात पडले. एवढेच नव्हे तर सप्टेंबर १९८८ मध्ये जवळ जवळ ३०० विद्यमान व सुसंस्कृत (वेगवेगळया क्षेत्रात) प्रभुतीनी ह्या प्रकल्पाच्या विरोधात प्रधानमंत्र्यांना "स्मरण लिपिका मेमोरेन्डम (प्रोटेस्ट लेटर)" पाठविली. उशीरा का होईना पण जागतिक बँकेनी सुद्धा शेवटी ह्या प्रकल्पातून काढता पाय घेतला.

प्रकल्प पूर्ण झाल्यास खाली दर्शविल्याप्रमाणे पाण्याचा उपयोग करता येईल.

वरच्या टेबलवरून हे जाहीर आहे कि फक्त १८% तालुक्याना पाणी मिळेल व कच्छच्या ९ तालुक्यांपैकी फक्त ४ ला

**सौराष्ट्राची पाणी वितरण-व्यवस्था**

| जिल्हा | एकूण | तालुका | | पाणी पुरवठा टक्केवारी क्षेत्रफळ |
|---|---|---|---|---|
| | | पाणी मिळणार नाही | पाणी मिळेल | |
| जामनगर | १० | १० | ० | ० |
| अमरेली | १० | १० | ० | ० |
| जुनागढ | १५ | १५ | ० | ० |
| राजकोट | १३ | ११ | २ | ३० |
| भावनगर | १२ | ७ | ५ | ३६ |
| सुरेन्द्रनगर | ९ | ३ | ६ | ८५ |
| एकूण | ६९ | ५६ | १३ | १८ (जवळ-जवळ) |

**दुष्काळग्रस्त, ओसाड व बाळवंटमय गुजरातची वितरण प्रणाली खालीलप्रमाणे दर्शविली आहे.**

| जिल्हा | एकूण | तालुका | | पाणी मिळण्याचं टक्केवारी क्षेत्रफळ |
|---|---|---|---|---|
| | | पाणी मिळणार नाही | पाणी मिळेल | |
| **१ ) दुष्काळग्रस्त –** | | | | |
| अमरेली | ८ | ८ | ० | ० |
| जामनगर | २ | २ | ० | ० |
| पंचमहल | ७ | ६ | १ | ५ |
| भावनगर | ३ | २ | १ | १३ |
| राजकोट | ५ | ४ | १ | ३८ |
| कच्छ | ७ | ४ | ३ | ४३ |
| अहमदाबाद | २ | ० | २ | ७९ |
| सुरेन्द्रनगर | ९ | ३ | ६ | ८५ |
| **२ ) बाळवंटमय –** | | | | |
| मेहसाना | २ | ० | २ | ९७ |
| बानसकंथा | ७ | १ | ६ | ६८ |
| एकूण | ५२ | ३० | २२ | – |

पाण्याचा उपभोग करता येईल.

ऑपरेशनस् रिसर्च ग्रुप, बरोडाच्या ओ. आर. जी. १९८२ (रिजन्लिजम् ऑफ नर्मदा कमान्ड्) च्या सौजन्याने वरील दोन्ही आराखडे. म्हणजे ३० तालुक्यांपैकी फक्त बावीसच तालुक्यांना म्हणजे जवळ-जवळ ३० टक्के जमिनीला (दुष्काळी व वाळवंटी) पाणी मिळेल. कच्छ क्षेत्रातील फक्त २ टक्केच जमीन तशी शेतीस उपयुक्त आहे. तसं जर बारकाईनं बघितलं तर गुजरातच्या ६२ तालुक्यांपैकी ज्या दोन तृतियांश तालुक्यांना पाणी मिळणार आहे ते दुष्काळग्रस्त किंवा वाळवंटी घोषित झाले नाहीत. त्या तालुक्यांपैकी फक्त दोन तृतियांश तालुक्यांनाच थोडं पाणी मिळेल, किंवा एकद्मच फलश्रुत होणार नाही.

भारत सरकारच्या १९५२च्या कराराप्रमाणे ३३% फॉरेस्ट एरिया असायला पाहिजे परंतु तो दहा टक्के सध्या उपलब्ध आहे. कारण दरवर्षी भारत १.३ मिलियन हेक्टर्स जंगलक्षेत्र हारवत आहे लोकसंख्या वाढीमुळे (सॅटेलाईट डाटा) आणि त्यातच हा २२ लाख हेक्टर्सचा प्रादुषणिक तोटा जवळ-जवळ ८०,००० कोटी रु. जो किं एक नवा विक्रम आहे. हे प्रोजेक्ट आमच्यासारख्या प्रगतीशील देशांमधील सर्वांत मोठं खर्चिलं म्हणून गणणा होऊ लागली, त्यात काही वावगं नाही.

मेधा पाटकर पूर्ण प्रकल्पच ''रिव्ह्यू'' करायला सांगत आहे. ज्या प्रकल्पावरती आजतागायत अंदाजे १००० कोटी रु. खर्च आला; तो प्रकल्प एवढ्या सहजा सहजी बंद न होऊ शकणारा आहेत. लोकांचं सुनियोजित व सुसंगठित पुनर्वसन व प्रादुर्षणाचं काही अंशी का होईना, निर्मूलन जर शक्य झालं तर हा प्रोजेक्ट खरंच गुजरातला वरदान ठरेल ह्यात तिळमात्रही शंका नाही. आणि म्हणूनच गुजरात सरकारचा दृढ संकल्प ह्यातून ओतप्रोत भरलेला दिसून येतो. मेधा पाटकरच्या निर्धाराने केंद्रीय सरकार २९ जून रोजी बैठक भरवण्यात बाध्य झाले, व म्हणूनच तिने आपला भूक-हडताळ मागे घेतला. मणिबेली, टेकडीपाडा, वामीपाडा गावातील लोक स्वतःची गावे व शेतं सरोवराच्या पाण्यात डूबत, पाहत असताना त्यांच्या डोळयात पाणी न आलं तरच नवल. वर्षांनुवर्षे पिढ्यानपिढ्यापासून राहिलेले लोक स्वतःच्या गावांचा, मातृभूमी व पितृभूमीचा आनंद विसरू शकतील काय? कणा-कणाशी समरस झालेले लोक दुरावू शकतील काय? त्या सर्वांचं दुःख मेधा पाटकरनी जाणलं, परखलं. त्यांच्या दुःखाशी यातनांशी जीवांशी ती समरस झाली आणि म्हणूनच तिचा हा अवाढव्य ''प्राण त्यागाचा पवित्रा!'' कोणता प्रकल्प म्हणजे ''नर्मदा बचाओ'' की ''नर्मदा बनाओ'' वरचढ होणार हीच एक गूढ समस्या प्रत्येकाच्या मनी तरळत आहे.

● ● ●

# सरदार सरोवर - विकास की विनाश ?

**दीप्ती एकबोटे**

नर्मदा व तिच्या उपनद्यांवर ३० मोठी १३५ मध्यम व ३००० लहान धरणे व कालवे यांचा समावेश असलेल्या नर्मदा विकास योजनेतील सरदार सरोवर एक महत्त्वाचे मोठे धरण.

गुजरातजी जीवनधारा (Life Line) अशी प्रतिमा उभी करून गुजरातच्या राजकीय मंडळींनी या योजनेला प्रतिष्ठेचा प्रश्न बनविला आहे. गुजरातच्या कच्छच्या पाणी समस्येवर हा रामबाण उपाय आहे, धरणामुळे दुष्काळ निर्मूलन होणार आहे, वीज निर्मिती मोठ्या प्रमाणावर होऊन औद्योगिक विकासाला गती मिळणार आहे असे समर्थन केले जाते. परंतु या विकासाचे वाटप सामाजिक न्यायाला धरून आहे का? नर्मदा खोऱ्यातील आदिवासींचा बळी जाऊन कोणाचा विकास साधणार आहे? वा सामाजिक विषमतेचे चित्र जास्तच गडद होणार आहे? अशा महाकाय धरणाची आपल्या सारख्या विकसनशील देशाच्या विकासाला गरज आहे का? त्यापासून मिळणारे लाभ आणि हानी ह्यांचे गुणोत्तर किती? असे मूलभूत प्रश्न प्रकल्पाविषयी निर्माण झाले आहेत.

जंगलतोडीमुळे पावसाचे पाणी संचय करण्याची क्षमता कमी होते, व 'पाण्याअभावी दुष्काळ' असे चक्र सुरू होते. जंगलाअभावी जमिनीची धूप होते, त्यामुळे जमिनीचा पोत खराब तर होतोच पण त्याच बरोबर ही माती नदीच्या पात्रात साठून जमलेल्या गाळामुळे धरणाचे एकूण आयुष्य व त्यापासून मिळणारे फायदे कमी होतात. पावसाचे पाणी जमिनीत न मुरता सरळ नदी समुद्राला मिळते. परंतु दुष्काळ निर्मूलनासाठी उपनद्या, ओहोळ इत्यादींच्या उगमापासून पाणलोट क्षेत्र विकासाचा कार्यक्रम आखून पाणी वाटपाचे व शेतीचे नियोजन करायला हवे. नैसर्गिक जंगलांचे जतन करून, पाण्याची भूजल पातळी वाढवून त्याचा स्रोत कायम टिकवणे हीच उपाययोजना दुष्काळावर कायम स्वरूपाचे उत्तर असू शकेल.

नर्मदा प्रकल्पामुळे सौराष्ट्र, कच्छ या वाळवंटी भागाला पाणी मिळणार आहे असे म्हटले जाते. परंतु नर्मदेच्या पाण्याच्या पातळीत १५% घट झाली आहे, दलदलीचे, गाळाचे प्रमाण वाढले आहे. यावर अद्यापही सरकारकडे ठोस उपाययोजना नाही. त्यामुळे कालव्यांच्या टोकाला असलेल्या दुष्काळग्रस्त भागापर्यंत पाणी किती व कसे पोहचेल हे स्पष्ट होत नाही. उलट प्रकल्पामुळे मिळणारे पाणी गुजरातमधील विकसित प्रदेशातच फिरवले जाणार आहे. त्यामुळे आर्थिक विषमतेची दरी रुंदावण्याचीच शक्यता आहे.

प्रकल्पामुळे पर्यावरणाला हानी न होता, स्वस्त वीज मिळणार असाही मुद्दा मांडला

जातो. परंतु प्रकल्पामुळे मिळणारी वीज पारंपरिक उद्योग व औद्योगिक विकासाच्या एकूण गरजा लक्षात घेता नगण्य आहे. तसेच भारतात सूर्य, वारा, समुद्र या प्रकारच्या उर्जा माध्यमांचे विचार होणे शक्य असताना, अशा स्रोतांवर किती खर्च होतो हा एक संशोधनाचा विषय ठरावा.

पर्यावरणवादी या धरणाला, पाण्यात जाणाऱ्या जंगलामुळे नष्ट होणाऱ्या वनस्पती व प्राणीसृष्टी यासाठी विरोध करत आहेत. जंगल ही निसर्गाची एक 'इको सिस्टिम' असते. असंख्य जीवन साखळया तिच्यावर निर्भर असतात. जंगलच नष्ट झाले त्याही नष्ट होतात व कालांतराने मानवी पर्यायांनी न सुटणारे नवे प्रश्न निर्माण होत राहतात. धरणाचा सुगावा लागताच ठेकेदारांनी धरणाच्या आसपासची झाडे तोडून हा भाग ओसाड केलाच आहे. परंतु धरणामुळे सुपीक जमीन व जंगल पाण्याखाली जाऊन पर्यावरणावर कधीही भरून न निघणारी हानी होणार आहे. आजपर्यंत पर्यावरण रक्षणासाठी व पर्यायी जंगलासाठी कुठलाही आराखडा सरकारने आखलेला नाही असे जागतिक बँकेच्या अभ्यास गटाने सुद्धा म्हटले आहे.

पर्यावरणाच्या प्रश्नांबरोबर धरणामुळे विस्थापित होणाऱ्या धरणग्रस्तांच्या प्रश्नाकडे मानवतावादी दृष्टीकोनातून बघण्याची गरज आहे. या धरणग्रस्तांना त्यांचा जीवन जगण्याचा मूलभूत हक्क हवा आहे. त्यांचा एकच प्रश्न आहे धरण बांधताना आमचा विचार घेतला होता का? इतके दिवस गप्प बसलेले धरणग्रस्त 'हमारे गांव में हमारा राज' अशा घोषणा देत आंदोलनात सामील झाले आहेत व 'कोई नही हरेगा बांध नही बनेंगा' असा त्याचा निर्धार झाला आहे. तर सरकार पुनर्वसन केलेल्या कुटुंबाची आकडेवारी देऊन पुनर्वसनाचे काम व्यवस्थित चालू आहे असा दावा करीत आहे. परंतु तिन्ही राज्यात पुनर्वसनाचे समान धोरण नाही. विस्थापितांमधील फक्त धरणामुळे ज्यांची घरे, शेती पाण्याखाली जाणार आहे त्यांचा समावेश आहे. परंतु नावाडी, मच्छीमार, कारागीर ज्यांचे जीवन जंगलावर अवलंबून आहे त्याचा धरणग्रस्तांमध्ये समावेश नाही, त्यांची संख्या मोठी आहे. या सर्व विस्थापितांचे पुनर्वसन खरोखर शक्य आहे का? एवढी जमीन खरोखर उपलब्ध आहे का? एकीकडे धरणाच्या बांधकामात गुंतलेल्या अधिकाऱ्यांसाठी केवडिया कॉलनीसारखी हॉस्पिटल, क्लब, शाळा, मार्केट यांनी सुसज्ज वसाहत वसविली आहे. पण एकही धरणग्रस्त गाव एकत्र वसवले गेले नाही. कुटुंबं विभक्त झाली आहेत. विस्थापितांना मिळालेल्या जमिनी तुकड्यात आहेत व त्या एका ठिकाणी नाही. या जमिनी विस्थापितांच्या नावावर केलेल्या नाहीत त्यामुळे धरणग्रस्त हैराण झाले आहेत. या आदिवासींना, शेतकऱ्यांना देशोधडीला लावून होणारा विकास एकांगी विकास नसेल का? राष्ट्रीय सार्वभौमत्व किंवा राष्ट्रीय हित या नावाखाली प्रकल्पग्रस्तांच्या मानवी हक्कांवर आक्रमण करण्याचा हक्क कोणत्याही राष्ट्राला नाही, हे मान्य करून सुद्धा प्रकल्पग्रस्तांच्या भावनांना गौण स्थान दिले गेले आहे.

आजपर्यंत पर्यावरण रक्षणासाठी व पर्यायी जंगलांसाठी, विस्थापितांच्या पुनर्वसनासाठी ठोस उपाय योजना केंद्र सरकार वा राज्य सरकारने आखलेली नाही.

तसेच गाभ्याचा अभ्यास पूर्ण न करता मांडलेल्या लाभ हानीच्या आकड्यांबद्दल सांशकता वाटून कालांतराने विपरीत परिणामांना तोंड द्यावे लागेल. अशाप्रकारे इशारा नि:पक्षपणे जागतिक बँकेने नेमलेल्या मोर्स समितीने सुद्धा दिलाच आहे.

या पार्श्वभूमीवर आजची विकासनीती व विकासाच्या संकल्पना तपासून पाहण्याची गरज प्रकर्षाने जाणवते. ह्या प्रकल्पामुळे देशाच्या विकासाला कितपत मदत होणार आहे? त्यासाठी एवढा मोठा प्रकल्प अपरिहार्य आहे का? आपल्या देशाच्या गरजा लक्षात घेऊन नैसर्गिक संपत्ती विचारात घेऊन, देशाच्या तज्ञांच्या सहाय्याने, लोकांच्या सहभागाने दुसऱ्या योजना आखता येणार नाहीत का? दुष्काळ, पाण्याचा प्रश्न, वीज हे प्रश्न सोडवण्यासाठी अशा प्रकारचे प्रकल्प कायमचे उत्तर आहे का? का त्यातून नवीनच समस्या उद्‌भवणार आहेत? थोड्या हितसंबंधितांच्या फायद्यासाठी, प्रकल्पग्रस्तांना देशोधडीला लावणे न्याय आहे का? ह्या सर्व बाबींचा आढावा घेऊन विकास योजनेचा पुनर्विचार करणे संयुक्तिक वाटते. कारण आदिवासींच्या पुनर्वसनापुरता ह्या प्रकल्पाचा प्रश्न मर्यादित न राहता, पर्यावरण संतुलन व विकासनीती या अनुषंगाने ह्या प्रश्नाने जागतिक स्वरूप धारण केले आहे.

● ● ●

महाराष्ट्र राज्य साहित्य व संस्कृती मंडळाने या नियतकालिकास अनुदान दिले असले तरी, नियतकालिकातील लेखकांच्या विचारांशी मंडळ व राज्य शासन सहमत असलेच असे नाही.

**— वर्गणीदारांस सूचना —**

ज्यांची वर्गणीची मुदत संपली आहे. त्यांनी पुढील वर्षासाठीची वार्षिक वर्गणी रु. ३०/- फक्त त्वरित पाठवावी, ही विनंती.

*— संपादक*

**— लेखकांसाठी —**

'हाकारा' हे आदिवासी प्रश्नांना वाहिलेले एकमेव मराठी नियतकालिक आहे. यातून आदिवासी जीवन, संस्कृती, साहित्य, सण, उत्सव, कला, तसेच आदिवासी कार्यकर्ते व आदिवासींमध्ये काम करणाऱ्या कार्यकर्त्यांचे अनुभव, काही सेवाभावी व्यक्तींची व्यक्तीचित्रणे याशिवाय आदिवासीसंबंधीच्या कथा, कविता इत्यादी सर्व प्रकारच्या साहित्यांना प्रसिद्धी दिली जाईल. आपण आपले साहित्य नियमित पाठवीत जावे.

*— संपादक*

# सरदार सरोवर - पुनर्विचार करावा

**डॉ. व्ही. जी. कुलकर्णी**

तसं पाहिलं तर सर्वच प्रकल्प हे देशाच्या जनतेच्या हिताचे असतात. पण, त्याची योजना जर सर्व बाजुंनी सर्व गोष्टींचा तसेच त्या प्रकल्पामुळे ज्या जनतेचे जीवन धोक्यात येणार आहे, अशांसारख्या घटकांचा विचार अगोदर करून, पीडितांचे पुनर्वसन समाधानकारकरित्या करण्याची योजना असेल तर तो प्रकल्प देशाला वरदान ठरतो. नाहीतर, वादग्रस्त होतो. यासाठी अशा प्रकल्पांची कार्यवाही करण्याअगोदर प्रकल्पाबद्दल अनुकूल वा प्रतिकूल विचारांचा अभ्यास करायला हवा. आणि समजा असा विचार जर झालेला असेल तर प्रकल्पाला विरोध होण्याचा संभव फार कमी असतो, किंवा नसतोही.

परंतु जर जनतेचा विरोध तर तीव्र असेल तर त्याचा पुनर्विचार करणे योग्य ठरते. ज्याअर्थी, मेधाबाई पाटकर व नर्मदा बचाव समिती प्राणपणाला लावून विरोध करतात, तर त्याचाही गंभीरपणे विचार करणे योग्य होईल, व नाईलाजाने असे विधान करावेसे वाटते की, तो विरोध जर मोडून काढायचे प्रयत्न होतात तेव्हा त्यामागे काही स्वार्थी माणसांचे हितसंबंध असावेत असे वाटते.

माझ्या अल्पमतीप्रमाणे नर्मदा प्रकल्प हा गुजरात, मध्यप्रदेश व महाराष्ट्र या तीनही राज्यांना फायदेशीर आहे तज्ञ मंडळीनी तो सुद्धा विचार केलेला असणार, पण कदाचित त्या प्रकल्पाची उपयुक्तता जनतेला पटवण्यात सरकारही कुठेतरी अपुरे पडत असावे. अशी शंका येते. ज्या जतनेची जमीन घरेदारे सरोवरात जाणार आहे त्यांचा विचार अग्रभागी असावा. त्या अगोदरच घरांची बांधणी व पुनर्वसनासाठी जमिनीची योजना हवी. प्रकल्पाच्या सुरुवातीअगोदर त्यांच्या उदरनिर्वाही उद्योगधंद्याची व्यवस्था तयार हवी. उत्तम प्रकारची घरे हवीत पाणी, इलेक्ट्रिसिटी, रस्ते, दवाखाने, शाळा सर्व हव्यातच आणि दुसराही विचार सरकारच्या मनात असावा की पिढ्यानपिढ्या ज्या जनतेच्या ज्या जमिनी गेल्या, त्याबद्दलही ज्या हळुवार भावना असतात त्यांचाही परिणाम विरोधामागे असतोच.

नुसती आकडेवारी व अंदाजी आडाखे हे बहुजन व ग्रामीण जनतेला पटणारे नसतात. ज्यावेळेस ते प्रत्यक्षात येतील तेव्हा ते पटतील प्रकल्प सुरु होण्याअगोदरच सामोपचाराने जनतेचे स्थलांतर आवश्यक होते. एकेक झोपडी पाण्याखाली गेल्यानंतर दिसते फक्त नुकसान व हानी. पोलीसखाते हे जनतेचे मित्र जरूर आहेत पण त्यांची गर्दी मणीबेलीत अगोदरच झाली तर लोकांना संशय येणे साहजिक आहे. जे समजूतदार नागरिक आहेत त्यांचे स्थलांतर अगोदर करवावे व जेव्हा अशा स्थलांतरीत जनतेच्या मनात सुरक्षिततेची, उद्योधंद्याच्या हमीची भावना निर्माण होईल तेव्हा आपोआपच स्थलांतर विना विरोध होईल त्या ठिकाणी बळजबरी उपयोगाची नाही. त्यामुळे विरोध प्रखर होतो.

प्रकल्पानंतर जे काही उद्योगधंदे सुरू होणार त्यासाठी सरोवरामुळे जे लोक पीडित झाले आहेत त्यांना रोजगार मिळाला पाहिजे

त्यांना प्राधान्य हवे. जीवन स्थैर्याची खात्री पटली पाहिजे.

नवीन पुनर्वसन विशेषत: शेतीव्यावसीय बंधुंचे, त्यांना सरकारने कर सवलत, शेतीसाठी आर्थिक सहाय्य, बी-बियाणेही पुरवले पाहिजेत. अगदी व्यवस्थित पीक पाणी, उत्पादन होईपर्यंत. प्रकल्पावर काम करणारेही तेथील लोकांना प्रथम रोजगार मिळाला पाहिजे. त्यांना प्राधान्य मिळालेच पाहिजे. तो त्यांचा प्रथम हक्क मानावा.

ज्यांच्याजवळ आर्थिक सुबत्ता आहे, त्यांचा प्रश्न येत नाही पण जे दुर्बल आहेत त्यांच्याही तोंडीचा घास काढून घेतल्याची जाणीव त्यांना होते. ती भावना त्यांच्या मनात येते. सर्वसाधारण पांढरपेशा वर्ग म्हणतो. निवडणुकांकडे लक्ष देऊन हे प्रकल्प घाईघाईने राबवले जातात तेही विचार करण्यासारखे आहेच. पुण्याजवळचे पानशेतधरण फुटले त्याच्यामागेही राजकारण होतेच. राजकीय विरोधी पक्ष त्याचेही विरोधी भांडवल करतातच.

दुसरी एक कल्पना मनात येते की नर्मदा नदीला ज्या अनेक छोट्या छोट्या नद्या येऊन मिळतात त्यावरच छोटी छोटी धरणे बांधली तर काय नुकसान होईल? नर्मदा प्रकल्पावर जो प्रचंड खर्च होत आहे त्याचा ताणही आर्थिक व्यवस्थेवर पडला नसता. प्रत्येक राज्याने तो वाटून घेतला असता व तेही सोपे गेले असते. सरदार सरोवराखाली जी जमीन मोठ्या प्रमाणात जाणार आहे व पुनर्वसनाचाही आर्थिक बोजा पडणार आहे तोही पडला नसता. अर्थात हे प्रश्न एक कल्पना म्हणून मांडले आहेत. मुख्य हेतू जमीन जास्तीत जास्त पाण्याखाली आणून शेती उत्पादनात वाढ करणे हा आहे व त्या अनुषंगाने पुनर्वसनादि प्रश्न निर्माण झालेले आहेत हे विसरून चालणार नाही.

परंतु सरकारनेही हा विचार मनात ठेवला पाहीजे की आपला देश विकासाच्या मार्गावर आहे. देशाची लोकसंख्याही झपाट्याने वाढत आहे धान्य उत्पादन वाढवणे महत्त्वाचे आहे. निरनिराळे प्रकल्प (विशेषत: धरणासारखे) उभारणेही आवश्यक आहे व त्यामुळे निर्माण होणारे प्रश्नही अटळ आहेत व त्यांचासुद्धा सातत्याने विचार करणे गरजेचे आहे.

नर्मदा बचाव समिती त्यांचे कार्यकर्ते श्रीमती मेधाबाई पाटकर यांच्याही प्रयत्नाला व त्यागाला तोड नाही. त्याचे वर्णन शब्दात करणे कठीण आहे परंतु त्यानाही कळकळीने सांगावेसे वाटते की अशा प्रश्नावरचे तोडगे, पर्याय हे कायम तयार ठेवावेत. सरकारशी सहकार्य करावे व कोणत्याही नर्मदा प्रकल्पाप्रमाणे निर्माण होणाऱ्या प्रकल्पाच्या योजनेत त्यांनी सहभागी व्हावे, त्यात भाग घेऊन फायदे तोटे याचा विचार करावा व जनमत जे योग्य असेल ते तयार करावे त्यात शक्यतो बहुसंख्य जनतेचा विचार मात्र असावा.

आज नर्मदा प्रकल्पावर कोट्यावधी रुपये खर्च झालेले आहेत ते रोखण्यात फायदा जनतेचाही नाही व सरकारचाही नाही. एखादा रोग शरीराला झाला व त्यावर शस्त्रक्रिया करण्याची वेळ आली तर एखादा अवयव बाद झालेला असेल तर काढून टाकावा लागतो कारण शरीर वाचवणे, प्राण वाचवणे महत्त्वाचे ठरते. केवळ एका अवयवाचाच विचार करणे इष्ट नसते. आज देशही आर्थिक अडचणीतून चालला आहे.

मला वाटते नर्मदा प्रकल्पाचा विचारही थोड्या विस्तृत, विशाल दृष्टीकोनातून सरकारने व विरोध करणाऱ्यांनी करावा व प्रकल्पाचा पुनर्विचार करावा हा प्रश्न केवळ विरोधी जनतेच्या किंवा सरकारच्या प्रतिष्ठेचा विषय होऊ नये, त्याला योग्य तोच न्याय मिळावा.

प्रतिक्रिया

# मणिबेली संघर्ष झालाच पाहिजे ...

**शिवाजी ल. कांबळे**

गेल्या आठ वर्षापासून नर्मदा खोऱ्यातील स्त्री-पुरुष विनाशकारी सरदार सरोवर धरणाच्या विरोधात शांतीपूर्वक संघर्ष करीत आले आहेत, शासन आणि धरण समर्थक हे मोठ्या प्रमाणावर धाक दपटशाही, बदनामी, खोटी माहिती अशा विविध पद्धतीने यांच्यावर हल्ले करत आले आहेत.

तेवढे सगळे त्यांच्याकडून प्रयत्न होत असूनही नर्मदा खोऱ्यातील लोक विचलीत न होता जीवन जगण्याचा संघर्ष करत आले आहेत. याच बरोबर आजपर्यंत जे जे काही विकास या नावाखाली निर्माण केले गेले त्या विषयी या निमित्ताने काही महत्त्वपूर्ण मुद्दे उपस्थित झाले आहेत आणि विशेष म्हणजे या सर्व गोष्टीला मोठ्या प्रमाणावर लोकांचा पाठिंबा व सहभाग मिळत आहे.

सरदार सरोवर प्रकल्प हा विनाशकारी प्रकल्प आहे, हे माहीत असताना सुद्धा जागतिक बँकेने या प्रकल्पाला मदत व प्रतिष्ठा प्राप्त करून दिली परंतु या नर्मदा बचाव आंदोलनामुळे या प्रतिष्ठेच्या बँकेने सुद्धा यातून माघार घेतली आहे. तसेच ३० मार्च ९३ रोजी सरकारला या विषयी निर्णय घेणे भाग पडले.

जागतिक बँक आणि आंतरराष्ट्रीय नाणे निधी पुरस्कृत केलेले आणि आतल्या गोटातून विकसनशील देशावर सत्तीचे करू पाहणारी खुली व भांडवलदारी अर्थव्यवस्था, गेट डंकेल प्रस्ताव बहुराष्ट्रीय कंपन्याच्या माध्यमातून नववसाहतवाद या सर्वांच्या विरोधात विविध पातळयांवर काम करणाऱ्या स्वयंसेवी संघटनाचा हा विजयच मानावा लागेल.

सततच्या लोकांच्या व संस्थांच्या संघर्षामुळे नव वसाहतवादास मागे पाऊल टाकावे लागते हेच यातून सिद्ध होते. जागतिक बँकेने यातून घेतलेली माघार हेच दर्शवते परंतु आव्हाने इथूनच सुरू होतात. नर्मदा खोऱ्यातील व विशेषत: मणिबेली व आसपासच्या गावातील लोक जागेवरून हलायला तयार नाहीत. धरणासंबंधी फायदा तोट्यापासून ते विस्थापन पर्यावरणादि हमी आर्थिक दुर्बलता इत्यादी प्रश्न असूनसुद्धा धरणाचे काम पुढे रेटायचे आणि लोकांना भयभीत करायचे व तेथून गाव सोडून जाण्यास मजबूर करायचे. हेच शासनाचे आतापर्यंतचे धोरण राहिले आहे. राजकारणही तसेच आहे, आतापर्यंतच्या विकासात देखील हेच होत आलेले आहे. शासन निर्मित या दहशतवादाने लोकांना दाबून दडपून टाकले आहे.

परंतु नर्मदा खोऱ्यातील लोकानी या शासकीय दहशतवादास प्रतिआव्हान दिले आहे. जर का शासनाला लोकांना बुडू देण्याची इच्छा असेल तर आंदोलनकर्ते देखील "डुबेंगे पर हटेंगे नही," या घोषणे सोबत पाण्याशी सामना करण्यास तयार आहेत. शांततापूर्ण लोकशाहीवादी आंदोलनासमोर शासनाने पर्याय तरी कोणता ठेवला आहे? गेल्या तीन वर्षात कमीत कमी

तीन वेळेस उच्चस्तरीय शासकीय अधिकाऱ्यांसमवेत खुल्या चर्चा झाल्या तसेच इतरही काही कार्यक्रमात या धरणाविषयी पुनर्विचाराची आश्वासने मिळाली होती परंतु हे सर्व निरर्थक होते. ढोंग होते हेच यातून सिद्ध झाले आहे.

१९९१ व १९९२च्या पावसाळ्यात मणिबेली (महाराष्ट्र) व बडगाम (गुजरात) या सर्वात खालच्या भागातले लोक आपल्या जागेवर निर्धारपूर्वक बसून राहिले. १९९२ मध्ये तर जेथे लोक बसून होते तेथून नर्मदा नदी दोन अडीच फूट खालून वाहत होती. १९९३च्या १० जून पासून नर्मदा खोऱ्यातील शेतकरी आदिवासी स्त्री-पुरुष या अन्यायपूर्वक घटनाविरोधी व अनैतिक घटनेला आव्हान देऊन हे आंदोलन चालूच ठेवले आहे.

यावर्षी धरणाचे बांधकाम ६१ मीटर उंचीपर्यंत झाल्याने मणिबेली, बडगामसहित महाराष्ट्र व गुजरातमधील १८ ते २० गावे बुडण्याची शक्यता आहे आणि यालाच आव्हान देत मणिबेली सत्याग्रह चालू आहे. आंदोलनाचा समर्पित दल पाण्याचा सामना करत आहे. पोलिसांचा अन्याय मारझोड सहन करीत ते सामना देत आहेत.

या वेळेचा संघर्ष निर्णायक आहे. एकतर समर्पित दलाचे बलीदान अर्पण होईल किंवा शासनाला काम ताबडतोब थांबवून व्यापक आणि आंदोलनकारी लोकांच्या सहयोगाने पुनर्विचार करावा लागेल. यासाठी आंदोलनाच्या नेत्या तसेच आदिवासीची 'माता नर्मदा' मेधाताई पाटकर १५ दिवस उपोषणाला बसल्या होत्या. या संदर्भात केंद्रीय सरकारने सर्व मुद्यांबाबत समाधानकारक स्पष्टीकरण केल्याने त्यांनी आपले उपोषण मागे घेतले आहे. मेधाताईंना उपोषण अवस्थेत असतानासुद्धा चांगली वागणूक दिली नाही. त्यांची प्रकृती अगदी अत्यवस्थ झाली आहे. त्याने लगेच जाहीर केले की उपोषण जरी मागे घेतले असले तरी आंदोलन चालूच राहील. आणि खरोखरच शासनाला या सत्याग्रहापुढे झुकावे लागेल. सरदार सरोवराचा पुनर्विचार झालाच पाहिजे.

● ● ●

# नको करू संहार

थांब मानवा, मानवतेची, राख जराशी आब
सुधारणेच्या दिशा दावुनी, नको करू संहार ।
निसर्ग निर्मित जलाशयाचा होवो सद् उपयोग
वृक्ष वेलींना छेलूं द्यावा हरियालीचा साज ।
ही हरियाली जीवन दायी निमित्त जल-समृद्धीचे
वनराई अन् जलाशयानी पर्यावरण समतोलाचे ।
मार्ग बदलुनी आक्रमणाने होई वन-जन विध्वंस
अघटित घटना न घडो द्यावी निसर्ग करुया समृद्ध ।
विस्थापन होणार जरी असे निवास द्या जीवनासवे
आत्मसमर्पण करुनी कोणी हक्क मिळविण्या राजी असे ।
सत्ताधीशा नको उगारु जीवनावरी घात घाला
आग्रही वृत्ती न करी धारण नाहक बळी टाळायाला ।

**र. पां. काणेकर**

**प्रतिक्रिया**

# मणिबेलीची हाक - सरदार सरोवर

**दीपक गायधनी**

मणिबेलीत मेधा पाटकरांनी अभूतपूर्व आंदोलन उभारले आहे. तरुणांची स्फूर्ती देवता असेही विशेषण त्यांना लावण्यात येत आहे. मणिबेलीसह २४५ गावांना या प्रकल्पाचा फटका बसणार आहे. मणीबेली येथील नारायण भाई किंवा केशुभाई ह्या आंदोलनात सक्रीय आहेत. सरदार सरोवर प्रकल्पात ३० मोठी धरणे, १३५ मध्यम व तीन हजार छोटी धरणे बांधणार आहेत. खर्च अंदाजे वीस हजार कोटी रुपये येणार आहे. यामधून राजकारणी ठेकेदार कंत्राटदार व इंजिनियर यांच्या कमिशनची मोठ्या प्रमाणावर सोय होणार आहे. १९८७ साली महाराष्ट्र, गुजरात व मध्य प्रदेशच्या मुख्य मंत्र्यानी ह्या योजनेस हिरवा कंदील दाखवून परवानगी दिली.

आपण सरकार नालायक आहे असे नेहमी म्हणतो परंतु एक नागरिक म्हणून आपण किती जबाबदार आहोत हे अगोदर तपासून पहायला हवे. सद्या स्थितीत सर्वांनीच आत्म परीक्षण करण्याची गरज आहे. आधी सामाजिक सुधारणा करा. राजकारणी लोक आज स्वत:च्या कल्याणाकरिता सत्तेचा वापर करतात.

नर्मदा बचाव आंदोलनाला पाठिंबा मिळत आहे. कारण मेधा पाटकरांसारखी नेतृत्त्व करणारी एक सेवाभावी महिला आदिवासींच्या कल्याणाकरिता स्वत:चा जीव धोक्यात घालून उपोषण करते आहे. आदिवासी जनता अनाडी आहे. त्याला जागे करण्यासाठी हे आंदोलन आहे.

मोठ्या धरणांसाठी बांधकामात खूप वेळ खर्ची पडतो. त्याला प्रचंड पैसा लागतो. अनेक कुटुंबे विस्थापित होतात. त्यामुळे छोटी धरणे हा सर्वोत्तम उपाय आहे. जगभर आता छोट्या धरणाचा विचार सुरू आहे. पाणी अडवून ते वापरण्याच्या बाबतीत इस्रायलने मिळवलेले यश वादातीत असून तेथे हाच विचारप्रवाह आहे. भारतासारख्या विशाल देशात परिस्थिती जाणून नियोजन करणे हे अधिक महत्त्वाचे आहे. सरदार सरोवर प्रकल्प होऊ द्यायचा नाही हा नर्मदा बचाओ आंदोलनाचा एकमेव हेतू अजून तरी सफल झालेला नसला तरी आंदोलनामुळे महाराष्ट्रातील विस्थापितांना नक्कीच फायदा झाला आहे. व हे कोणीही मान्य करील तथापि आंदोलनाच्या टोकाच्या भूमिकेमुळे त्यांची बरीचशी शक्ती आणि वेळही वाया गेली आहे. हे नाकारून चालणार नाही. आधी धरणाचे काम थांबवा आणि मगच चर्चा करा, असा हट्ट आंदोलनाने चालविला होता. नर्मदा खोऱ्यात मोठ्या प्रमाणावर वृक्षतोड सुरू आहे. जूनच्या पहिल्या आठवड्यात महाराष्ट्र हद्दीतील केवळ २४ हेक्टर जंगलातली झाडे तोडली गेली होती. ही वृक्षतोड थांबवावी असा आदेश करायला मुख्य मंत्र्याना आंदोलकांनी नुकतेच भाग पाडले आहे. पण त्यातून काय साधले जाणार ते कळत नाही. या पावसाळ्यात धरणाच्या भिंती इतके म्हणजे ६१ मीटरपर्यंत पाणी भरले गेले तर महाराष्ट्रातील ४९ हेक्टर जंगल पाण्याखाली जाणार आहे. आता

वृक्षतोड थांबविल्यामुळे २५ हेक्टर जंगल संपत्ती पाण्यात जाईल. पर्यायाने महाराष्ट्र सरकारचे करोडो रुपयांचे नुकसान होणार आहे. ही वृक्षतोड थांबवून आणि ती वनसंपत्ती 'नर्मदार्पण' करून पर्यावरणाचे कशाप्रकारे रक्षण केले जाणार आहे हे आंदोलकांनीच सांगावे.

नर्मदा बचाओ आंदोलनाला सक्रीय पाठिंबा देणारे आणि जल समर्पणाचा इशारा देणारे थोर समाजसेवक बाबा आमटे यांचे नाव अजूनही या आंदोलनाच्या निमित्ताने वृत्तपत्रात छापून आलेले नाही. त्यामुळे सध्या बाबा आमटे कुठे आहेत असा प्रश्न काहींना पडलेला आहे.

सरदार सरोवर प्रश्नी केंद्र सरकारने पुनर्विचार करावा ही मेधा पाटकरांची मागणी आहे. केंद्र सरकारबरोबर होणाऱ्या चर्चेतून धरणाचे काम थांबविण्याचा निर्णय म्हणजे 'पुनर्विचार' असे त्यांना अपेक्षित असेल तर ते संभव वाटत नाही. तथापि धरणाची उंची कमी करण्याचा निर्णय घेतला जाऊ शकतो. आंदोलकांना तो निर्णय मान्य करायला हरकत नसावी. तसे झाले नाही तर मात्र आंदोलकांची सर्व शक्ती आणि वेळ वाया जाण्याची वेळ कदाचित येऊ शकते आणि मेधा पाटकर यांच्या कार्याविषयी आदर वाटणाऱ्यांना त्यामुळे निश्चितच दु:ख होईल.

●●●

# नर्मदा प्रकल्पाचा विस्थापित होणाऱ्यांना फायदा काय?

**राजेश बा. साबळे**

विस्थापितांचे पुनर्वसन जागतिक बँकेच्या धोरणानुसार झाले आहे. या प्रकल्पांतर्गत होणाऱ्या विस्थापितांची पहिली वसाहत १९८७ साली उभारण्यात आली. विस्थापित व्यक्तीस ५ एकर जमीन दिली जाते. याखेरीज प्रत्येकाला बैलगाडी घेण्यासाठी पाच हजार रुपयांची मदत दिली जाते.

बडोद्याजवळील संखेडा तालुक्यातील परवेटा गावाची पुनर्वसन वसाहत पाहताना या गावी मणीबेली गावच्या विस्थापितांचे पुनर्वसन करण्यात आले आहे. या वसाहतीत प्राथमिक शाळा, वीज, रस्ते, विहीर, हातपंप, तर काही ठिकाणी गोबर गॅस प्लॅन्टची उभारणी करण्यात आली आहे. मणिबेलीचे १३४ जण या वसाहतीत राहत आहेत.

या धरणामुळे सर्वात जास्त विस्थापन होणारी कुंटुंबे आहेत मध्यप्रदेशातील. तेथील ५०० कुटुंबे गुजरातच्या पुनर्वसन वसाहतीत राहायला आलेली आहेत.

या वसाहती नव्या आहेत, त्यांना अजून व्यवस्थित रुळायचे आहे. आदिवासी या शेतजमिनीत तूर, कापूस आणि ज्वारी ही पिके घेतात.

'नर्मदा अभियान'चे प्रमुख कृष्णप्रसाद पटेल व राज्यातील सर्व स्वंयसेवी संघटना आणि राजकीय पक्ष, हा प्रकल्प व्हावा या मताचे आहेत. राज्यातील वीस संघटना या कामात सक्रीय आहेत. सरदार सरोवर प्रकल्पाचा पुनर्विचार करण्याची मागणी मात्र जवळपास सर्वांनीच फेटाळून लावली आहे.

●●●

## धरण आलं गं...

धरण आलं गं धरण आलं
घर जमीन नि गाव बुडालं।
आदिवासी आम्ही जंगलची प्वारं
चुलीला लाकूड पोटाला ज्वारं ।
धरण आलं गं धरण आलं ॥
जंगल गेलं नि शेत बुडालं
राबुनराबुन हे घर बांधलं
कोसावरूनही पाणी वाहिलं
धरण आलं गं धरण आलं ॥
कसलं घर नि कुठं शिवार
सरकार म्हणतं, "गाव उठवा,
कशाला सगा नि कशा सोयरा?"
धरण आलं गं धरण आलं ॥
"मरून जावो हा तडवी भिल"
धरण आहे नावाचं मोठं
कुणाला बिजली शेतात पाट
धरण आलं गं धरण आलं ॥
आम्हाला डोळाभर पाणी भेटलं
येऊ द्या आता धरणाचं पाणी
ओळखू आम्हीही साहेबी वाणी
गावाला गाव नि मन जुळलं
एकीचा बांधच कामाला यील

**-- मेधा पाटकर**

## नर्मदेचे क्षुब्ध पाणी

त्या तिथे पेटले आहे
नर्मदेचे क्षुब्ध पाणी
सरदार सागरासाठी
घरदार गेल्यांची कहाणी ॥
नर्मदा माता जगाची
पावन तिर्थ धारा
कुशीतल्या लेकरावरी
उठलीस कशी संहारा ॥
त्या तिथे नर्मदा तिरीं
मणीबेलीच्या कुशीत
एक झांशीवाली मेधा
शासनाचा जीव मुठीत ॥
ॐकार घुमतो आहे
दूर उत्तरा किनारी
हुंकार महा पुरुषाचा
मानवतेला पुकारी ॥
आग लावित चालले
नर्मदेचे क्षुब्ध पाणी
आदिवासींच्या उजाडणाऱ्या
संसाराची कहाणी
न्याय अन्यायाच्या ह्या
ह्या लढ्याला अंत नाही
वेगळया संदर्भात चाले
लढवय्यांना खंत नाही ॥

**निशिकान्त**

## हा भयद संहार आहे

**निशिकान्त धुळे**

चंद्र मौळी झोपडीला
पेटलेली नर्मदा
भूमी पुत्रांना हुसकुनी
देशो धडी संसार त्यांचा
सर्वस्व त्यांचे लाटुनी
बोलके ढलवे तयांचे
मणीबेलीच्या कुशीत
प्राणाहुती द्यावयाला
मानवतेला हाकारीत
महा पुरुषाचा हुंकार
चंद्रमौळी झोपडीत
या चला विझवायला
लागला अंगार आहे
हा अनोखा श्रृंगार आहे
बांधिती सरदार सागर
हा कसा अन्याय आहे
ढीग देती आश्वासने
हा कसा पर्याय आहे
नर्मदेच्या त्या तटाकीं
मेधा राणी सिद्ध आहे
दूर उत्तरा तिरीं
हा तसा अनिरुद्ध आहे
लागला अंगार आहे
हा भयद संहार आहे.

## 'आसवांनो ...,'

आता येऊ नका आसवांनो ...
तो अधिकार आता तुम्हा नाही
कितीही झाले जरी दु:ख अनावर
एक अश्रू कदापी ढाळायचा नाही

सद्‌भावना भाषा वगैरे बोलू नका
'ते' विषय आता काढूच नका
तुम्ही आसवं आहात लबाड
जुणी कहाणी इथे सांगूच नका

निरक्षित रहिवाशांना पळविले धाक धपट शाहीत
तेव्हा होतात तरी तुम्ही कोठे ?
किती केले अनाथ, संसार उद्‌ध्वस्त
लबाड आसवांनो तेव्हा होतात कोठे ?

आता झालं शांत अशांत
काय फायदा आता आसवांनो ...
किती केले बेघर मुसाफिर
बहिष्कार तुमचा लबाड आसवांनो ...

## 'देवा'

सगळीकडे असावी हिरवळ
निर्मळ आणि सुहृदय मने
सगळ्यांना भोगता यावी सुखे
कमी होऊनी जावीत ही दु:खे

सगळीकडे दिसावा दयाळू सागर
सान-थोर सामावूनी घेणारा
मासे-मगरी शंख-नि जलचर
कोणताही भेद न मानणारा

सगळीकडे असावा रम्य सुकाळ
नसावा कुठे कोणताही दुष्काळ
नेहमी असावे सगळे आनंदी
नव्या आशेने यावी हरेक सकाळ

हे परमेश्वरा, विनंती नम्र तुला
सगळ्यांवरी कृपा दृष्टी ठेवा
सगळे काही असू द्यावे ठीक
पुन्हा विनंती कर जोडुनी 'देवा'।

**दिलीप धोंडू चौधरी**

## पुनर्वसन

उद्‌ध्वस्त जीवन सारे काय केला मी गुन्हा
टाकिल्या पुसोनी साऱ्या नियतीने त्या खुणा
माझा कुणा म्हणू मी राहिला न आज कुणी
सारेच संकटी या हात द्यावा कोणास कोणी
इथेच होते हो घर कसे कुणास सांगू
जोताही नेला पुरानी, पुरावा काय देऊ
पुर्वापार जपली जी वास्तु माझ्या कुळांनी
गायी गुरे पिल्लानी ही साथ केली जीवांची
गेले हो वैभव सारे ना उरली ती शान
समाज जीवनीही आता उरला न मान

शेतीस खुलविण्या येई हा पावसाळा
परि जाळीतो मनास माझ्या अंतरी हा ऊन्हाळा
मातीशी अतूट नाते खेळलो अंकी जिच्या मी
ती ही रुष्ट झाली आज पोरका पुरता मी
घ्या ही मदत नी करा पुनर्वसन घराचे
सांगा परी कसे ते करावे बा मनाचे.

**शिवराम देवलकर**

## धरण आणि मरण

जेथे आदिवासी तेथेच धरण
तेच आदिवासींचे मरण
जेथे आदिवासी तेथेच खाण
साली आदिम जीवनाची घाण
जेथे आदिवासी तेथेच प्रकल्प
तोही त्यांना मारण्याचाच संकल्प
तेथे राबणारे हात ही आदिवासीय
पण तेच पडतात तोंडघशी.
साले धरण - आले मरण
साली खाण - गेले प्राण
प्रकल्प ... ?
इतरांचा कायाकल्प
आमचा तर मरण संकल्प
कोण म्हणतो आम्ही देश विरोधी ?
कोण म्हणतो आम्ही विकास विरोधी ?
अहो, असे नाहीच मुळी.
पण ...
बळी तो कान पिळी,
सोम्याच्या सुखासाठी
गोम्याचा बळी ?
बळींची उचलता तळी,
अन् त्यांच्यासाठी आमचा बळी ?
वाहरे बंधुता आणि समता !
वाहरे देशाची एकता !!
आमच्याच भूमित आम्ही उपरे
भरपाई चे आज सतरा नखरे
विस्थापनापूर्वी केल्या मोठ्या मोठ्या बाता
आता फक्त लाथाच लाथा
मधाचे बोट दाखवून
तोंडात घालता कोरडे बोट !
हाच देशहिताचा निकष की--
आमच्या विनाशातून तुमचा विकास
आमचे होईल जीवन भकास
तुमचे मात्र चालेल झकास
हाच का देशाचा विकास ?

**चामूलाल राठवा**

## आग लागली सातपुड्याला

सातपुड्याला आग लागली, आग लागली
या नर्मदेच्या पाण्याने !
सात पुड्याला आग लागली, आग लागली
या धरणाच्या पाण्याने !
इंदिरा सागर,
नर्मदा सागर
सरदार सरोवर,
आग लावली याच कोलितांनी !!
लागली होती आधी
उकाईच्या पाण्याने
जीव घेऊन हजारोनी लाखो आदिवासींचा
विझते न विझते तोच
आग लागली, आग लागली.
या नर्मदेच्या पाण्याने !
आग विझवायला लोक धावतात
लोकांमागून धाक धावतो
बंदूका नी दंडुके घेऊन
लोकांना विसवायला !!
लोक म्हणतात विझवू
धाक म्हणे बघाच विझवून
खूप न्यारी आग लावली, आग लावली
या धरणाच्या पाण्याने !
बंधूनो,
उड्या मारून माराल किती ?
लढून लढून लढाल किती ?
शेवटी आपण रडू
अन् हे जग हसेल आपल्याला
पण बंधुनो, भगिनींनो
भिऊ नका, रडू नका
उभे राहून ताठ
(जगाच्या) चवाट्यावर
सांगा मोठ्याने ओरडून जगाला
या जगात जो पर्यंत
आहेत सूर्य चंद्र
तो पर्यंत लढत राहू, लढत राहू.
आमच्या वतना खातर-आमच्या हक्का खातर !
गळ्या पर्यंत पाणी येईल तोवर
बुलंद आवाजात ओरडून सांगू की
वतनासाठी लढण्याचा
आम्हालाही हक्क आहे, आम्हालाही हक्क आहे !!

# सूची


अंक पहिला : जानेवारी-मार्च........................................१९८० - जबरन जोत जंगल जमीन
अंक दुसरा : एप्रिल-जून.............................................१९८० - आदिवासी व शिक्षण
अंक तिसरा : जुलै-सप्टेंबर ..........................................१९८० - आदिवासी व वनसंवर्धन
अंक चौथा : ऑक्टोबर-डिसेंबर.....................................१९८१ - आदिवासी साहित्य व कला
अंक पाचवा : जानेवारी-मार्च .......................................१९८१ - दलितांना सवलती व राखीव जागा माहिती
अंक सहावा : एप्रिल-जून...........................................१९८१ - आदिवासी व आरोग्य
अंक सातवा : जुलै-सप्टेंबर..........................................१९८१ - वनशेती व संवर्धन
अंक आठवा : ऑक्टोबर-डिसेंबर....................................१९८१ - रोजगार हमी योजना
अंक नववा : जानेवारी-मार्च .........................................१९८२ - उत्तरा खंड अभ्यास मोहीम
अंक दहावा : एप्रिल-जून............................................१९८२ - धरणे व विकास
अंक अकरा-बारा : जुलै-डिसेंबर.....................................१९८२ - जंगल व्यवस्थापन
अंक तेरावा : जानेवारी-मार्च.........................................१९८३ - आदिवासी व दारू
अंक चौदावा : एप्रिल-जून...........................................१९८३ - आदिवासींच्या सामाजिक / राजकीय चळवळी
अंक पंधरावा : जुलै-सप्टेंबर .......................................१९८३ - प्रा. सरदार गौरव अंक / आदिवासी साहित्य
अंक सोळावा : ऑक्टोबर-डिसेंबर..................................१९८३ - आदिवासी साहित्य व सामाजिक प्रश्न
अंक सतरा-अठरा : जानेवारी-जून..................................१९८४ - आदिवासीमधील स्वयंसेवी कार्य
अंक एकोणिसावा : जुलै-सप्टेंबर...................................१९८४ - आदिवासी स्त्री
अंक विसावा : ऑक्टोबर-डिसेंबर ..................................१९८४ - आदिवासींचे आरोग्य व शिक्षण
अंक एकविसावा : जानेवारी-मार्च .................................१९८५ - आदिवासी संघटन
अंक बाविसावा : एप्रिल-जून........................................१९८५ - जमीन हस्तांतर
अंक तेविसावा : जुलै-सप्टेंबर.......................................१९८५ - आदिवासी महिला
अंक चोविसावा : ऑक्टोबर-डिसेंबर ..............................१९८५ - आदिवासी व सरकार
अंक पंचविसावा : जानेवारी-मार्च..................................१९८६ - जंगल व धरण
अंक सव्विसावा : एप्रिल-जून .......................................१९८६ - आदिवासी कला
अंक सत्ताविसावा : जुलै-सप्टेंबर...................................१९८६ - आदिवासी व वेठबिगारी
अंक अठ्ठाविसावा : ऑक्टोबर-डिसेंबर ............................१९८६ - आदिवासीविषयक ग्रंथ मानवशास्त्र परिचय
अंक एकोणतिसावा : जानेवारी-मार्च ...............................१९८७ - भटक्याविमुक्त जमातींचे प्रश्न
अंक तिसावा : एप्रिल-जून ..........................................१९८७ - आदिवासी आणि सांस्कृतिक बदल
अंक एकतीस-बत्तीस : जुलै-डिसेंबर...............................१९८७ - राष्ट्रीय वननीतीचा प्रश्न
अंक तेहतीस : जानेवारी-मार्च ......................................१९८८ - सवलती अपहरणाची समस्या
अंक चौतीस : एप्रिल-जून...........................................१९८८ - आदिवासी साहित्य
अंक पस्तीस-छत्तीस : जुलै-डिसेंबर ...............................१९८८ - आदिवासी समाज व संस्कृती
अंक सदतीस-अडतीस : जानेवारी-जून.............................१९८९ - डॉ. वेरीर एलवीन विशेषांक
अंक एकोणचाळीस-चाळीस : जुलै-डिसेंबर.........................१९८९ - व्यवसाय मार्गदर्शन
अंक एकेचाळीस-बेचाळीस : जानेवारी-जून ........................१९९० - महाराष्ट्रातील आदिवासींची परिस्थिती
अंक त्रेचाळीस : जुलै-सप्टेंबर.......................................१९९० - जागतिक आदिवासी
अंक चव्वेचाळीस : आक्टोबर-डिसेंबर ............................१९९० - गं. बा. सरदार स्मृति विशेषांक
अंक पंचेचाळीस-सेहचाळीस : जानेवारी-जून.......................१९९१ - आदिवासी साहित्य संमेलन विशेषांक
अंक सत्तेचाळीस : जुलै-सप्टेंबर.....................................१९९१ - आदिवासींच्या विकासात्मक व सांस्कृतिक समस्या
अंक अठ्ठेचाळीस : ऑक्टोबर-डिसेंबर ..............................१९९१ - आदिवासी जीवन व संस्कृती
अंक एकोणपन्नास-पन्नास : जानेवारी-जून .........................१९९२ - सर्वसाधारण आदिवासी
अंक एक्कावन-बावन : जुलै-डिसेंबर.................................१९९२ - अनुताई वाघ विशेषांक

Registered with the Registrar of News Papers of India Under No. 35835/80

**महाराष्ट्र मानव विज्ञान परिषद**

आदिवासी व दलितांच्या समस्यांबाबत संशोधन, चर्चा व प्रकाशन कार्यकर्त्यांचे शिबिराद्वारे प्रशिक्षण. शासकीय, राजकीय व रचनात्मक कार्य करणाऱ्या कार्यकर्त्यांना एकत्र व्यासपीठावर आणून त्यांच्यात आदिवासी व दलितांच्या समस्यांबाबत आणि विकासाबाबत सुसंवाद घडवून आणणे.

मानव विज्ञान व सामाजिक शास्त्रे यांच्या शिक्षकांना व विचारवंतांना, मुख्यत: आदिवासींबाबत अभ्यासकांना एकत्र आणणे.

मानव विज्ञानाच्या सर्व शाखांत अध्ययन, संशोधन प्रकाशन.

या उद्देशाने 'महाराष्ट्र मानव विज्ञान परिषद' स्थापन करण्यात आली आहे. याच उद्देशाचे मूर्त स्वरूप म्हणून 'हाकारा' सुरू करण्यात आला आहे. परिषदेचे सदस्यत्व स्वीकारून आपणही या कार्यात सहभागी व्हावे. (संस्थांना फक्त 'हाकारा'चे सदस्यत्व मिळेल.)

मानव विज्ञान परिषदेचे सदस्यत्व

आजीव सभासद ३०० रुपये (फक्त व्यक्तिंसाठी)

हाकारा वार्षिक सभासद ३० रुपये (व्यक्ती व संस्था दोन्ही)

परिषदेच्या सभासदांना 'हाकारा' विनामूल्य पाठविला जातो. आपले सदस्यत्व आणि वार्षिक वर्गणी कृपया खालील पत्त्यावर 'महाराष्ट्र मानव विज्ञान परिषद' (दि महाराष्ट्र असोसिएशन ऑफ ॲन्थ्रॉपॉलॉजिकल सायन्सेस) यांचे नावे डिमांड ड्राफ्ट अथवा मनीऑर्डरने पाठवावी. मनीऑर्डर करताना फॉर्ममागे कृपया आपले पूर्ण नाव व पूर्ण पत्ता लिहिण्यास विसरू नये.

**पत्रव्यवहाराचा पत्ता :**

रा. के. मुटाटकर, सचिव
महाराष्ट्र मानव विज्ञान परिषद
६४, आनंद पार्क, औंध,
पुणे - ४११ ००७.

**आपल्या क्रियाशील सहकार्याची अपेक्षा आहे.**

हाकारा त्रैमासिकास महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळ व भारतीय सामाजिकशास्त्र अनुसंधान परिषद, पश्चिम विभागीय केंद्र यांचेकडून अर्थसहाय्य मिळाले आहे.

Impressions, Bgm. Tel. : 21309